
# भैरव

## कृषी विशेषांक




**मविप्र समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय**

वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक

Scanned with CamScanner

# भैरव २०१९-२०




ग्रामदैवत - भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी माता मंदीर

Scanned with CamScanner

॥ बहुजन हिताय बहुजन सुखाय ॥

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव

ता. चांदवड, जि. नाशिक.

# 'भैरव'

## कृषी विशेषांक

## वार्षिक नियतकालिक

सन २०१९-२०

वर्ष - ४ थे - अंक ४ था

✲ अध्यक्ष संपादक मंडळ ✲

मा. प्राचार्य ए. एल. भगत

✲ प्रमुख संपादक ✲

प्रा. एस. एन. राठोड

✲ संपादक मंडळ सदस्य ✲

प्रा. व्ही. एस. जाधव, प्रा. एस. एम. कुमावत



Scanned with CamScanner

✲ प्रकाशन स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

✲ प्रकाशन कालावधी : वार्षिक

✲ प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

✲ राष्ट्रीयत्व : भारतीय

✲ पत्ता : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव,
ता. चांदवड, जि. नाशिक.

✲ प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

✲ अक्षर जुळवणी : श्री. विजय बोरखडे (श्री स्वामी समर्थ ऑफसेट)

✲ मुख पृष्ठ : श्री. विष्णु थोरे, चांदवड

✲ मुद्रण : मराठा विद्या प्रसारक समाज प्रिंटींग प्रेस,
नाशिक - २.

✲ छायाचित्र : शिवप्रसाद फोटो स्टुडिओ, वडनेर भैरव

मी प्राचार्य ए. एल. भगत असे जाहीर करतो की,
वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. - प्राचार्य ए. एल. भगत
फक्त खाजगी वितरणासाठी


' या नियतकालिकातील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांचे आहेत. त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.' - प्रमुख संपादक



Scanned with CamScanner

# भैरव २०१९-२०

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## आद्य संस्थापक व स्फूर्तिस्थान



कर्मवीर रावसाहेब थोरात



कर्मवीर काकासाहेब वाघ



कर्मवीर भाऊसाहेब हिरे



कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे



कर्मवीर गणपत दादा मोरे




कर्मवीर डी.आर.भोसले



कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे



कर्मवीर ॲड.विठ्ठलराव हांडे



कर्मवीर डॉ.वसंतराव पवार

Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी



**डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे**
अध्यक्ष



**श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते**
सभापती



**श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार**
सरचिटणीस



**श्री. राघो काशिराम आहिरे**
उपसभापती



**डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले**
चिटणीस

Scanned with CamScanner

## मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे सदस्य


श्री.भाऊसाहेब लक्ष्मण खातळे
इगतपुरी


श्री.अशोक राजाराम पवार
कळवण व सुरगाणा


श्री. उत्तम गणपत भालेराव
चांदवड


श्री.दत्तात्रय रामचंद्र पाटील
दिंडोरी व पेठ


श्री.नामदेव नभाजी महाले
नाशिक


श्री.प्रल्हाद दादा गडाख
निफाड


श्री.दिलीप रघुनाथ पाटील
नांदगांव


डॉ. प्रशांत उदाराम देवरे
सटाणा


डॉ. जयंत त्र्यंबकराव पवार
मालेगांव


श्री. रायभान गंगाधर काळे
येवला


श्री. हेमंत विठ्ठल वाजे
सिन्नर


डॉ.विश्राम मालजी निकम
देवळा


श्री. सचिन पंडीतराव पिंगळे
नाशिक ग्रामीण

## सेवक सदस्य


प्रा. नानासाहेब त्र्यंबक दाते
सेवक सदस्य


श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे
सेवक सदस्य


श्रीमती नंदा अशोक सोनवणे
सेवक सदस्य

Scanned with CamScanner




प्राचार्य मा. श्री. अमोल लक्ष्मण भगत

Scanned with CamScanner

# संपादक मंडळ



मा. प्राचार्य - अमोल भगत

अध्यक्ष : संपादक मंडळ



प्रा. सुदाम राठोड

प्रमुख संपादक



प्रा. विठ्ठल जाधव

सदस्य : संपादक मंडळ



प्रा. सुनिल कुमावत

सदस्य : संपादक मंडळ

Scanned with CamScanner

# भैरव २०१९-२०

## * महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद *

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| प्रा. ए. एल भगत<br>भूगोल | प्रा. एन. डी. वडघुले<br>वाणिज्य | प्रा. पी. पी. निकम<br>वाणिज्य | प्रा. डी. एच. भगुरे<br>वाणिज्य | प्रा. एस. एन. राठोड<br>मराठी |
|  |  |  |  |  |
| प्रा. व्ही. एस. जाधव<br>मराठी | प्रा. डी. डी. गव्हाणे<br>अर्थशास्त्र | प्रा. एम. एम. भोसले<br>अर्थशास्त्र | प्रा. डी. बी. पूरकर<br>सायन्स | प्रा. एम. ए. पाटील<br>मानसशास्त्र |
|  |  |  |  |  |
| प्रा. बी. पी. गायकवाड<br>राज्यशास्त्र | प्रा. एन. आर. काकड<br>क्रीडा संचालक | प्रा. एस. एस. लोखंडे<br>ग्रंथपाल | सौ. एस. जे. चव्हाण<br>परिचारिका | सौ. एस. पी. भोसले<br>परिचारिका |

## * महाविद्यालयीन सेवक वृंद *

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| श्री. एस. बी. शिंदे<br>ज्यु. क्लार्क | श्री. एस. के. शिंदे<br>ज्यु. क्लार्क | श्री. एम. एस. ठाकरे<br>ज्यु. क्लार्क | श्री. एस. ए. बच्छाव<br>शिपाई | श्री. एस. एस. वाटपाडे<br>शिपाई |
|  |  |  |  |  |
| श्री. एस. एन. निफाडे<br>शिपाई | श्री. व्ही. ए. मोरे<br>शिपाई | प्रा. बी. व्ही. जाधव<br>बस चालक | श्री. बी. एस. व्हरगळ<br>बस चालक | श्री. आर. पी. निकम<br>शिपाई |

Scanned with CamScanner

# * ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक वृंद *


प्रा. एस. आर. जाधव
वाणिज्य


प्रा. एस. एम. कुमावत
मराठी/इतिहास


प्रा. एस. वाय. गांगुर्डे
उच्च माध्य.व्यवसाय अभ्यासक्रम


प्रा. डी. एस.पाटील
उच्च माध्य.व्यवसाय अभ्यासक्रम


प्रा. एच.एन. बच्छाव
भूगोल


प्रा. पी. एम. जाधव
इंग्रजी


प्रा. व्ही. वाय. रसाळ
भूगोल


प्रा. एस. के. टर्ले
इंग्रजी


प्रा. एम. बी. देशमुख
सायन्स


प्रा. आर. एन. पाटील
विज्ञान


प्रा.आर. आर. शिंदे
सायन्स


प्रा. जी. आर. गवळी
क्रीडा संचालक


प्रा. आर. पी. देसले
रसायनशास्त्र


प्रा. ए. डी. गोसावी
इतिहास/मराठी


प्रा. यु. व्ही. जाधव
मराठी


प्रा. जे. एस. कटाळे


प्रा. एस. एल. ढगे
अर्थशास्त्र


प्रा. व्ही. पी. शिरसाठ
रसायनशास्त्र


श्री. एन. एम. सावळे
शिपाई

Scanned with CamScanner




रा.से.यो.व विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत सातारा-सांगली पुरस्थितीसाठी मदतनिधी गोळा करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी.

रा. से. यो. अंतर्गत महाविद्यालयात राबविलेल्या रक्तदान शिबीर प्रसंगी रक्तदानाचा हक्क बजावतांना महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य ए. एल. भगत, रा.से.यो. अधिकारी प्रा. डी. एच. भगुरे व म.वि.प्र. रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी







रा.से.यो., रेड रिबन क्लब व उपजिल्हा रुग्णालय चांदवड (आय.टी.सी. विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने एडस् जनजागृती सप्ताह निमित्त आयोजित रॅलीत समुपदेशक सुनंदा शिंदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ शितल गायकवाड, सुषमा मोरे, प्रा. डी. एच. भगुरे, प्रा. व्ही. एस. जाधव व विद्यार्थी

Scanned with CamScanner




रा.से.यो. व राज्यशास्त्र विभागाअंर्तगत आयोजित संविधान दिन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. डी. टी. ढगे (पिंपळगांव महाविद्यालय) प्राचार्य ए. एल. भगत, प्रा. बी. एच. भगुरे, प्रा. बी. पी. गायकवाड व समवेत विद्यार्थी.

रा. से. यो. व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नव मतदार नोंदणी अभियानप्रसंगी मा. आ. डॉ. राहुल आहेर, मा. इंजि. दिलीपराव धारराव (अध्यक्ष,महाविद्यालयीन स्थानिक विकास समिती) प्राचार्य ए. एल. भगत तसेच मान्यवर





कलम ३७० एक चिंतन या विषयावर मागदर्शन करतांना प्राचार्य ए. एल. भगत, प्रा. एन. डी. वडघुले (उपप्राचार्य) प्रा. बच्छाव, प्रा. डी. डी. गव्हाणे, प्रा. डी. एच. भगुरे व विद्यार्थी

Scanned with CamScanner



महाविद्यालयाच्या नूतन बस उद्घाटन प्रसंगी मा. उत्तमबाबा भालेराव (माजी आमदार, तसेच म. वि. प्र. चांदवड तालुका संचालक) मा. डॉ. आत्माराम कुंभार्डे, मा. इंजि. दिलीपराव धारराव (अध्यक्ष, म.स्था.वि.स.) मा. ॲड. पोपटराव पवार, मा. हिरामण दादा शिंदे, मा. राजाभाऊ भालेराव, मा. शिवाजी पवार सर, आदी मान्यवर व प्राचार्य ए. एल. भगत



गुरुशिष्य पुण्यतिथी साजरी करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य ए एल. भगत प्रा. सुनिल कुमावत, प्रा. जी. आर. गवळी तसेच इतर प्राध्यापक वृंद व विद्यार्थी



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्राचार्य ए. एल. भगत, मा. चंद्रकांत भंडारे (सरचिटणीस सा.वा.ना.) मा. अनिल पवार (पत्रकार), प्रा. सुनील कुमावत व विद्यार्थी

Scanned with CamScanner

म.वि.प्र. समाज दि नानिमित्त केशव मेश्राम पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठी विभागाची विद्यार्थिनी कु. सोनाली सलादे हीचा सत्कार करतांना मा. उत्तमबाबा भालेराव (माजी आमदार तसेच म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक), प्रमुख पाहुणे डॉ. शंकर बोऱ्हाडे, मा. इंजि. दिलीपराव धारराव, (अध्यक्ष, म.स्था.वि.स.), मा. दत्तात्रय माळी, मा. शिवाजी पवार सर, मा. शिवाजी सलादे, मा. श्रीमती रत्नाताई पुरकर, प्राचार्य ए. एल. भगत व इतर मान्यवर






Scanned with CamScanner

# समाज दिन विशेष








Scanned with CamScanner



स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेअंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना भडगांव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. विकास शेवाळे, गुरुमंत्र ॲकेडमीचे श्री. राज शेळके व प्राचार्य ए. एल. भगत

महाविद्यालयातील जिमखाना भेटीप्रसंगी
मा. उत्तमबाबा भालेराव
(माजी आमदार तसेच
म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक)
डॉ. आत्माराम कुंभार्डे,
मा. इंजि. दिलीपराव धारराव
(अध्यक्ष, म.स्था.वि.स.)
. हिरामण दादा शिंदे, मा. राजाभाऊ भालेराव
व प्राचार्य ए. एल. भगत





महाविद्यालयीन सहलीचे क्षणचित्र...!
गोवा

पिंपळगांव महाविद्यालय व वडनेर भैरव महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीरात गावफेरी प्रसंगी प्रा. डी. टी. ढगे, प्रा. डी. एच. भगुरे, प्रा. कुशारे व स्वयंसेवक




रा. से. यो. २०१९-२० च्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी म.वि.प्र. अध्यक्ष मा. डॉ. तुषार शेवाळे, म.वि.प्र. चिटणीस मा. डॉ. सुनिल ढिकले, पोलीस निरीक्षक संजय महाजन, सहाय्यक कार्यकारी अभियंता मा. राकेश गुजर, मा. प्रतापदादा मोरे, मा. पंडीत आहेर, डॉ. आर. डी. दरेकर (प्राचार्य, पिंपळगांव महाविद्यालय) प्राचार्य ए. एल. भगत, मुख्याध्यापक पी. एम. बोराडे व मान्यवर







रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीरात श्रमदान करतांना स्वयंसेवक

रा. से. यो. विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. श्रीमती नीलिमाताई पवार (सरचिटणीस, म.वि.प्र.) प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर (पिंपळगांव महाविद्यालय) प्राचार्य ए. एल. भगत व मान्यवर






रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी मा. माणिक तात्या बोरस्ते (सभापती, म.वि.प्र.)
मा. प्रल्हाद दादा गडाख (म.वि.प्र.संचालक, निफाड तालुका)
मा. सचिनजी पिंगळे (म.वि.प्र.संचालक, नाशिक ग्रामीण)
मा. विश्वासराव मोरे (माजी म.वि.प्र. संचालक)
मा. अशोकराव निफाडे (माजी सरपंच)
मा. शरद काळे (उपसरपंच)
प्राचार्य आर. डी. दरेकर (पिंपळगांव महाविद्यालय)
प्राचार्य ए. एल. भगत

Scanned with CamScanner



लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य ए. एल. भगत, उपप्राचार्य प्रा. एन. डी. वडघुले प्रा. सुनिल कुमावत तसेच प्राध्यापक वृंद व विद्यार्थी




जागतिक लोकसंख्या दिन व तंबाखू व्यसनमुक्तीदिन प्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रा. डी. एच. भगुरे, प्राचार्य ए. एल. भगत व विद्यार्थी



एक धागा शौर्याचा..... ! राखी अभिमानाची..!! या उपक्रमांतर्गत भारतीय जवानांना राखी पाठवितांना महाविद्यालयातील विद्यार्थिनी समवेत मा. सुरेश सलादे सर, प्राचार्य ए. एल. भगत, प्रा. डी. एच. भगुरे व मान्यवर

Scanned with CamScanner

# समाजगीत

जनकल्याणी देह झिजवुनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ॥धृ.॥
ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून घराघरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तीचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥१॥
नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करुया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणुनी रुतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करु पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करुनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥२॥
मूक अहाणी फुलवू अग्रणी त्यातुनी ही जिद्द
मुळात अबला करु या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ करावा द्या हो द्या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥३॥

- कै. प्रा. श्रीरंग गुणे



Scanned with CamScanner

# Our Vision and Mission

## - Vision

We envision a college of higher education ensuring conductive environment for teaching and learning, qualitites and skills of students making them into socially responsible, globally competent and excellent human resource.

## - Mission

1) To provide education to masses and first generation of learners.
2) Nuturing encouraging disciplines and the creation of new knowledge.
3) Expanding opportunities for all of our students to acquire understanding of the world as a place of different and diversity across time and culture through participation in study.
4) To develop socially responsible citizens with ethies and morals hence build the nation.
5) To under take activities for community orientation.
6) To empower women by providing right opportunities of higher education and make them self reliant.
8) To inculcate environmental awareness, save and conserve nature.



Scanned with CamScanner





महाविद्यालयाच्या सुसज्ज इमारतीचे व विविध विभागांचे उद्घाटन करतांना मा. श्रीमती नीलिमाताई पवार (सरचिटणीस, म.वि.प्र.), मा. उत्तम बाबा भालेराव (माजी आमदार तसेच म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक) मा. इंजि. दिलीपराव धारराव (अध्यक्ष, म.स्था.वि.स.), मा. डॉ. विक्रम सलादे, मा. रावसाहेब भालेराव (उपसरपंच) मा. हिरामण शिंदे, मा. दत्तात्रय शिंदे

Scanned with CamScanner








कवितेची अक्षरशेती या कार्यक्रमात कविता सादर करतांना कवी संदीप जगताप, कवी विष्णू थोरे, कवी कैलास सलादे, कवी रावसाहेब उगले, कवी दत्ता सोनवणे, कवी सोमनाथ फुगट, कवी सुदाम राठोड व मान्यवर

Scanned with CamScanner

स्वातंत्र्य दिन साजरा करतांना मा. उत्तम बाबा भालेराव (माजी आमदार तसेच म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक) मा. इंजि. दिलीपराव धारराव (अध्यक्ष, म.स्था.वि.स.) मा. ॲड. पोपटराव पवार, मा. हिरामण दादा शिंदे, मा. राजाभाऊ भालेराव प्राचार्य ए. एल. भगत व मान्यवर







माजी विद्यार्थी व पालक मेळावा प्रसंगी उपस्थित
मा. उत्तमबाबा भालेराव
(माजी आमदार तसेच
म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक)
मा. इंजि. दिलीपराव धारराव
(अध्यक्ष, म. स्था. वि. स.)
मा. नानासाहेब दाते (सेवक सदस्य)
श्रीमती नंदा अशोक सोनवणे (सेवक सदस्य)
प्राचार्य ए. एल. भगत

Scanned with CamScanner

विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यानिमित्त उपस्थित प्रमुख पाहुणे मा. सी.ए. निलय मेहता
(मॅनेजिंग डायरेक्टर निलया ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणे) मा. डॉ. तुषार दादा शेवाळे (अध्यक्ष, म.वि.प्र.)
मा. उत्तम बाबा भालेराव (माजी आमदार तसेच म.वि.प्र. चांदवड तालुका संचालक)
मा. इंजि. दिलीपराव धारराव (अध्यक्ष, म.स्था.वि.स.), मा. सचिन साळुंके (ए.पी.आय. पो.स्टे. व.भैरव)
मा. डी. एल. आबा पाचारेकर, मा. दत्तात्रय माळी, मा. डॉ. विक्रम सलादे, प्राचार्य ए. एल. भगत
प्राचार्य सुनिता अहिरे (सनराईज) मा. राजाभाऊ भालेराव, मा. मनोहर पाटोळे, मा. शिवाजी पवार










Scanned with CamScanner

## वार्षिक स्नेह संमेलनाची क्षणचित्रे....!







Scanned with CamScanner

## वार्षिक स्नेह संमेलनाची क्षणचित्रे....!






Scanned with CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## ✲ कार्यकारी मंडळ ✲

### कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे |
| सभापती | : | श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते |
| उपसभापती | : | श्री. राघो काशिराम आहिरे |
| सरचिटणीस | : | श्रीमती नीलिमाताई वसंतराव पवार |
| चिटणीस | : | डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले |

## ✲ कार्यकारी मंडळाचे तालुका सदस्य ✲

| | | |
|---|---|---|
| इगतपुरी | : | श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खताळे |
| चांदवड | : | श्री. उत्तम गणपत भालेराव |
| दिंडोरी | : | श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील |
| नाशिक | : | श्री. नामदेव नभाजी महाले |
| कळवण | : | श्री. अशोक राजाराम पवार |
| निफाड | : | श्री. प्रल्हाद दादा गडाख |
| नांदगांव | : | श्री. दिलीप रघुनाथ पाटील |
| बागलाण | : | डॉ. प्रशांत उदाराम देवरे |
| मालेगांव | : | श्री. जयंत त्र्यंबकराव पवार |
| येवला | : | श्री. रायभान गंगाधर काळे |
| सिन्नर | : | श्री. हेमंत विठ्ठल वाजे |
| नाशिक ग्रामीण | : | श्री. सचिन पंडीतराव पिंगळे |
| देवळा | : | डॉ. विश्राम मालजी निकम |

## ✲ सेवक सदस्य ✲

| | | |
|---|---|---|
| उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विभाग | : | श्री. नानासाहेब त्र्यंबक दाते |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्रीमती. नंदा अशोक सोनवणे |



Scanned with CamScanner

# महाविद्यालयीन विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १) | इंजि. श्री. दिलीपराव हरिभाऊ धारराव | : अध्यक्ष |
| २) | डॉ. श्री. सुनिल मधुकर पाचोरकर | : सदस्य |
| ३) | श्री. विजय शंकरराव भालेराव | : सदस्य |
| ४) | डॉ. श्री. विक्रम अशोकराव सलादे | : सदस्य |
| ५) | श्री. दौलतराव लुंकाजी पाचोरकर | : सदस्य |
| ६) | श्री. वसंतराव देवराम गवळी | : सदस्य |
| ७) | श्री. दत्तात्रय मधुकर माळी | : सदस्य |
| ८) | श्री. विजय ग्यानुजी निखाडे | : सदस्य |
| ९) | श्री. भाऊसाहेब देवराम भालेराव | : सदस्य |
| १०) | श्री. पोपटराव पंढरीनाथ पाचोरकर | : सदस्य |
| ११) | श्री. शंकर शिवराम आहेर | : सदस्य |
| १२) | श्री. वसंतराव माधवराव वाटपाडे | : सदस्य |
| १३) | श्री. परशराम पोपटराव पाचोरकर | : सदस्य |
| १४) | श्री. अशोक नामदेव गचाले | : सदस्य |
| १५) | श्री. नानासाहेब भिकाजी वाघ | : सदस्य |
| १६) | प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव | : सचिव |
| १७) | प्रा. निशांत डी. वडघुले | : प्राध्यापक प्रतिनिधी |
| १८) | प्रा. डॉ. दत्तात्रय डी. गव्हाणे | : प्राध्यापक प्रतिनिधी |



Scanned with CamScanner

# कनिष्ठ महाविद्यालयीन स्थानिक व्यवस्थापन समिति

## कनिष्ठ विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. हिरामण अशोक शिंदे | : | अध्यक्ष |
| २) | श्री. दिपक रंगनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ३) | श्री. मनोहर शंकर पाटोळे | : | सदस्य |
| ४) | श्री. विकास विश्वनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ५) | श्री. लक्ष्मण एकनाथ भालेराव | : | सदस्य |
| ६) | श्री. नारायण गोविंद सलादे | : | सदस्य |
| ७) | श्री. दिगंबर माधवराव निखाडे | : | सदस्य |
| ८) | श्री. योगेश अशोकराव साळुंखे | : | सदस्य |
| ९) | श्री. शिवाजी रामचंद्र पवार | : | सदस्य |
| १०) | श्री. अनिल भास्कर पवार | : | सदस्य |
| ११) | श्री. भाऊसाहेब बारकू तिडके | : | सदस्य |
| १२) | श्री. निवृत्ती दामोधर माळी | : | सदस्य |
| १३) | डॉ. श्री. सुनिल गोविंद आहेर | : | सदस्य |
| १४) | श्री. बाळासाहेब पोपट शिंदे | : | सदस्य |
| १५) | श्री. सुनिल बाळासाहेब जाधव | : | सदस्य |
| १६) | प्राचार्य, जनता विद्यालय ॲण्ड ज्यु.कॉलेज, वडनेर भैरव | : | सचिव |



Scanned with CamScanner

# संपादकीय....

भारताची खरी संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. केवळ देशाचा आर्थिक कणा म्हणजे शेती एवढेच विधान सत्य नाही. भारतीय माणसाची समग्र जडण-घडण ही कृषीजन संस्कृतीत झालेली आहे. त्यामुळे भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक प्रेरणा आणि संरचना कृषी संस्कृतीच्या सान्निध्यात घडलेल्या आहेत. शेती आणि शेतीशी निगडीत समाजाच्या अभ्यासाशिवाय भारतीय लोकमानसाचा अभ्यास शक्य नाही. म्हणून मविप्र समाजाच्या कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव यांच्या वतीने 'कृषी विशेषांक' प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

महाविद्यालयाचा वार्षिकांक 'भैरव' हा कृषिविशेषांक म्हणून हाती देताना विशेष आनंद होत आहे. कारण वडनेर भैरव या गावाचा परिसर द्राक्षशेती आणि टोमॅटो शेतीने व्यापलेला आहे. महाविद्यालयात येणारे सर्व विद्यार्थी शेतकरी आहेत, शेती मातीशी त्यांची नाळ जुळलेली आहे. शेतीबद्दलची त्यांची आस्था लक्षात घेऊन महाविद्यालयाने 'कृषी विशेषाकां'चा निर्णय घेतला आहे. त्याला विद्यार्थी वर्गाकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. कथा, कविता, लेख यांच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. आपले शेतीतले अनुभव चितारले. यातले चैतन्य हेच या विशेषांकाचे सामर्थ्य आहे.

या विशेषकांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य ए.एल. भगत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच संपादक मंडळातील सर्व सदस्यांनी या कामी मदत केली. म्हणून हा अंक सिद्धीस जाऊ शकला. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या या विशेषकांस हातभार लावणाऱ्या सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मनापासून आभार मानतो ! तसेच या विशेषकांचे मुखपृष्ठ बनवून देणारे प्रसिद्ध साहित्यिक व चित्रकार श्री. विष्णू थोरे यांचे विशेष आभार मानतो, थांबतो.

धन्यवाद !

– प्रा. सुदाम एन. राठोड

(मराठी विभाग)



Scanned with CamScanner

# प्राचार्यांचे मनोगत...

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ध्येय उराशी बाळगून तळागाळातील समाजाचा विकास करण्यासाठी १०० वर्षांपूर्वी कर्मवीरांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना केली.

यशस्वी जीवनाचा मूलमंत्र म्हणजे 'शिक्षण'. कारण मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावरच अवलंबून आहे. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारांसाठी महत्त्वाची असते. म्हणूनच उच्च शिक्षणामध्ये नवीन प्रवाह येत आहेत. यातूनच उद्याची वैभवशाली भारताचे आधारस्तंभ होतील यात शंकाच नाही. सामाजिक स्तरावर जगण्याचे भान निर्माण करत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी स्विकारुन समाज विकासास प्राधान्य द्यावे. हेच महाविद्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

वडनेर भैरव महाविद्यालयाचा परिसर शेती आणि शेतकऱ्यांनी व्यापलेला आहे. या परिसरातला सर्व व्यवहार हे शेतीवर अवलंबून आहे. आणि महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी हे शेतकरी वर्गातीलच आहेत. म्हणूनच महाविद्यालयाने यावर्षी भैरव नियतकालिकाच्या माध्यमातून **कृषी विशेषांक** या विशेषांकाची बांधणी केली आहे.

यातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शेती विषयी आत्मीयता निर्माण व्हावी तसेच कृषी संस्कृतीचे मुल्य कृती स्वरुपात यावे, यासाठी **कृषी विशेषांकाचा** घाट घातला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणांबरोबरच सामाजिक नितीमूल्यांची पायाभरणी व्हावी यासाठी महाविद्यालय विविध उपक्रमांचे आयोजन करते. महाविद्यालयीन 'भैरव' नियतकालिकाचा '**कृषी विशेषांक**' हा विशेषांक आपल्या हाती देतांना महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून मला मनस्वी आनंद होत आहे.

या अंकात विद्यार्थ्यांनी शेतीविषयक लेखनातून आधुनिक शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या व जीवन चरित्र मांडले आहे. या नियतकालिकातून विद्यार्थ्यांच्या प्रगल्भतेला चालना मिळणार आहे. यातील लेख उद्‌बोधक व अंर्तमुख करायला लावणारे आहेत. यात शंकाच नाही. धन्यवाद....!

प्राचार्य
**मा. श्री. ए. एल. भगत**
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

# अणुक्रमणिका .......

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) | शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा | - आहेर उज्वला रावसाहेब |
| २) | शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रश्न आणि उपाय | - टेकनर अनुष्का शिवाजी |
| ३) | शेती आणि शेतकरी | - जाधव साक्षी दिपक |
| ४) | शेती, माती आणि मारसे | - निखाडे मनिषा सुभाष |
| ५) | भारतीय शेतीपुढील आव्हाने | - कोठुळे चंचल सुभाष |
| ६) | द्राक्ष शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान | - निखाडे माधुरी विजय |
| ७) | शेतकरी सुखी तर जग सुखी | - तिकडे पूनम केदू |
| ८) | शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागतील का ? | - जाधव प्रतिक्षा नंदू |
| ९) | होय ! मी शेतकरी होणार.... | - निखाडे मनिषा सुभाष |
| १०) | द्राक्ष शेती - वडनेरकरांची जीवनधारा | - आहेर हर्षाली विजय |
| ११) | महाराष्ट्रातील शेती - समस्या आणि उपाय | - पगार लीना नरहरी |
| १२) | शेतकरी आत्महत्त्येत मराठवाडा अग्रेसर का आहे ? | - पाचोरकर स्वाती |
| १३) | सेंद्रीय शेती, काळाची गरज | - आहेर गायत्री विजय |
| १४) | द्राक्षशेती - मूळ, कूळ आणि विस्तार | - प्रा. गोसावी धर्मराज अभिजित |
| १५) | दुष्काळ आणि भारतीय शेती | - जाधव प्रतिक्षा नंदू संगिता |
| १६) | खरंच शेतकरी राजा आहे का ? | - पगार पूजा अर्जुन |
| १७) | वडनेरची द्राक्षशेती | - पाचोरकर श्रद्धा बाळासाहेब |
| १८) | दुष्काळ आणि भारतीय शेतकरी | - टेकनर रुपाली राजेंद्र |
| १९) | कर्जबाजारी शेतकऱ्यांचे मनोगत | - गांगुर्डे प्रतिभा प्रताप |
| २०) | शेतकऱ्याचे मनोगत | - सावरकर वृषाली राजाराम |
| २१) | होय मी शेतकरी होणार ? | - निखाडे मनिषा सुभाष |
| २२) | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | - निखाडे मनिषा सुभाष |




Scanned with CamScanner

# अणुक्रमणिका .......

## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) | सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती | - जाधव पूजा बाळासाहेब |
| २) | अवकाळी | - आहेर उज्वला रावसाहेब |
| ३) | दुष्काळ | - जाधव प्रतिक्षा नंदू / संगिता |
| ४) | शेतकऱ्याचा अक्रोश | - नागरे गायत्री भाऊसाहेब |
| ५) | शेतकऱ्याचे हाल | - पाचोरकर ऋतुजा विजय |
| ६) | जगाचा पोशिंदा | - तिडके साक्षी केशव |
| ७) | उभ्या जगाचा पोशिंदा | - दांडेकर राधिका राजेंद्र |
| ८) | माझा शेतकरी | - टेकनर रुपाली राजेंद्र |
| ९) | शेतकरी आत्महत्या | - पाचोरकर सोनाली संतोष |
| १०) | आई | - पाचोरकर सोनाली संतोष |
| ११) | लोक काय म्हणतील | - थोरमिसे स्वाती अशोक |
| १२) | जीवन संघर्ष | - थोरमिसे स्वाती अशोक |
| १३) | चारोळी | - दांडेकर राधिका राजेंद्र |
| १४) | चारोळ्या | - थोरमिसे स्वाती अशोक |
| १५) | शेतकरी | - सातभाई भारती |
| १६) | शेतकरी | - तिडके शितल बाळासाहेब |
| १७) | शेतकऱ्याचा न्याय | - पाचोरकर स्वाती वसंत |
| १८) | माझी शेतकरी जमात | - कोतवाल इशा अविनाश |
| १९) | शेतकरी | - पवार कावेरी निवृत्ती |
| २०) | व्यथा बळीराजाची | - पवार कावेरी निवृत्ती |
| २१) | शेतकऱ्यांची यशोगाथा | - कोतुळे चैतल्या जगदीश |
| २२) | दुष्काळ | - कोतुळे चैतल्या जगदीश |
| २३) | किसान | - कोतवाल इशा अविनाश |
| २४) | २३ डिसेंबर शेतकरी दिन | - पाचोरकर स्वाती |
| २५) | माझा बाप शेतकरी | - घुले चेतन माणिक |
| २६) | माझा बाप शेतकरी | - सातभाई भारती |
| २७) | बाप माझा शेतकरी | - घुले चेतन माणिक |




Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| २८) | शेतकरी | – निखाडे मनिषा सुभाष |
| २९) | कष्टकरी बाप | – निखाडे मनिषा सुभाष |
| ३०) | शेतकऱ्यांचे हाल | – पाचोरकर स्वाती वसंत |
| ३१) | शेतकरी | – तिडके रोहित ज्ञानेश्वर |
| ३२) | होय मी शेतकरी होणार | – कोठुळे चैतल्या जगदीश |
| ३३) | मी शेतकरी | – पाचोरकर स्वाती वसंत |
| ३४) | बैल जुंपले | – ढिकले साक्षी साहेबराव |
| ३५) | माझा शेतकरी बाप | – पवार भाग्यश्री संजय |
| | | – सातभाई आरती अशोक |
| ३६) | शेतकऱ्यांची ओळख | – पाचोरकर स्वाती वसंत |
| ३७) | शेतकरी बाप | – पाचोरकर सोनाली |
| ३८) | नाम ओठी विठ्ठलाचे | – तिडके शितल बाळासाहेब |

अहवाल विभाग

१) मराठी विभाग
२) इंग्लिश विभाग
३) अर्थशास्त्र विभाग
४) भूगोल विभाग
५) राज्यशास्त्र विभाग
६) वाणिज्य विभाग
८) जिमखाना विभाग
९) ग्रंथालय विभाग
१०) मानसशास्त्र विभाग
११) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभाग
१२) ज्युनिअर कॉलेज विभाग



Scanned with CamScanner



# शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा

– आहेर उज्ज्वला रावसाहेब

नमस्कार, ना बिरला ना बाटा ना टाटा खऱ्या अर्थाने. समाजाचा बायोडाटा हा माझा शेतकरी राजा आहे. वाचकांनो मला शेतकऱ्याचा विचार करत असताना जगत सुरु तुकोबाराय आठवतात. ज्यांनी स्वत:कडे गहान असलेले शेतकऱ्याचे सातबारे इंद्रायणीमध्ये बुडून शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आणि छत्रपती शिवाजी महाराज आठवतात. ज्यांनी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच राज्य निर्माण केलं व महात्मा जोतिराव फुले यांनी शेतकऱ्याचा असूड दिला तसेच विचार करत असताना मला तो युपीचा शेतकरी आठवतो ज्याच्या वाढेल कर्जमाफीमुळे फक्त २३ रु. आणि ९ पैसे कर्जमाफी आली. तसेच कृतीशील कृषीमंत्री पंजाबराव देशमुख आठवतात ! व तो आजचा पुढारी आठवतो.

माझा बाप उभ्या जगाचा पोशिंदा असताना देखील त्याच्यावर फाशीची वेळ येते. शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यांच्यावर कुठतरी विचार करणे गरजेचे आहे. मित्रानो आम्हाला कालपर्यंत गणिताच्या पुस्तकात प्रश्न असायचा कि शेतकऱ्याच्या राम्यान आयमुआमु व्यापाऱ्याकडून अमुक अमुक दराने कर्ज घेतल तेच कर्ज शेतकऱ्याच्या राम्यान त्या व्यापाऱ्याला दोन वर्षांनी किती ? टक्क्यानं परत करेल परंतु मित्रानो असा प्रश्न कधीच आला कि अमुक-अमुक व्यापाऱ्याने शेतकऱ्याच्या राम्याकडुन अमुक-अमुक दराने कर्ज घेतल तोच व्यापारी शेतकऱ्याच्या राम्याला किती टक्क्यात किती वर्षांनी परत करेल म्हणजे मित्रानो आमच्या शिक्षणाने आम्हाला शिकवलं कि माझा बाप शेतकरी उभ्या जगाचा पोशिंदा असला तरी तोच कर्ज घेईल आणि तोच कर्ज फेडेल.

माझा बाप उभ्या जगाचा पोशिंदा असताना मालाचा ठरवण्याचा अधिकार नाही म्हणजे पंपाच्या मालकाला त्याच्या पेट्रोलचा भाव ठरवण्याचा अधिकार असतो. इथल्या दुकानदारच्या मालकाला त्यांच्या मालाचा भाव ठरवण्याचा अधिकार असतो. परंतु माझ्या बापाला उभ्या जगाचा पोशिंदा असला तरी त्याला त्याच्या मालाचा भाव ठरवण्याचा अधिकार दिला जात नाही. जर माझ्या बापान तुम्हाला पोसवायच असेल जगवायंच असेल तर त्याला त्याच्या मालाचा भाव ठरवण्याचा अधिकार दिला पाहिजे. स्वामीनाथ आयोग चालू करण्यात आला पाहिजे तर खऱ्या अर्थाने माझा बाप मला या ठिकाणी जगताना दिसेल. या ठिकाणी माझ्या बापाच्या मालाला हमी भाव मिळत नाही. या ठिकाणी आमची नेते लाखोचा कोट घालतात परंतु त्या लाखोच्या कोटात लागणाऱ्या कापसासाठी दहा हजार रुपयाचा भाव देत नाही. आमची लोक ज्यावेळेस कर्जमाफीसाठी रस्त्यावर उतरतात आणि कर्जमाफी मागतो त्या वेळेस इथला नेता म्हणतो आत्महत्या केल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील याची काय हमी. त्यावेळेस माझा कवी मित्र म्हणतो – अध्यक्ष महोदय ओळखलात का मला जगाचा पोशिंदा

म्हणतात. अन त्याच्याच कर्जमाफीसाठी आम्ही मागतो. अध्यक्ष महोदय मी ऐकल्य तुम्ही जगाला डिजीटल करणार आहेस करा ! छान ! पण त्याच एक तरतुद करा अन्न उगवण्यासाठी नाही म्हणजे कस आहे ना आमच्या आत्महत्याना आम्हाला कर्जमाफी उगाच करायला पाहिजे तुमच्या डोक्याला कटकट ऑनलाईन पिकवा आणि ऑनलाईनच खा. अध्यक्ष महोदय खऱ्या अर्थाने माझ्या बापाला कर्जमाफी नाही. तर माझ्या बापाला कर्जमुक्तता हवी होती. माझ्या बापाची त्यांनी फक्त सेवा केली. माझ्या बापाला सेवाची गरज नाही. माझ्या बापाला परिवर्तनाची गरज आहे. म्हणजे भिकाऱ्याला भिक देण ही झाली सेवा. भिकाऱ्याला भिक मागायची वेळ येऊ नये हे झाल परिवर्तन. शेतकऱ्याला कर्ज देण ही झाली सेवा आणि शेतकऱ्याला कर्जाची वेळच येऊ नये हे साल परिवर्तन. हे खऱ्या अर्थाने माझ्या बापाला अपेक्षित आहे. म्हणजे ज्या वेळेस मी माझ्या बापाला उभ्या जगाचा पोशिंदा असतानाचा विचार करते. त्यावेळेस माझ्या लक्षात येते कि माझा बाप आत्महत्या का करतो. यावर मला का विचार करावासा वाटतो. माझा बाप आत्महत्या करतो. तर ह्या ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होताना दिसत आहे. पर्यायानी पाऊस पडत नाही. पाऊस पडत नाही, पाऊस पडला नाही म्हणून पिक उगवत नाही आणि पिक उगवत नाही म्हणुन माझ्या बापाला आत्महत्या करावी लागते. एखादया वर्षी पाऊस पडलाच तर पीक उगत आणि त्या पिकाला हमीभाव मिळत नाही म्हणुन माझ्या बापाला आत्महत्या करावी लागते. याची कारणे कुठतरी लक्षात घेतली पाहीजे.

ज्या वेळेस माझा बाप उभ्या जगाचा पोशिंदा असताना त्याच्या विचार ज्यावेळेस करतो. त्यावेळेस नाही जाहीरातीचा विषय देखील माझ्या डोळ्यासमोर येतो. या ठिकाणी हजार वस्तुची जाहिरात मला होताना दिसत नाही. आम्हाला जनरल नॉलेज मध्ये प्रश्न विचारला होता. आपल राष्ट्रीय स्त्रोत्र कोणत ? तर राष्ट्रीय स्त्रोत्र म्हणजे कापुस. परंतु त्या कापसाला भाव दिला जात नाही ही चिंतेची बाब आहे तर माझ्या शेतकरी बापाला जगवायच असेल तर त्याला अंधेरातुन बाहेर काढल पाहिजे. त्याला तंत्रज्ञानाची शेती करण्यासाठी प्रशिक्षण दिल पाहिजे. तर खऱ्या अर्थाने माझा बाप जगणार आहे.

**जय जवान ! जय किसान..... !!**



## किसान

**जमीन जल चुकी है आसमान बाकी है,**
**सूखे कुएँ तुम्हारा इम्तहान बाकी है,**
**वो जो खेतों की मेढ़ों पर उदास बैठे है,**
**उनकी आँखों में अब तक ईमान बाकी है,**
**बादलों बरस जाना समय पर इस बार**
**किसी का मकान गिरवी**
**तो किसी का लगान बाकी है।**

**– कोतवाल ईशा अविनाश**

*****



Scanned with CamScanner



# शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रश्न आणि उपाययोजना

- अनुष्का शिवाजी टेकनर

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरुच आहे. वर्तमानपत्र उघडल्यानंतर दररोजच्या बातम्यामधून दोन-चार शेतकऱ्याच्या आत्महत्याची वृत्त असते. हि नित्याची बाब होऊन बसली आहे. समाज, शासन, व्यवस्थेत अशा बातम्या वाचून फारशी हळहळ दिसून येत नाही. नव्याची नवलाई संपली आहे. ''तेज मरे त्याला कोण रहे'' म्हणण्याची वेळ आली आहे.

भारत हा कृषीप्रधान देश समजला जातो. तसेच शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. परंतु याच शेती क्षेत्राला आज अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. तसेच शेती करणारा शेतकरी हा अतिशय हालाकिचे जिवन जगताना आपणास दिसतो. कारण आज शेतकऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या आत्महत्या करणाऱ्या व्यक्तिच्या कुटुंबियांचे सांत्वन करतात परंतु, वास्तविकता ही आहे कि ती रक्कम त्यापर्यंत पोहचत नाही.

शेतकऱ्यांच्या कष्टाळूपणाचे गोडवे सर्वत्र गायले जातात. शेतीच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. परंतु हा पायाच कसणारा शेतकरी जर हालाकिचे जीवन जगण्यापेक्षा शेतकरी आपले जीवनचक्र संपवितो. भारतात सर्वात जास्त आत्महत्त्येचे प्रमाण हे महाराष्ट्रात आहे. एका वर्षात जवळपास १८०० च्या पर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या अशा प्रकारच्या आत्महत्या करण्यात शेतकरी हा प्रवृत्त होतात याची नेमकी कारणे कोणती त्यांना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागते. याचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

**आत्महत्या करण्याचे प्रश्न -**

**रासायनिक तत्वांच्या वाढत्या किंमती :-** दिवसे दिवस औद्योगिक उत्पादनाच्या किंमती ह्या वेगाने वाढताना दिसताना परंतु हि तत्वे जर वापरली नाही. तर पिक येणार नाही म्हणून नाईलाजाने त्याची खरेदी करावी लागेल आणि त्यातच शेतकऱ्यांच्या बराच पैसा जातो.

**कर्जबाजारी :-** शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा होय. कारण शेतकरी पिक उभारणीसाठी शेती सुधारणेसाठी कर्ज घेतात. परंतु निसर्गाचा कोप किंवा शेतमालाच्या कमी किंमती यामुळे तो कर्ज फेडू शकत नाही तसेच जो व्याजदार असतो. तो मोठ्या प्रमाणात असतो. म्हणून तो मागासलेला असतो.

***शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय ***


१) पिकांना हमीभाव दिला जावा. २) पिक कर्जावर योग्य व्याजदर असावा. ३) सरकारी धोरणे, ४) सरकारी योजनांचा भ्रष्टाचार होता कामा नये. ५) रासायनिक खतांच्या किंमती योग्य असाव्या.

अशा प्रकारच्या योजना जर राबविल्या गेल्या तरच शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखता येतील व तेव्हा भारत हा खऱ्या अर्थाने शेतीप्रधान देश मानला जाईल, नाही तर लागेल शेतीप्रधान देशात शेतकरीच दुर्लक्षित.... !

*****



Scanned with CamScanner



# शेती आणि शेतकरी

– जाधव साक्षी दिपक

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी हा समाजाचा एकमेव घटक आहे कि तो सर्व जगातील माणसांना अन्न पुरवतो. कारण शेतकऱ्याने जर शेतात काम नाही केले तर आपल्याला खाण्यासाठी अन्न येणार तरी कुठून ? शेतकरी हा दिवसरात्र कष्ट, मेहनत, परिश्रम व घामाचे मोती करत तो काम करतच राहतो. त्याला पण आराम करावा वाटत नसेल का ? शेतकरी हा कितीही नुकसान झाली तरी जिद्द सोडत नाही. तो आपली कामे वेळेवर करतच राहतो. मला तर असे वाटते शेतकरी हा फक्त परिश्रम, कष्ट व मेहनत करण्यासाठी जन्म घेतो. शेतकरी हा शेतात धान्य पिकवटतच राहतो. सर्वाचे पोट भरावे यासाठी तो कष्ट करतच राहतो. पण आजकालचे सरकार हे तर जणु झोपलेच आहे. कारण शेतकऱ्यावर किती अन्याय होत आहे पण त्याच्याकडे लक्ष दयायला कोणाकडे वेळंच नाही राहिला. सर्वजण आपल्याकडेच बघते. शेतकरी हा वेळेचे भान न ठेवता दिवसरात्र अपार कष्ट करत राहतो.

शेतकरी हा देवा धरणीची कुस उजवतो. तो किती ही कर्जबाजारी झाला तरी आपले परिश्रम सोडत नाही. तो आपल्या झाडाची पराकष्टा करतच राहतो. शेतकरी हा पिक घेतो पण अचानक खूप पाऊस येतो तर पिकाचे नुकसान होते, तर अचानक पाऊसच येत नाही तर शेतकऱ्याला पिकच घेता येत नाही अशा कारणामुळे शेतकरी आत्महत्याला बळी पडत आहे. शेतकरी होणे म्हणजेच अवघडच आहे. म्हणून मला शेतकऱ्याविषयी आदर वाटतो.

हाडाचे पाणी करून
धरणीची कुस उजवतो.
स्वत: उपाशी राहुन
जगाची भूक भागवतो.

असा हा शेतकरी सर्वासाठी कायम प्रयत्नशील राहतो.

शेतकरी हा समाजाचा सर्वात घाम गाळणारा वर्ग आहे असे मला वाटते. शेतकरी हा बघितला कि असे वाटते जणू धरती माता आनंदी झाली आहे. शेतकरी स्वत: अंगावर फाटके कपडे घालतो तरीही कोणाकडे तक्रार करत नाही. तरी ही तो मिरची आणि भाकर खाऊन दु:खी मनाला हसवण्याचा प्रयत्नात राहतो. त्याला आपल्या कुटुंबातील व्यक्तीना अन्न पुरवण्यासाठी का इतके परिश्रम करावा लागतात ? शेतकऱ्याविषयी तर आता असे वाटते –

'रक्ताच पाणी करून,
देवा धरणीची कुस उजवतो.
र्धपोटी उपाशी राहून
देवा जगाची भूक भागवतो.
जीर्ण त्याच्या देहाला
देवा झाकायला कापड नाही.
कर्जाच्या कापडाचे थिगळ
देवा टिकता टिकत नाही.'



Scanned with CamScanner

निवडणुकाच्या प्रचारात त्याच्यावर
देवा आश्वासनांचा पाऊस पडतो.
सरकार स्थापन झाल्यावर
देवा आश्वासनांचा विसर पडतो.
कर्जबाजारीपणा त्याच्या
देवा संसाराची होळी होते.
लेकरे त्याची पोरकी
देवा बायको विधवा होते.
गरीबीची त्याच्या अंधार
देवा मिटता मिटत नाही.
आयुष्याला लागलेल सुबक
देवा फिटता फिटत नाही.
मिरची भाकर खाण्यासाठी
देवा मिळता मिळत नाही.
हाताच्या रेषा
देवा पुसता पुस्त नाही.

*****

## २३ डिसेंबर शेतकरी दिन

कडाक्याचे ऊन असो
वा सोसाट्याचा वारा
किंवा बरसत असो
पावसाच्या ओल्याचिंब धारा....
आमचा बळीराजा शेतात
दिवसभर राबतो
त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत
हे एकच मागणे मागतो ....

– स्वाती पाचोरकर

*****

## बाप माझा शेतकरी

रात दिस मेहनत करी
खाई कष्टाची भाकरी
पोहचो ही दुनिया सारी
बाप माझा शेतकरी !!
त्याला साऱ्या दुनियाचा घोर
म्हणून खाई अर्धीच भाकर
जगा देतो तो पोटभर
ना त्याला सुख तीळभर
त्याच्याच कष्टाच खाती सारी
बाप माझा शेतकरी !!
त्याच्या मुळेच सार जग
ना दिसती त्याच कुणा दु:ख
त्याचच खाऊन; सर्वा सुख
त्याच्याच नशीबी आलय दु:ख
रात दिस ढेकळात मरी
बाप माझा शेतकरी !!
काळ्या मातीची त्याची खाणं
राबी त्याच्यात विसरून भान
घेऊन वाडवडिलांची आण
काढी त्यातुन हिरव सोन
नसे त्याला किमत जरी
बाप माझा शेतकरी !!

– घुले चेतन माणिक

*****



Scanned with CamScanner



# शेती... माती... आणि माणसे !

– निखाडे मनिषा सुभाष

शेती ही प्रगतशील औद्योगिक वाटचाल आहे. शेती हा आपल्या भारताचा प्रमुख व्यवसाय म्हणुन देखील नावारुपास आलेला आहे. शेतीमुळे अनेक व्यवसायाच्या संधी देखील उपलब्ध होतात. शेती हा व्यवसाय प्राचीन काळापासून चालत आलेला वारसा आहे. आपल्या पुर्वेजांनी शेतीचा शोध लावला. तेव्हापासून शेती व्यवसायाला चालना मिळाली व शेती हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो.

शेती म्हणजे व्यवसायाची नवीन वाटचाल. शेतीमुळे आपल्याला आपल्या व इतरांच्या गरजा भागवता येतात. शेतीमुळे आपल्या जीवनातील नवीन वळण मिळते. शेती ही व्यवसायानुरुप आहे. शेतून आपल्याला योग्य तो मोबदला मिळतो. शेतीमुळे लोकांना आपल्या घरातील विकास व देशाचा विकास करता येतो. घरातील लोकांना योग्य त्या सुख-सुविधा देणे व देशाच्या विकासासाठी म्हणजे आपल्या जमिनीतील पीक आपण दुसऱ्याला विकून दळण-वळण करुन देशाच्या विकासाला हातभार लावू शकतो. त्यामुळे नक्कीच देशाचा विकास होईल व देश विकासाच्यादृष्टीने वाटचाल करेनं.

शेती ही विकासाच्या दृष्टीने सर्वात मोठी देणगी आहे. शेतीमुळे विकास घडतो व विकासामुळे शेतीला विशेष प्राधान्य मिळते. शेतीमध्ये अनेक पीके आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी पीके घेतली जातात. त्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी त्या-त्या पिकांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होते व ते पीक बाजारात आपल्याला पाहायला मिळतात हा फायदा देखील आहे. म्हणुन शेती हा विषय व्यवसायाच्या दृष्टीने प्रगतनशील आहे असे माझे शेती विषयी मत आहे.

शेती ही सामान्य मारसाच्या कष्टाचे फळ करणारे साधन किंवा त्याचे स्वप्नं साकर करण्याचे एक साधन किंवा स्वप्नपुर्ती आहे. त्याने पाहिलेले स्वप्नं त्याला सत्यात उतरवायला मदत करण्याचे साधन म्हणजे शेती आहे. शेतीमुळे तो स्वत:ला लोकांपुढे मांडू शकतो व स्वत:ला स्वत:चीच ओळख गर्वाने देण्यास पात्र होतो व लोकांना दाखवून देऊ शकतो की चांगली शेती म्हणजे काय ? शेती ही सामान्य मारसाला जगायला शिकवते. जसे परिस्थिती माणुस घडवते. तसेच, शेती शेतकरी घडवते व त्याला परिस्थितीशी झुंझायला देखील बळ देते.


शेती लोकांना आत्मबळ देते व त्यांचे ध्येयपुर्तीसाठी मदत करते. शेती ही माणसांना जमिनीशी नात जोडायला शिकवते. त्या त्या आईची सेवा करण्यासाठी तिची हमाली करायला लावते.

अशी ही शेती आणि तिच्याविषयी किती ही सांगितले तरी कमीचं. एकदा शेती करुन बघा तिची किंमत कळेलं आणि जो शेती करतो त्याची देखील.....!

*****



Scanned with CamScanner



# भारतीय शेतीपुढील आव्हाणे !

- कोठुळे चंचल सुभाष

शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वत:च्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करता येईल.

उत्पादनावरुन शेतीचे ऊसमळा, भात शेती, पशुधनप्रधान शेती, मत्स्य शेती इत्यादी निरनिराळे प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. तसेच सिंचनाच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती जिरायती शेती असेही प्रकार पडतात. खतांच्या वापरानुसार सेंद्रिय शेती, रासायनिक शेती असे प्रकारसुद्धा अस्तित्वात आले आहेत. स्थुलमानाने नैसर्गिक आणि आर्थिक घटकांमुळे शेतीच्या प्रकारात बदल होतात. भारतामधील शेती हा खुप महत्त्वाचा भाग आहे. नैसर्गिक किंवा प्राकृतिक घटक हे वर्षावर्षाला बदलत नाहीत. त्यांच्यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हवामान, जमीन आणि भूरचना हे होत. एखाद्या विवक्षित विभागात कोणते पिक येऊ शकेल हे या घटकांवर अवलंबून असते. कमी पावसाच्या प्रदेशात जर सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले तर बागायती कपाशी आणि तीळ व ऊसासारखी दीर्घमुदतीची पिके उत्तमरितीने येऊ शकतात. त्या ठिकाणी अशा तऱ्हेने पुर्वी अस्तित्वात नसलेला असा शेतीचा व्यवहार्य प्रकार निर्माण होऊ शकतो. भात शेती आणि उष्ण कटिबंधातील फळबागांची शेती कोकणात शक्य आहे.

लहरी निसर्ग आणि रोजगाराच्या अत्यल्प संधी यामुळे छोट्या शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. शेतकऱ्या वरील हे संकट दूर करण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे असल्याने शेती उत्पादकतेविषयी नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या शोधनिबंधात नमुद केले आहे.

शेती क्षेत्रावरील अरिष्टाची छाया गडद होत असल्याचे आपल्या निदर्शनास येते. या अरिष्टामागची कारणे जाणून घेवून ती दूर करण्यासाठी उपाय सुचविण्याऐवजी या आरिष्टाची लक्षणे उद्धत करण्याची अहमहमिय का सुरू आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हे त्याचे द्योतक आहे. आणि ४० टक्के शेतकरी त्यांना शेतीक्षेत्राबाहेर रोजगार उपलब्ध झाला तर तो स्वीकारण्यासाठी आता उत्सुक आहेत. अशा स्वरूपाची विधाने वारंवार केली जातात. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट शेती अशी व्यवस्था आता दृढ झाली आहे असे वारंवार सांगितले जाते.

औद्योगिकीकरण प्रक्रियेने वेग घेतल्यानंतर आणि विशेषकरून औद्योगिक क्षेत्रात उत्पादकता वाढविण्यासाठी दररोज नवीन तंत्राचा वापर करण्याचे प्रक्रिया रुढ झाल्यातर तशा स्वरूपाचे बदल न होणारे शेती क्षेत्र हे मागे पडणे ही स्वाभाविक प्रक्रिया मानायला हवी. अर्थात असे असले तरी अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी शासनकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे ठरते. अन्यथा भारतासारख्या खंडप्राय असणाऱ्या व लोकसंख्या प्रचंड असणाऱ्या देशामध्ये एकूण अर्थव्यवस्थात धोक्यात येईल. भारतातील शेती क्षेत्रावरील अरिव्हामागचे मुलभूत कारण शेती क्षेत्रामधील



Scanned with CamScanner

उत्पादकता खुपच कमी आहे हेच आहे. नीती आयोगाने १६ डिसेंबरला प्रसिद्ध केलेल्या संशोधनपर निबंधानुसार भारतात दर हेक्टरी तांदळाचे उत्पादन ३७२१ किलो एवढे मर्यादित आहे. त्याचवेळी चीन, इंडोनेशिया, बांग्लादेश व व्हिएतनाम या देशांतील तांदळाचे दर हेक्टरी उत्पादन अनुक्रमे ६७७५, ५१३६, ४४२१ आणि ५६२१ किलो असल्याचे निदर्शनास आले. भारतामधील एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या साठ सत्तर क्षेत्रावर भाताचा पेरा केला जातो, ही बाब लाजस्पत म्हणजे धान्योत्पादनाच्या संदर्भात भारतीय शेतीची उत्पादकता लक्षणीय प्रमाणात कमी असल्याच्या विधानास दुजोरा मिळतो.

थोडक्यात भारतीय शेती क्षेत्रात जवळपास सर्व पिकांची उत्पादकता जागतिक पातळीपेक्षा लक्षणीय प्रमाणात कमी राहिल्यामुळे भारतातील शेतकरी गरीब आहे. अशा शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतमालाचे दर हेक्टरी उत्पादन वाढविणे हा विवेकी पर्याय झाला; परंतु त्याचा विचारही न करता सरकारने शेतमालाचे भाव वाढवावेत, अशी मागणी शेतकऱ्यांच्या नेत्यांनी केली. औद्योगिक भांडवलदारांचाही या मागणीला विरोध नव्हता. कारण शेतकऱ्यांचे नगदी उत्पन्न वाढले तर त्यांच्या मालाला देशांतर्गत बाजारात असणारी मागणी वाढणार होती. राज्यकर्त्यांनीही असे धोरण राबवून निवडणूकीच्या रिंगणात लाभ होणार होता. त्यामुळे संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या कारकिर्दीत धान्याचे भाव सातत्याने वाढविण्यात आले. परिणामी महागाईचा आगडोंब उसळला ! त्यात देशातील गोरगरीब लोक आगडोंब उसळला! त्यात देशातील गोरगरीब लोक म्हणजे प्रामुख्याने असंघटित शेतात राबणारे मजूर यांची होरपळ झोतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी राज्यकर्त्यांनी त्यांच्यावर अनेक सवलतींचा वर्षाव केला. उदा. रासायनिक खतांच्या किंमती कृत्रिमरित्या कमी ठेवण्यासाठी केंद्र शासनाने वर्षाला सुमारे ७०,००० कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य रासायनिक खतांचे उत्पादन करणाऱ्या उदयोगाला दिले.

सरकारने अशी वारेमाप उथलनी केल्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासासाठी संशोधन व विस्तार कार्यक्रमावर खर्च करायला सरकारकडे पैसा उरलेला नाही आणि अशी गुंतवणूक केल्याशिवाय शेती क्षेत्राला उत्पादकता वाढणार नाही. थोडक्यात ही श्रृंगापती आले. भविष्यात हा पेच कोण आणि कसा सोडविणार हे पाहणे चित्तवेधक ठरणार आहे. सरकारची तिजोरी रिकामी असल्यामुळे सरकार रस्ते बांधणे, रेल्वेचे जाळे विस्तारणे, विद्युत प्रकल्प उभारणे अशा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणूक करू शकत नाही आणि अशा पायाभूत सुविधांच्या निर्मितीशिवाय औद्योगिकीकरणाला चालना मिळू शकत नाही. हा आपल्या अर्थव्यवस्थेतील दुसरा पेच आहे. औद्योगिक क्षेत्राच्या वाढीला गती प्राप्त झाल्याशिवाय शेती क्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळाला उत्पादक रोजगार उपलब्ध होणार नाही ही बाब तर उघडच आहे.

वरील सर्व विवेचन साकल्याने विचारात घेतले तर शेती क्षेत्रामधील उत्पादकता वाढविण्याच्या कार्यक्रमाला प्राधान्य मिळायला हवे. भारतातील संरक्षक सिंचनाची जोड मिळाली तर शेती क्षेत्रातील उत्पादन वाढले तर शेतमालाचे भाव न वाढवता ही शेतकऱ्यांना चार चव्वल अधिक मिळतील. अन्नधान्याचे उत्पादन वाढले, की शेतकऱ्यांना दोन वेळच्या जेवणाची शाश्वती लाभेल. अर्थात असा बदल होण्यासाठी सरकारला खास प्रयत्न करावे लागतील. शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढेल तेव्हाच शेती करणे किफायतशीर होईल. मोदी सरकार या दिशेने कशी वाटचाल करते ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

*****



Scanned with CamScanner



# द्राक्ष शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान

- कु. निखाडे माधुरी विजय

वडनेर भैरव परिसरात मोठ्या प्रमाणावर घेण्यात येणारे फळपीक म्हणजे द्राक्षे. द्राक्ष उत्पादनात 'गुणवत्ता व उत्पादक' या दोन्ही बाबींमध्ये वडनेरकर अव्वल आहेत. परिसरातील पिंपळगाव बसवंत, उगांव, खेडगाव ओझर, लासलगांव, इत्यादी सर्व ठिकाणच्या बाजारभावापेक्षा वडनेरच्या द्राक्षांना सर्वोत्तम भाव असतो. म्हणूनच अगदी गरीब शेतकऱ्यांपासून ते खुप मोठे बागाईतदार, निर्यातदार यांच्या जिव्हाळ्याचे पीक म्हणजे द्राक्षपीक होय. द्राक्ष उत्पादनाचा फक्त उत्पादकांसाठीच फायदा आहे असे नसून या पिकामुळे शेतमजूर, रासायनिक खते, किटकनाशके, विक्रेते, पॅकींग मटेरियल विक्रेते, निर्माते द्राक्ष खरेदीवर (व्यापारी), द्राक्षे हुंडी तसेच पॅकींग करणारे मजूर, इत्यादी घटकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होतो. असे द्राक्ष पिक व त्याविषयी आणखी थोडी माहिती.

**जमीन :-**

द्राक्षबागेसाठी उत्तम निचरा होणारी काळी कसदार, तांबडी मध्यम मुरमाड, जांभी, गाळाची अशा प्रकारची जमीन चालते. फक्त चुनखड जमिनीत द्राक्षे चांगले येत नाही. (पी.एच.६.५ ते ७.५ पर्यंत)

**हवामान :-**

उष्ण व कोरड्या हवामानात द्राक्ष वेलीची वाढ चांगली होते. सरासरी किमान तापमान १० से ते कमाल ३५ ते ४० अंश से. द्राक्षास मानवते व उत्पादन चांगले येते.

**लागवड पद्धती :-**

पूर्व साधारणपणे १० बाय १० फुटावर द्राक्ष लागवड केली जात असे. शास्त्रीय दृष्टीने हे अंतर योग्य असले तरी अलीकडे वाढती लोकसंख्या, स्पर्धेच्या युगात झटपट उत्पन्न वाढीसाठी ५ फुट बाय ९ फुट किंवा ५ फुट बाय ८ फुट 'वाय' पद्धती लागवडीसाठी वापरतात.

**सुधारित जाती :-**

महाराष्ट्रात तसेच आपल्या परिसरात थामसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक चमन, क्लोन-२ इथलीय थॉमसन या हिरव्या जातींची लागवड केली जाते. तर शरद सिडलेस, फ्लेम सिडलेस, नानासाहेब पर्पल, रेड ग्लोब, जंबो ब्लॅक, काळी सोनाका, इत्यादी रंगीत द्राक्षे लागवड करतात.

**द्राक्षावरील किडी व रोग :-**

द्राक्षांवर काही रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रार्दुभाव होतो. यामध्ये साखऱ्या, डाऊनी मिल्ड्यू, भुरी (पावडर मिल्डू), मर, फळकुज.

**किडी :-**

द्राक्षांवर येणाऱ्या मुखय किडी - भुगेंरे (उदड्या), मावा, तुडतुडे (थ्रीप्स) खेडकिडी, मिलीबग, फळ व शेंडा खाणारी अळी, इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होतो. या रोग व किडींचे नियंत्रण करणे ही शेतकऱ्यांपुढे मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण दरवर्षी अतिप्रमाणात होणारा रासायनिक



Scanned with CamScanner

किटकनाशकांचा भडीमार व किडींची वाढती प्रतिकार शक्ती. त्यामुळे पारंपारिक पद्धतीने नियंत्रण मिळवणे जिकरीचे झाले आहे. यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन, जैविक पद्धतींचा वापर करणे गरजेचे आहे.

सततच्या आंतरप्रवाही औषधांमुळे, वेलीची रोग प्रतिकार शक्ती कमी होते म्हणून औषधांचा वापर नियंत्रित व योग्य पद्धतीने करावा.

**पाणी :-**

द्राक्षे कमी पाण्यावर ही अलीकडे पिकवतात. उत्पादन खर्च व उत्पन्न खर्च दिवसेंदिवस वाढतच चालला आहे व तुलनात्मक उत्पन्न घटत चालले आहे.

**त्याची थोडक्यात कारणे -**

(१) वाढते लागवडीखालील क्षेत्र, (२) वाढती मजूरी वरील उत्पादन खर्च, (३) बदलते हवामान, (४) रासायनिक खते चढत्या किंमती, (५) सेंद्रीय खते, गाय खत यांचा तुटवडा, (६) यांत्रिक शेतीमुळे घटणारी पशु संख्या, (७) शासनाची उदासिनता, (८) निर्यतक्षम द्राक्ष निर्मितीत व निर्यातित येणाऱ्या अडचणी, इत्यादी.

अशा अनेक अडचणींना तोंड देऊनही द्राक्ष बागायतदार चांगल्या प्रतीचे उत्पन्न काढतात. त्यासाठी भांडवलाची उपलब्धता परिसरातील विविध कार्यकारी पतसंस्था, बँका मोठ्या उत्साहाने पतपुरवठा करतात. शेतकरी विविध योजनांचा लाभ घेत असले तरी इतर पिकांप्रमाणे द्राक्ष विक्री ही स्थानिक बाजारपेठेत विकत नसल्यामुळे शिवार खरेदी मोठ्या प्रमाणात होते. यामध्ये व्यापारी रक्कम घेऊन पसार होण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे. शासनाने यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे. अशा प्रकारे पारंपारिक पद्धतीमध्ये बदल करुन भरघोस द्राक्ष उत्पन्न शेतकऱ्यांनी काढावे, ही शुभेच्छा....

*****

## माझा बाप शेतकरी

जन्मतो तो पृथ्वीवर अन्नदाता म्हणूनी
त्या अन्नाच्या कणांसाठी मात्र तोच झटतो
घेऊन डोक्यावर कर्ज,
त्याला कष्ट पेलावे लागते
ऊन, वारा, पाऊस,
पाणी याचे त्याला भान नसते
पिकाच्या प्रत्येक कणाला
त्याला छातीस लावावे लागते.
येवढे करुनही त्याच्या नशिबी काय येते ?
येते ती फक्त आत्महत्या !!
का तो शेतकरी आजही
पारतंत्र्यात अडकलाय ?
का तो शेतकरी अन्नदाता बनलाय ?
का त्याच्या जगण्याचा अधिकार
हिरावुन घेतलाय ?
का सगळ्यांचे पुण्य घेणारा
आज अपराधी बनलायं ?
का देवा तु असा छळ करतोय,
परिश्रम जो करतो
त्याला मजबुर तु करतोस ?
हाच तुझा न्याय असेल तर
तो शेतकरी तरी काय करेल ?
मग तुझ्यां या चिमुरड्याचं पोट कोण भरेल ?

– सातभाई भारती

*****



Scanned with CamScanner



# शेतकरी सुखी तर जग सुखी !

– तिडके पूनम केदू

'शेतकरी सुखी तर जग सुखी' खरचं जर शेतकऱ्याने धान्य पिकवलेच नाही तर आपण काय खाणार ? आपण या लेखामध्ये शेतकऱ्यांविषयीचे विचार, माहिती लेख पाहणार आहोत. आपला शेतकरी, माझा शेतकरी बांधव, किती आपुलकी आहे या शब्दांमध्ये. आपला भारत देश हा ऐंशी टक्के कृषीप्रधान आहे. भरपूर लोकांचा शेती हा परंपरेने चालत आलेला व्यवसाय आहे. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह होतो. जर आपल्या या शेतकरी बांधवाने शेतात काही पिकवले नाही तर आपण काय खाणार ? आपण कसे जगणार ? पण त्याच्या या कष्टाला आणि मेहनतीला म्हणजेच त्याच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. त्याला बऱ्याच नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. जसे की कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ तर कधी वादळ यामुळे शेतीचे बरेच नुकसान होते. त्यामुळेच तर आपला शेतकरी बांधव हा आत्महत्त्येचा मार्ग अवलंबवतो. पण यावर आपण सर्वांनी मिळून काही तरी केले पाहिजे. आपला हा शेतकरी बांधव रात्रंदिवस शेतात राबतो. म्हणूनच तर 'मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे मोती। मेरे देश की धरती' यासारख्या ओळी आपल्या ओठांवर सहज येतात. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' 'जिथे राबती हाथ तेथे हरी' अशी शेतीच्या महतीची वचने आपण नेहमी ऐकतो, बोलतो व कौतुकाने लिहितो. परंतु शाळेतील परीक्षांमधील गुणवंताच्या तोंडून मी डॉक्टर, मी इंजिनियर होणार अशा महत्त्वाकांक्षा बाहेर पडतात पण यापैकी कोणीच 'मी एक आदर्श शेतकरी होणार....' आणि माझे जीवन शेतामध्ये झोकून देणार असे कोणीच म्हणत नाही.

शेतकरी म्हणजे दुय्यम समाज असा दृष्टिकोन आजच्या या नवीन पिढीचा झाला आहे. 'जय जवान जय किसान' म्हणून आपण शेतकऱ्यांना गौरवितो. पण त्या शेतकऱ्यांच्या जीवनाचा त्यांच्या अडचणींचा आपण कधीच विचार करत नाही. आपल्या या मातृभूमीसाठी, देशासाठी अन्नधान्य पिकवणारा, सुजलाम सुफलाम धरती बनवणारा हा शेतकरी स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी रात्रंदिवस शेतात राबतो. परंतु दोन वेळचे पोटभर अन्नही त्याच्या वाट्याला येत नाही. आणि ऐशआरामाचे जीवन ही तो जणू शकत नाही. शेतमालाला मिळेल तो दर, सरकारचे वेगवेगळे कर, कायदे यामुळे त्याच्या एकूण उत्पन्नाच्या सहा टक्के उत्पन्नही त्याला मिळत नाही. परंतु या सर्व शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील नफ्याला चटावलेला, सर्व नियम, कायदेकानून खिशात घेऊन फिरणारा आणि पैशाने लालची झालेला व्यापारी या गरीब शेतकऱ्याला पिळत असतो नागवत असतो.

अंग मेहनत करून ही त्याच्या कष्टाला मोल राहत नाही. असा हा असहाय्य शेतकरी एकदम खचलेला असतो. व्यापारी, दलाल मात्र कष्ट न करताही पैसे लुबाडत असतात. आणि शेतकऱ्याचा माल कमीतकमी किमतीत खरेदी करून आपल्या शेतकरी



Scanned with CamScanner

बांधवाला नाराज करतात. त्यामुळे त्याच्या कष्टाला किंमत राहत नाही.

शेतकऱ्याला शेतीपासून जास्त उत्पादन घेण्यासाठी चांगले बी-बियाणे, खते, यंत्रणा आणि शेतीचे व्यवस्थित नियोजन आवश्यक असते. सहकार्याचा अभाव तसेच भांडवल नसल्यामुळे अज्ञानी, त्यामुळे कर्जबाजारी शेतकरी निगर्सापुढे मात करू शकत नाही. शेती पिकवण्यासाठी आणि जास्त फायदा मिळवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान नाही. 'भारत हा खेड्यांचा देश आहे.' किंवा ऐंशी टक्के भारतातील लोक खेड्यात राहतात. 'खेड्यांकडे चला' म्हणजेच खेड्यांचा विकास करा असे गांधीजी म्हणत असत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे व आधुनिक तंत्रज्ञानामुळे समाजजीवनाचा पूर्ण कायापालट झाला आहे. आधुनिक शेती शिक्षणासाठी अनेक कृषी विद्यापीठे सज्ज झाली आहेत.

'आमची शेती आमची माती
पिकवू येथे माणिक मोती'

या जिद्दीने आज भारतीय शेतकरी प्रगती करत आहे. सरकारी पातळीवर जाहीर होणाऱ्या विविध सुविधांच्या कार्यावाहीतून भारतीय शेती व्यवसाय संपन्न करण्याचा प्रयत्न एकीकडे चालला आहे.

शेतकऱ्याप्रमाणेच आपणही ही धरती सुजलाम सुफलाम बनवूया.

*****

## बाप माझा शेतकरी

बापाला माझ्या राजा बनवून दुनियेत हा खेळ शेतीचा वाढविला
राजा नव्हता कधी राजा म्हणून छळ मात्र चालविला
हाती नव्हताच कधी व्यापार आणि दुय्यम नोकरी
हाती होती फक्त शेती उत्तम म्हणून छळ का चालविला
मान नाही सन्मान नाही. सत्ता नाही कसा हा राजा
पाहा कष्ट करूनही हाती मात्र काही नाही.....
शेतकऱ्यांची मुले आम्ही म्हणुन जगतोय उपाशी
अनुदानाच्या नावाखाली नेते खातात तुपाशी
इंग्रज गेले स्वातंत्र्य आलो, घेतल्या सुटकेचा श्वास
देशाचा हा अन्नदाता मात्र लावून घेतो मृत्युचा फास
शिक्षण ही नाही सोबत ना आधुनिक यंत्र ना भांडवल
स्वत:च्या कष्टावर निसर्गाच्या कृपेवर हा बाप माझा आहे निराधार
फौजी लढतो देशासाठी, नेता लढतो सत्तेसाठी
बाप माझा लढतो सर्वासाठी, पण मरतो फक्त स्वत:साठी
नेता नाही, नेतृत्व नाही, नाही कोणी मदतगार
कर्जमाफीसाठी दरवर्षी, झिजवितो दिवाणी दरबार
अनुदान व बँकेची आश्वासने मोठी सारी
दिवसरात्र कष्ट करूणी गरिबीच नशीबी आली
लोकशाहीचा देश हा सर्वांचा समान विकास
दलाल येथे श्रीमंत होती, पण शेतकरी बाप माझा होतो भकास
देशाचे पोशिंदे आम्ही, दर्जा आमचा सर्वांहूनही लहान
कसे म्हणावे स्वातंत्र्य याला, कसा हा शेतकरी महान

– चेतन मारिक घुले

*****



Scanned with CamScanner



# शेतकऱ्याचे प्रश्न मार्गी लागतील का ?

– जाधव प्रतिक्षा नंदू

इयत्ता पाचवीच्या वर्गात मराठी विषयाचे शिक्षक इंद्रजित भालेरावांची बाप कविता शिकवत होते.

'शेतामध्ये माझी खोप, तिला बोराटीची झाप.
तिथे राबतो कष्टतो, माझा शेतकरी बाप
लेतो अंगावर चिंध्या, खातो मिरची भाकर
माझा बाप शेतकरी, उभ्या जगाचा चाकर'

कविता शिकवून संपते. नंतर गुरुजी मुलांना प्रश्न विचारतात मुलांनो, काही प्रश्न कवितेबद्दल कुणाला काही शंका, कधीही हात न वर करणारा कोपऱ्यात बसणाऱ्या एका सर्वसामान्य शेतकऱ्याचा नामदेव नावाचा मुलगा उभा राहीला आणि म्हणु लागला गुरुजी मला कविता समजली. तुमच्या कवितेतला शेतकरी बाप व माझ्या वास्तवातला शेतकरी बाप मला डिक्टो दिसु लागले. गुरुजी फक्त मला एक सांगा, गुरुजी तुमच्या कवितेतला बाप रात्रंदिवस कष्ट करतो. माझ्या आयुष्यातला जगण्यातला बाप सुद्धा रात्रंदिवस कष्ट करतो. तुमच्या कवितेतील बापाची काया आणि माझ्या आयुष्यातील जगण्यावरील बापाची व्यथा कधी संपेल. गुरुजी निरुत्तरीत झाले. प्रश्न निरुत्तरीत राहीला आणि तोच निरुत्तरीत प्रश्न घेऊन रात्रंदिवस कबाडकष्ट करणाऱ्या जगाचा पोशिंदा शेतकऱ्याची मुलगी तुमच्यासमोर विषय घेऊन उभी आहे. 'शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागतील का ? मध्यंतरी मराठवाडा, विदर्भ व खानदेशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या करत होते. त्यावेळेस भारताच्या कृषिमंत्र्यांना एका पत्रकाराने प्रश्न विचाराला की कृषिमंत्री साहेब आज ..... सर्वाधिक शेतकरी बांधव आत्महत्या करता आहेत. यामागील कारण काय ? त्यावर तुमच म्हणण काय. त्यावेळेस पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर देताना भारताचे महामायी कृषीमंत्री म्हणतात की, मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील शेतकरी सर्वाधिक आत्महत्या करतात त्यांच्या प्रेम प्रकरणामुळे आणि दारुमुळे. हा पत्रकार हाच प्रश्न घेऊन मराठवाड्यांत जातो. मराठवाड्यातील एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाला विचारतो, की बाबा रे तुझ्या वडीलांना आत्महत्या केली. प्रेम प्रकरणामुळे अस भारताच्या कृषिमंत्र्यांच म्हणण आहे. यावर तुझ म्हणण काय ? त्यावर तो मुलगा म्हणतो, बरोबर आहे पत्रकार साहेब. माझ्या बापान आत्महत्या केली प्रेम प्रकरणामुळं पण त्यांना कळल ते प्रेमप्रकरण बायाबापड्यांच असाव पण मला कळल ते प्रेमप्रकरण माझ्या बापानं या काळ्याआईवर लाखो वर्षी एक तर्फी प्रेम प्रकरण केल. आकाशातून पाऊस पडत नाही. जमिनीतून हिरवं सोनं उगवत नाही. सहाजिकच ना माझ्या बापाची प्रेमकहाणी अपुरी राहीली यावर कवितेला समर्पक उरण्यासाठी माझा मराठवाड्याचा कविबंधू म्हणतो,

'प्यावा वाटत नाही विशाचा घोट,
पण काय कराव माय बाप सरकार
मातीच्या वासान कधी भरत काव पोट'

महात्मा फुले नावाच्या महामानवान राणी व्हिक्टोरियेच्या दरबारात जाऊन खडसावून सांगितलं होत. भारत देशाची ध्येय गोळा ठरावायची असतील तर सुटा-बुटातील वावणाऱ्या माणसाकडं पाहून कधीच ठरवू नका. शेतात अनवाणी पायानं, घाम गाळणाऱ्या,

कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याकडे पाहून ठरवा: पण आजही भारताची ध्येयगोळा ठरवली जातात. मुंबईला आर्थिक निर्देशंकाची इमारत आहे. बँका त्या इमारतीच्या बाहेर एका बैलाचे चित्र आहे. बैलाने उडी मारली की निर्देशांक उंचावतो व बैलाने मान खाली घातली की निर्देशांक मंदावतो. ही इथली भारताला जन्माला घालणारा शेतकऱ्याचा कणा मोडण्याचा काम करत आहे.

इंद्रजीत भालेराव नावाचे एक कवी स्वत:च्याच कवितेत समीक्षण करताना जावे कवितांच्या गावा नावाच्या पुस्तकामध्ये म्हणतात की बापा स्वत:च्या डोक्यावरच्या कर्जाला पाप समजणारा पुण्यवंत आत्मा तुझ्याच शरीरात का जन्म घेतो तो आत्मा इंजिनियर, डॉक्टर, वकिल यांच्या शरिरात का जन्म घेत नाही. ज्या ज्या वेळी हा आत्मा इंजिनिअर, डॉक्टर, वकिल यांच्या शरिरात जन्म घ्यायला लागेल ना त्यावेळेस यांना शेतकरी आत्महत्या का करतो ? कुणासाठी करतो ? कशासाठी करतो ? या प्रश्नांची उत्तरे इथल्या व्यवस्थेला मिळाल्याशिवाय राहणार नाही. ही व्यवस्था शेतकऱ्यांचे पोट भरु शकत नाही पण शेतकरी हा नक्की ह्या व्यवस्थेच पोट भरु शकतो. पण व्यवस्थेला जर स्वत:च पोट वेळो वेळी भरायच असेल तर शेतकरी ज्या वेळेस रस्त्यावर उतरला त्यावेळेस स्वत:च पोट भु शकत नव्हता. म्हणून रस्त्यावर उतरला हा शेतकरी औरंगाबादला रस्त्यावर उतरला. त्याच्या अंगावर डांबर फेकण्यात आले. हा शेतकरी बारामतीला जेव्हा रस्त्यावर उतरला त्याच्या अंगावर पाणी मारण्यात आले. कराडमध्ये रस्त्यावर आला त्याच्या अंगावर शाही फेकण्यात आली आणि पुण्यामध्ये मावळ प्रांतामध्ये उतरला तेव्हा त्याच्या अंगावर लाठीमार आणि गोळी हल्ला करण्यात आला. म्हणजेच स्वत:च्या न्यायहक्कासाठी ज्यावेळेस शेतकरी रस्त्यावर उतरला त्यावेळेस त्याला शिव्यांच्या लाखोल्या वाहण्यात आल्या.

शेतकरी नावाचे शस्त्र वापरून निवडणुकीच्या तोंडावर कर्जमाफी करतो असे सांगून निवडणुका लढवतात. पण मात्र सत्ता हाती आल्यानंतर तो विसरून जातात. मग सांगा मायबाप मला सुलीला का शेतकऱ्याचे प्रश्न होईल का हा बळीराजा सुखी.

दिवाळीच्या वेळीस माझी आत्या माझ्या शेतकरी बापाला ओवळताना म्हणते देवा रे इडा पिडा जाऊ दे आणि माझ्या भावाचच म्हणजेच या बळीराजाच राज्य येऊ दे. येईल का ओ मग माझ्या या शेतकरी बापाच, बळीराजाच राज्य येईल का ? सुखावेल का माझा शेतकरी बाप ?

खऱ्या अर्थाने या शेतकऱ्याच्या मुलीला अस वाटत माझ्या शेतकरी राजाचे प्रश्न तेव्हाच सुटतील जेव्हा खऱ्या अर्थाने या देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती या राज्याचे मुख्यमंत्री, आमदार, खासदार हे एक शेतकरी होईल. देशाची सत्ता एका शेतकऱ्याच्या हाती येईल आणि याचबरोबर भाषणाचा शेवट करताना मांडून जाते शेतकऱ्याची व्यथा स्पष्ट करणाऱ्या माझ्या शेतकरी बहिणीनी लिहिलेल्या कवितेचा चार ओळी –

'तुमच्या सजीव तोंडातल्या निर्जीव घोषणांवर तुम्ही चार वर्षे प्रपंच भागवला ।

तुम्ही शेतकऱ्यालाच चार वर्षात इतके श्रीमंत केलं की आता शेतकरीच तुम्हाला मनीऑर्डर पाठवू लागलाय भिकारी पण घेणार नाही.

इतका भाव तुम्ही आमच्या पिकाला दिला. त्याच्या गगनभर दु:खाला तुम्ही वेदनेचाच.

बाम लावताय निवडणुकी तुम्ही भलेही जिंका पण शेतकऱ्याच्याच नजरेतुन तुम्ही काळ्या आईला हरवताय तुमच्या या वागणुकीमुळे तुम्ही राज्यातल्या शेतकऱ्याला आणि स्वत:च्याच अन्नातल्या ताटाला सरकवतात.'

*****



Scanned with CamScanner



# होय मी शेतकरी होणार.... !

– निखाडे मनिषा सुभाष

मी शेतकरी या जगाचा पोशिंदा माझ्या माळी कामधंदाचं लिहिलाय पण मला स्वत:च खुप अभिमान वाटतो. कारण मी या जगाची भुक भागवितो आणि या जगाचा पालनकर्ता म्हणुन नावारूपास येतो. मी शेतात घाम गाळून कष्ट करून या धरणी मातेची चाकरी करून भुकेल्यांची भुक मिटवायची आहे आणि माझ्या बांधवांना कधीचं भुक म्हणजे काय असते. याची जाणीव येऊ देणार नाही. भुकेल्यांना सुखाचे दोन घास भरविणं. होय मी शेतकरी होणार....

आई आपल्या लेकरांना प्रेमाने वाढविते त्यांचा सांभाळ करते. तसेच मी माझ्या शेतातील पीकाला माझ्या लेकराप्रमाणे वाढविणं त्यांना माया लावीनं. त्यांचा सांभाळ करीनं. धरणीमाता जशी आई तशीचं आपल्या संतांच्या भुमीला लाभलेली संत बहीणाबाई यांच्या कवितेतुन शेतकऱ्याला स्वता:चा अभिमान वाटतो. त्यातील एक कविता मला आठवते.

' येहेरीत दोन मोटा
दोन्ही मधी पानी एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक '

मला गर्व आहे मी शेतकरी आहे. मला या धरणी मातेची सेवा करायची संधी मिळाली आणि त्या संधीचं मला सोनं करायचं आहे. मला जगाकडून पोशिंदा हे नाव मिळालं. त्या नावामुळे आज मी पालनकर्ता म्हणून देखील नावारूपास आलो. याचा मला खुप अभिमान वाटतो. मला निर्सगाशी एकरूप व्हायला आवडेलं. त्याच्यात रमायला आवडेनं आणि माझ्या धरणी मातेच्या कुशीत एक छोटसं बी पेरायला आवडेनं आणि ते बी मी खुप जीव लावून वाढविणं. आणि त्याचा खुप मोठा वृक्ष बनेन.

माझी धरणी माता जे दु:ख सहन करते त्याची मला जाणीव आहे. ती किती कष्ट सहन करते पण आपल्या कुशीत असलेल्या बीयाला मी जीवापलीकडे जपते. त्याला वाढविते. तेव्हा ती त्याचा मोठा वृक्ष बनविते.

अन्न तयार करण्यासाठी जी माती कष्ट सहन करते. मला तिचं सोनं करायचं आहे. ती पावसात भिजते, नागरांचे घाव सहन करते. थंडी सहन करते. पण ती त्या वृक्षाला मात्र कशाशीच झळ लागू देत नाही. आणि होय मला शेतकरी व्हायला खुप आवडेन. माझ्या धरती मातीची सेवा करायला तिच्या कुशीत मला माझे आयुष्य घालावयाचे आहे. तिच्या सान्निध्यात मला जगाचे कल्याण करायचं आहे. मला शेतकरी होऊन जगाचे दु:ख दुर करायचे आहे. म्हणून मला शेतकरी व्हायचयं, म्हणून मला शेतकरी व्हायचयं.

## चारोळी

**सुखासाठी कधी हसावं लागतं**
**तर कधी रडावं लागतं**
**कारण सुंदर धबधबा बनायाला**
**पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं....**

**– तिडके साक्षी केशव**



Scanned with CamScanner



# द्राक्षशेती - वडनेरकरांची जीवनधारा

- आहेर हर्षाली विजय

वडनेर व परिसरात मोठ्या प्रमाणावर घेण्यात येणारे फळपीक म्हणजे द्राक्षे. द्राक्ष उत्पादनात 'गुणवत्ता व उत्पादक' या दोन्ही बाबींमध्ये वडनेरकर अव्वल आहेत. परिसरातील पिंपळगांव बसवंत, खेडगाव, निफाड, उगांव इत्यादी सर्व ठिकाणच्या बाजारभावापेक्षा वडनेरच्या द्राक्षांना सर्वोत्तम भाव असतो. म्हणुनच अगदी गरीब शेतकऱ्यांपासून ते खुप मोठे बागाईतदार, निर्यातदार यांच्या जिव्हाळ्याचे पीक म्हणजे द्राक्षपीक होय. द्राक्ष उत्पादनाचा फक्त उत्पादकांसाठीच फायदा आहे, असे नसून या पिकामुळे शेतमजूर, रासायनिक खते, किटकनाशके, विक्रेते, पॅकिंग मटेरियल विक्रेते, निर्माता, द्राक्ष खरेदीदार (व्यापारी), द्राक्षे हुंडी तसेच पॅकिंग करणारे मजूर, इत्यादी घटकांना मोठ्या प्रमाणावर मजूर, इत्यादी घटकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होतो. असे द्राक्ष पिक व त्याविषयी आणखी थोडी माहिती -

**जमीन :-**

द्राक्षबागेसाठी उत्तम निचरा होणारी, काळी कसदार, तांबडी मध्यम मुरमाड, जांभी गाळाची अशा प्रकारची जमीन चालते. फक्त चुनखड जमिनीत द्राक्षे चांगले येत नाही.

**हवामान :-**

उष्ण व कोरड्या हवामानात द्राक्ष वेलींची वाढ चांगली होते. सरासरी किमान तापमान १० अंश से. ते कमाल ३५ अंश ते ४० अंश से. द्राक्षास मानवते. उत्पादन चांगले येते.

**लागवड पद्धती :-**

पूर्वी साधारणपणे १० बाय १० फुटावर द्राक्ष लागवड केली जात असे. शास्त्रीय दृष्टीने हे अंतर योग्य असले तरी अलीकडे वाढती लोकसंख्या, स्पर्धेच्या युगात झटपट उत्पन्न वाढीसाठी ५ फुट बाय ९ फुट किंवा ५ फुट बाय ८ फुट वाय पद्धती लागवडीसाठी वापरतात.

**सुधारित जाती :-**

महाराष्ट्रात तसेच आपल्या परिसरात थॉमसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक चमण, क्लोन-२ इथलीय, थॉमसन या हिरव्या जातीची लागवड केली जाते. तर फ्लेम सिडलेस, जंबो ब्लॅक, काळी सोनाका, रेड ग्लोब इत्यादी रंगीत द्राक्षे लागवड करतात.

**किडी :-**

**द्राक्षांवरील किडी व रोग :-**

द्राक्षांवर काही रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होतो. यामध्ये साखऱ्या, डाऊनी मिल्ड्यू, भूरी (पावडर मिल्ड्यू), मर फळकुज. द्राक्षावर येणाऱ्या मुख्य किडी- भुंगेरे (उडद्या) मावा, तुडतुडे (थ्रीप्स) खेडकिडी, मिलीबग, फळ व शेंडा खाणारी अळी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होतो.

या रोग व किडींचे नियंत्रण करणे ही शेतकऱ्यांपुढे मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण दरवर्षी



Scanned with CamScanner

अतिप्रमाणात होणारा रासायनिक किटक नाकांचा भडीमार व किडींची वाढती प्रतिकार शक्ती. त्यामुळे पारंपारिक पद्धतीनी नियंत्रण मिळविणे जिकीरीचे झाले आहे. जैविक पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे.

**पाणी :-**

द्राक्षे कमी पाण्यावर ही अलीकडे पिकवितात. उत्पादन खर्च व उत्पन्न खर्च दिवसेंदिवस वाढतच चालला आहे व तुलनात्मक उत्पन्न घटत चालले आहे.

**त्याची कारणे -**

(१) वाढते लागवडी खालील क्षेत्र (अधिक उत्पन्न - मागणी कमी), (२) वाढती मजुरी वरील उत्पादन खर्च, (३) बदलते हवामान, (४) रासायनिक खते चढत्या किंमती, (५) सेंद्रीय खते, गायखत, यांचा तुटवडा, (६) यांत्रिक शेतीमुळे घटणारी पशु संख्या, (७) शासनाची उदासिनता, (८) द्राक्ष निर्यातीत येणाऱ्या अडचणी इत्यादी.

अशा अनेक अडचणींना तोंड देवूनही द्राक्ष बागायतदार चांगल्या प्रतीचे उत्पन्न काढतात. अशा प्रकारे पारंपारिक पद्धतीमध्ये बदल करून भरघोस द्राक्ष उत्पन्न शेतकऱ्यांनी काढावे.

## चारोळी

कडाक्याचे ऊन असो
वा सोसाट्याचा वारा
किंवा बरसात ओल्याचिंब धारा
आमचा बळीराजा शेतात
दिवसभर राबतो
त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत
हे एकच मागणे मागतो.

- वाटपाडे अंकिता निवृत्ती

## बाप माझा शेतकरी

रात दिस मेहनत करी
खाई कष्टाची भाकरी
पोहचो ही दुनिया सारी
बाप माझा शेतकरी !!

त्याला साऱ्या दुनियाचा घोर
म्हणून खाई अर्धीच भाकर
जगा देतो तो पोटभर
ना त्याला सुख तीळभर
त्याच्याच कष्टाच खाती सारी
बाप माझा शेतकरी !!

त्याच्या मुळेच सार जग
ना दिसती त्याच कुणा दुःख
त्याचच खाऊन सर्वांना सुख
त्याच्याच नशीबी आलय दुःख
रात दिस ढेकळात मरी
बाप माझा शेतकरी !!

काळ्या मातीची त्याची खाणं
राबी त्याच्यात विसरून भान
घेऊन वाडवडिलांची आण
काढी त्यातुन हिरव सोन
नसे त्याला किमत जरी
बाप माझा शेतकरी !!

*****

# महाराष्ट्रातील शेती : समस्या आणि उपाय

- पगार लीना नरहरी



महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट या सदरात मोडणारी आहे. ही वाईट अवस्था २०१४-१५ आणि २०१५-१६ या दोन दुष्काळी वर्षांमुळे निर्माण झालेली नाही. या दोन वर्षांच्या आधी म्हणजेच २०१३-१४ साली पावसाचे प्रमाण जास्त असणाऱ्या वर्षातही येथे धान्यांचे दर हेक्टरी उत्पादन केवळ ११९८ किलो म्हणजेच देशातील सर्वात मोठ्या राज्यांमध्ये किमान असल्याचे नीती आयोगाने दाखवून दिले आहे. थोडक्यात शेती क्षेत्राचे दर हेक्टरही उत्पादन कमी. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी म्हणून वाढत्या प्रमाणात कर्जबाजारीपणा आणि या दुष्टचक्राचा अंतिम परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणांवर आत्महत्त्या अशी स्थिती दोन दशकांहूनही जास्त काळ राहिलेली दिसते. १९९५ पासून क्राइम ब्युरोने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची राज्यांगणिक आकडेवारी प्रसिद्ध करायला सुरुवात केल्यापासून आजपर्यंत प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचा आकडा इतर राज्यांच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात जास्त असल्याने निदर्शनास येते. एकदा हे वास्तव नीटपणे जाणून घेतले की कर्जमाफी करून वा शेतमालाचे भाव वाढवून निदान महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना बरे दिवस दिसणार नाहित असे वाटते.

महाराष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा करायची असेल तर येथील शेती अधिक उत्पादक करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही पण शेतीक्षेत्रामधील उत्पादकता चुटकीसरशी वाढवता येत नाही हेही खरे. १५ वर्षांपूर्वी मध्य प्रदेश राज्यातील शेती क्षेत्राची उत्पादकता महाराष्ट्राप्रमाणे खालावलेली होती. अशा वेळी तेथे नव्याने सत्तेवर आलेल्या मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मध्यप्रदेश राज्यातील शेतीच्या कुंठीत अवस्थेमागील कारणांचा अचूक वेध घेतला आणि ती दूर करण्यासाठी कंबर कसली. सरकारच्या या धोरणामुळे त्या राज्यातील शेतीक्षेत्राचा उत्पादन वाढीचा दर १० वर्षे दोन अंकी राहिलेला आहे. त्यामुळे आज त्या राज्यातील दर हेक्टरी उत्पादन सुमारे १६५० किलो ऐवढे झालेले आहे. धान्योत्पादनाची पातळी राष्ट्रीय सरासरी पातळीपेक्षा कमी आहे. पंजाब व हरियाणा या राज्यांचा विचार करता त्यांच्या केवळ ४०% आहे. याचा अर्थ मध्यप्रदेश राज्यातील शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी अजूनही बरेच काही करता येण्यासारखे आहे.

मध्य प्रदेश राज्य सरकारने शेती क्षेत्रातील उत्पादकता आणि उत्पादन यांच्या वाढीसाठी कोणती पावले उचलली आणि त्यांच्या उत्पादकता वाढविण्याच्या संदर्भात काय लाभ झाला आहे याचे सखोल विश्लेषण डॉ. अशोक गुलाटी या ख्यातनाम कृषी अर्थतज्ज्ञाने केले आहे. पाणी, वीज आणि सडक या तीन महत्त्वाच्या बाबी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन



Scanned with CamScanner

देण्यासाठी सरकारने दमदार पावले उचचली. परिणामी तेथील शेती क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले. चौहान यांच्या या कामगिरीवर डॉक्टर गुलाटी एवढे खूश आहेत की त्यांनी उत्तर प्रदेश राज्याची सूत्रे हाती घेतलेल्या आदित्यनाथ योगी यांना शिवमंत्र अनुसरण्याचा सल्ला फायनान्शियल एक्सप्रेसमधील आपल्या लेखाद्वारे दिला. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बरे दिवस दिसावेत असे राज्यकर्त्यांना वाटत असेल तर पाणी, वीज आणि सडक या तीन सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. शरद जोशी म्हणायचे की, सिंचनाची सुविधा निर्माण केली आणि उत्पादनात वाढ झाली म्हणजे शेतीमालाच्या किंमती कोसळतात, परंतु मध्यप्रदेशात तसं झाले नाही. कारण धान्याच्या बाजारपेठेत शासनाने हस्तक्षेप केला. तसेच महाराष्ट्रात घडावे म्हणून येथील शेतकऱ्यांच्या कैवाऱ्यांनी राज्यसरकारवर दडपण आणायला हवे.

महाराष्ट्रातील शेती विकासासाठी अधिकाधिक शेती सिंचनाची सुविधा उपलब्ध करून घ्यायची म्हटले की, सर्वप्रथम या मार्गात अडसर येतो तो ऊसाच्या शेतीचा. देशातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा आपल्या राज्यात धरणे व बंधारे यांची संख्या आणि पाणी साठवण्याची क्षमता जास्त असूनही राज्यातील केवळ १८% शेतीक्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे. सिंचनासाठी उपलब्ध पाण्यातील ७४% हिस्सा ४% क्षेत्रावर घेतल्या जाणाऱ्या ऊसाच्या शेतीसाठी वापरला जातो. ही ऊसाची शेती मर्यादित केल्याशिवाय राज्यातील इतर पिकांसाठी साधी संरक्षक सिंचनाची सुविधाही उपलब्ध होणार नाही.

*****



## शेतकरी

बाप नांगरतो शेत।  
बैल राजाच्या जोडीनं॥  
बी पेरतो गं।  
धरणी मातेच्या कुशीत॥  
पीक डौलत-डुलत ।  
वाऱ्याच्या भोवती ॥  
सार रान ऊधळल।  
फुलपाखरा भोवती॥  
मोट हाकलतो एक।  
जीवं पोसतो कितीक॥  
घाम गाळतो किती।  
सुख आनंतो किती ॥  
करी सेवा दिन-रात।  
नाही कशाची भिती॥  
स्वप्नं पाहतो रात्री।  
चंद्र ताऱ्यांच्या सोबती॥  
मागतो मागणे।  
सुखी राहो सारे जग॥  
दिन दुबळे सुखात।  
मागणे मागतो एक॥

– मनिषा सुभाष निखाडे

*****



Scanned with CamScanner



# शेतकरी आत्महत्येत मराठवाडा अग्रेसर का ?

– स्वाती पाचोरकर

''कोकणातला शेतकरी आत्महत्या करत नाही आणि याचा मला अभिमान आहे'' असं विधान लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांनी रत्नागिरीत चिपळूणमधल्या एका कार्यक्रमात केलं होतं.

कोकणातली खरी परिस्थिती काय आहे ? याची कारणं काय आहेत ?

**कोकण आणि विदर्भ –**

मराठवाड्याच्या स्थिती हा फरक का ? हे जाणून घ्यायचा आम्ही प्रयत्न केला.

''गेल्या वर्षभरात कोकणामध्ये एकाही शेतकऱ्याने शेती व्यवसायात अडचण आली म्हणून आत्महत्या केलेली नाही. यासंदर्भात शासन दरबारी कोणतीही नोंद नाही.'' असं राज्य सरकारच्या माहिती व जनसंपर्क विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळ्ये सांगतात.

**शेतकरी आत्महत्या :–**

'वडिलांनी जीव दिला पण आईला शेती करून देणार नाही.'

'शेतीही नको अन् शेतकरी नवराही नको !'

दादाजी खोब्रागडे : तिसरी शिकलेला शेतकरी संशोधकाचा शेवट हालाखीतच.

''कोकणात आत्महत्याच झाल्या नाहीत असं नाही. पण आंबा आला नाही किंवा भात शेती खराब झाली किंवा कर्जबाजारी झाल्यानं एकही आत्महत्या होत नाही,'' ते पुढे सांगतात–

यासंबंधी अधिक जाणून घेण्याकरता रत्नागिरीतील ज्येष्ठ पत्रकार सतीश कामत यांच्याशी आम्ही संपर्क केला.

''कोकणामध्ये शेतकरी अल्पभुधारक असल्यामुळे मर्यादित भातशेती आणि मजुरीवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. दुसरा मुद्दा तो कर्ज घेण्याच्या भानगडीत सहसा पडत नाही. ही दोन मुख्य कारणं आहेत. ज्यामुळे कोकणातले शेतकरी आत्महत्या करत नाहीत.'' कामत सांगतात.

''कोकणामध्ये शेती करायला सोयी सुविधाही खुपच कमी आहेत. त्यामुळे शेती करायची इच्छा असून लोकांना ती करता येत नाही. सिंचन व्यवस्था अपुरी आहे, शासनाकडून त्या सुविधा मिळाव्यात यावरच्या उपाय योजना कागदांवरच आहे. धरणं आहेत, पण कालवे नाहीत अशी स्थिती कोकणात आहे,'' असंही ते सांगतात ''कोकणामध्ये हुंडा प्रथा नाही, त्याचबरोबर लग्नावरचा खर्चही उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत खूपच कमी आहे. कर्जबाजारी होण्याला कोकणात सामाजिक मान्यता नाही, त्यामुळे कर्ज फेडण्याचं प्रमाण सर्वाधिक आहे. देवेंद्र फडणवीस सरकारकडून २०१७ साली कर्जमाफी झाल्यानंतर कोकणात कर्जमाफीची रक्कम भरणाऱ्यांनी जी सवलत मिळाली होती ती इथं जास्त होती,'' ते सांगतात.

**कुटुंबाला बळकटी :-**

राज्यभरात फिरुन शेतकऱ्यांना प्रश्नावर अभ्यास करणारे पत्रकार सचिन परब यांचीही प्रतिक्रिया आम्ही जाणून घेतली. ते म्हणतात, ''विदर्भ मराठवाड्यात पूर्ण कुटुंब शेतीवर अवलंबून असतं. कोकणातली कुटुंब आजही मुंबई, पुण्यावर अवलंबून आहेत. कुंटुंबातला एक तरी सदस्य नोकरीवर असतो. त्यामुळे इथं आत्महत्या होत नाही.''

''कोकणात बळी पडत नाही हे ग्लोरिकाय करण्यापेक्षा कोकणात शेतीचं प्रमाण कसं वाढेल, त्यासाठी सोयी सुविधा कशा उपलब्ध होतील याकडे लक्ष देणं अधिक गरजेचे आहे. कोकणात व्यवस्थेत शेती टिकू दिली नाही. शेकडो एकर जमीनी रिकाम्या पडलेल्या आहेत. शेतीतील जुनी बियाणं मिळत नाहीत. नाचणी, वरीची पीक जवळपास संपलेली आहेत. अशा वेळी आपण कोकणातला शेतकरी आत्महत्या करत नाही, असं म्हणत पाठ थोपटत राहणं हा निव्वळ मूर्खपणा आहे. कोकणात आत्महत्या होत नाही असा प्रचार करून शेतीच नष्ट करायची, याला काही अर्थ नाही.'' अशी परखड प्रतिक्रिया परब यांनी दिली.

''खरं तर शेतकऱ्याच्या हत्येला आत्महत्या म्हणणंच मुळात चुकीचं आहे. हुंडाबळीला आपण आत्महत्या म्हणत नाही मग शेतकऱ्यानं आत्महत्या केली असं का म्हणतो ? शेतकऱ्याच्या सातत्यानं होणाऱ्या शोषणाला सरकारनं शेत मालाला योग्य हमी भाव न देणं, शासकीय अनास्थेमुळे शेती खर्चापेक्षा कमी रक्कम मिळणे ही कारण महत्त्वाची आहेत. यामध्ये सरकार कमी पडतंय, मग ते कोणाचंही असो. या शेतकऱ्यांच्या आत्महत्या नाहीत तर शासन व्यवस्थेचे बळी आहेत, असं माझं स्पष्ट मत आहे,'' ते सांगतात.

''कोकणात कर्ती माणसं मुंबईत गेल्यामुळे त्या ठिकाणाच्या महिला प्रचंड सक्षम झाल्यात. इथल्या सामाजिक क्षेत्रात महिलांना सन्मानाचं स्थान मिळालयं. पुरुषावर भार येत नाही, तो घरच्या महिलांशी चर्चा करुनच निर्णय घेत असतो. मानसिक बळ मिळण्याचं प्रमाण विदर्भ मराठवाड्याच्या तुलनेत कोकणात अधिक आहे. महिलाचं जिथे सक्षमीकरण होतं तिथे कुटुंबाला बळकटी मिळते,'' असेही सचिन परब याचं म्हणणं आहे.

''कोकणात शेतकऱ्यांचे बळी जातही नसेल तरी अलिकडच्या काळात शेतकऱ्याचं हार्ट अॅटकने मृत्यू होण्याचं प्रमाण वाढलं आहे. याकडे सचिन परब यांनी लक्ष वेधून दिलं. कोकणामध्ये कुळ कायद्यानं जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या खूप आहे. अलीकडे कोकणामध्ये येऊ घातलेले प्रकल्प मग तो महामार्गाचा असेल किंवा रिफायनरीचा यात कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन अधिग्रहणात काहीच मिळत नाहीये. सरकारी पैसे मूळ मालकांना दिले जात आहे. या धक्क्यामुळे कोकणामध्ये शेतकरी मृत्यूचं प्रमाण अलिकडच्या काळात वाढलेलं आहे. शेतकऱ्याची अशा प्रकारे होणारे मृत्यू असतील किंवा कर्जबाजारीपणाने मृत्यू, हे दोन्ही प्रकार सरकारी अवस्थेचे बळी आहेत असं माझं मत आहे,'' असंही सचिन परब यांनी सांगितले.

**'विदर्भातील शेतकऱ्याची बदनामी नको'**

सुमित्रा महाजन यांच्या वक्तव्याबद्दल आम्ही विदर्भातले शेतकरी नेते अविनाश काकडे यांना विचारलं,

''सुमित्रा महाजन या लोकसभेच्या अध्यक्षा

आहेत. त्यांनी अत्यंत जबाबदारीनं बोलायला हवं. कारण प्रत्येक विभागातील समस्या या वेळ, काळ, परिस्थितीनुसार वेगवेगळ्या असतात. दुसऱ्या जागेशी समस्या दुसऱ्या जागेशी जोडणं आणि त्यावरुन काही ठोकताळे लावणं आणि एखादया विभागाची बदनामी करणं सभ्य समाजाला शोभत नाही. सुमित्रा महाजन यांचे व्यक्तव्य चुकीचं'' असं काकडे यांना वाटते.

दुसरं म्हणजे विदर्भातील प्रश्न आणि शेतीच वातावरण, शेतीची पद्धती याचा कोकणाशी कुठेही ताळमेळ जुळत नाही. कोकणातील लोक पूर्णत: शेतीवर अवलंबून नाहीत. विदर्भातील मात्र शेतीवर कुटुंब शेतीवरच अवलंबून आहेत. विदर्भातील ९१% शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. शिवाय कोकण आणि विदर्भातल्या पाण्याच्या प्रमाणात भरपुर फरक आहे. कोकणातील शेती ही विदर्भातल्या शेतीसारखी कोरडवाहू शेती नाही. दोन्ही ठिकाणच्या शेतीपद्धती वेगवेगळ्या असल्यामुळे देशातील कृषी विषयक धोरणाचं त्यावर वेगळा परिणाम होतो.''

*****

## सुविचार

तिथं तुम्ही काहीच करु
शकणार नाही तिथं एक
गोष्ट नक्की करु शकता
ती म्हणजे 'प्रयत्न'

– दांडेकर राधिका राजेंद्र

## कष्टकरी बाप

शेतकरी माझा बाप
कष्ट करी दिन-रात
कष्ट करीतो एक
जीव पोसतो कितेक !
कष्टकरी माझा बाप
ऊन-ताण; थंडी-वारा
नाही कशाचं गं भान
रात-दिन करी कष्ट
माझा शेतकरी बाप
कष्टकरी माझा बाप
दिस उजाडतो एक
काम करीतो कीतीक
दिस मावळतो कीतिक
काम करीतो कीतीक
कष्टकरी माझा बाप
चिंता करी तो जगाची
पालनकर्ता माझा बाप
भुकेल्यांना घास भरतो
माझा शेतकरी बाप
कष्टकरी माझा बाप
घेऊन देवांचे गं नाम
करी कामाला सुरुवात
धरणी मातेची करी सेवा
माझा शेतकरी बाप
कष्टकरी माझा बाप॥

– निखाडे मनिषा सुभाष



Scanned with CamScanner



# सेंद्रिय शेती काळाची गरज ...

– आहेर गायत्री विजय

शेती करण्यासाठी किंवा अधिक उत्पन्न घेण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करावाच लागतो असे नाही. किटकांवर तसेच रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी विषारी औषधे फवारावीच असेही काही नाही. शेती करायची असेल तर रासायनिक खतांचा वापर करावाच लागतो, हा गैरसमज दूर करण्यासाठी हा लेख आहे.

जेव्हा पहिला मनुष्य पृथ्वीवर आला तेव्हा त्याला भुख लागल्यावर त्याने कंद किंवा फळेच खाल्ली असतील हे नक्की आणि हे सर्व आपल्याला माहीत आहे. तेव्हा ना कोणी इतर माणसं होती ना रासायनिक खतांचे कारखाने. मग त्यवा वनस्पतींचे पोषण कसे झाले ? वास्तविकता हिच आहे त्या वनस्पतींचे पोषण निसर्गाद्वारेच केले जात होते. आजही जंगलात मोठमोठे वृक्ष आहेत. त्यांना कोणी रासायनिक खते घालत नाही कारण त्यांचही पोषण निसर्गाद्वारेच केले जाते. परंतु आज आपल्या शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर नाही केला तर चांगले उत्पन्न मिळतच नाही असे का झाले ? का आपले निसर्गाशी वैर आहे का ? तर नाही.

आधुनिक शेतीच्या नावाखाली असलेल्या रासायनिक शेतीचे दुष्परिणाम आज लक्षात येऊ लागले आहेत. मातीमध्येही वनस्पतीप्रमाणे जीव आहे हे आजच्या सजीव मानवाला माहितच नाही. वनस्पतींना आवश्यक अन्नद्रव्ये योग्य स्वरुपात रूपांतरीत करण्याचे काम काही सुक्ष्मजीव करत असतात. जमिनीला तसेच पिकांना उपयुक्त अशा जीव–जीवाणुंची भरपूर संख्या असलेल्या जमीनीला सजीव जमीन असे म्हणतात. उपयुक्त जीव–जीवाणू म्हणजे जीवाणू, बुरशी, शेवाळ, प्रोटोझोआ आणि निमॅटोड या जीवाणुंना इंग्रजीमध्ये मायक्रोफ्लोरा असे म्हणतात. अन्नद्रव्यांचे प्रमाण कमी जास्त झाले म्हणजे जमीनीच्या सुपिकता पातळीमध्ये फरक पडतो. परंतु रसायनांच्या अतिरिक्त वापरामुळे जमीनीतील सुक्ष्मजीवांचे प्रमाण कमी होऊन त्यांच्या संख्येत घट झाली आहे. या सर्व बाबींमुळे जमिनीची प्रत खालावली आणि बऱ्याच प्रमाणात जमीनी नापीक झालेल्या दिसत आहेत.

आजच्या शेतीपद्धतीमध्ये शेतकऱ्यांना एक–दोन वर्षात झटपट जास्त उत्पन्न आणि जास्त नफा हवा असतो. परंतु या झटपट पद्धतीमध्ये शेतकऱ्यांना फायद्यापेक्षा तोटाच जास्त झाल्याचे दिसून येते. आज एकुण उत्पादनाच्या ७०–८०% उत्पादन खर्च असून फक्त २०–३० टक्के फायद्यासाठी शेती व्यवसाय चालू आहे. अशा प्रकारच्या शेतीपद्धतीमुळे शेतकरी स्वतः कर्जबाजारी होत चालला आहे आणि जमीन नापीक यामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत चालले आहे. एखाद्या देशाची प्रगती जाणून घ्यायची असेल तर त्या देशातील शेतकऱ्याच्या कपाळावर पहा, कारण ज्या देशातील शेतकरी सुखी तो देश सुखी असे माझे मत आहे.



Scanned with CamScanner

आपला देश तर कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या या चिंतेचा विषय आहे. त्या रोखण्यासाठी सेंद्रिय शेतीचे महत्व त्यांना पटवून देण्याची आणि प्रोत्साहित करण्याची गरज आहे. सेंद्रिय शेती सुरुवातीला अवघड वाटेल. त्यासाठी थोड्याफार प्रमाणात अडचणींवर मात ही करावी लागेल. परंतु जमीन सुपीक आणि सजीव झाल्यावर शेती ही शाश्वत होईल. सेंद्रिय शेतीमुळे एकूण उत्पन्नाच्या २०-३० टक्के उत्पादन खर्च केला तर ७०-८० टक्के नफा मिळतो हे बहुतेक शेतकऱ्यांनी निदर्शनास आणुन दिलेले आहे.

सेंद्रिय शेती ही आपल्या देशाची परंपरा आणि संस्कृती आहे. त्यामुळे त्याचा योग्य प्रचार आणि प्रसार करणे अवघड नाही. ''तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी'' या उक्तीप्रमाणे आपल्याजवळ असणाऱ्या गोष्टींची आपल्याला किंमत नाही, परंतु प्रदेशातील तंत्रज्ञान किंवा पद्धतीवर आपली भक्ती जरा जास्त आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच सावधान होऊन जमिन व आरोग्यास हानिकारक अशा रासायनिक शेतीचा त्याग करून नैसर्गिक सेंद्रिय शेतीचा स्वीकार केला पाहिजे. आरोग्यदायी, सुखी, स्वावलंबी जीवनासाठी सेंद्रिय शेती हाच एकमेव पर्याय आहे. रासायनिक शेतीतुन नापीक जमिन, दुषित हवा, पाणी, अन्न, कॅन्सरसारखे घातक रोग, कर्ज आणि आत्महत्या या व्यतिरिक्त काहीही मिळणार नाही. रासायनिक शेतीला कुठलेही भविष्य नाही. म्हणून म्हणते,

**'सेंद्रिय शेतीची धरा कास,**
**आणि घ्या उत्पन्न झकास.'**

सेंद्रिय शेती ही एक शाश्वत शेतीची पद्धती आहे. या प्रकारच्या शेतीत महागडी रासायनिक खते, घातक असणारी कीटकनाशके व मानवी आरोग्यास धोकादायक असणाऱ्या विविध बाबींचा वापर टाळला जातो. अन्नपदार्थाचा उत्तम दर्जा राखणे व उत्पादन खर्च कमी करणे या द्विधा हेतुने ही शेती केली जाते.

सेंद्रिय शेतीपद्धतीत सेंद्रिय पदार्थाचा वापर, जमिनीतील जीवाणुंच्या संवर्धकांचा वापर, हिरवळी खतांचा वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्र, जमिन आच्छादन पद्धती, पिकांच्या अवशेषांची, अन्न प्रक्रियेतील टाकाऊ घटक व ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत, जमिनीतील पिकांचा फेरपालट व आंतरपिके (मिश्र पिके) पद्धतीचा उपयोग केला जातो.

सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे.

*****

## शेतकऱ्यांचे हाल

**विराट सतरा करोडात गेला**
**धोनी पंधरा करोडात गेला**
**जगाचा पोशिंदा मात्र**
**झाडावर लटकून मेला ॥१॥**

**भारत कृषीप्रधान की क्रिकेटप्रधान**
**हाच मोठा प्रश्न पडतो**
**शेतकरी जगला काय मेला काय**
**सांगा कुणाला फरक पडतो ॥२॥**


**अरे एखादी मॅच तुम्ही**
**वावरात घेऊन पहा**
**शेतकऱ्याची जिंदगी**
**एक तरी दिवस जगून पहा ॥३॥**

**खेळाडूंसारखे करोड नको**
**फक्त पिकमालाला भाव द्या**
**कृषीरत्न कृषीभूषण नको**
**फक्त शेतकऱ्याला मान द्या ॥४॥**

**- स्वाती वसंत पाचोरकर**



Scanned with CamScanner



# द्राक्ष शेती - मूळ, कूळ आणि विस्तार

- प्रा. गोसावी अभिजित धर्मराज

द्राक्षाचे मूळ स्थान रशियातील अरमेनिय जिल्हा आहे. भारतात द्राक्षाचा प्रसार इराण आणि अफगाणिस्तान येथून झाला. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात द्राक्ष लागवडीखालील सर्वात जास्त क्षेत्र आहे. महाराष्ट्रातील नाशिक, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांतील पिंपळगाव बसवंत, निफाड, चांदवड, दिंडोरी, बागलाण, कळवण, सिन्नर, येवला, इगतपुरी, नांदगाव, मालेगाव, सुरगाणा हा भाग उत्तम प्रतीच्या द्राक्षाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.

द्राक्षाचा उपयोग मुख्यत: तीन प्रकारे केला जातो. पहिल्या प्रकारात द्राक्षे ताजी खाण्यासाठी (टेबल द्राक्षे) वापरतात. दुसरा प्रकारात द्राक्षे वाळवून, टिकवून खाण्यासाठी वापरतात. तिसऱ्या प्रकारात मद्य आणि विविध प्रकारची पेय बनविण्यासाठी केला जातो. १०% द्राक्षे ताजी खाण्यासाठी व १०% मनुका तयार करण्यासाठी वापरतात.

द्राक्षाचा वेल तसा मूळचा कॅस्पियन सामुद्रिक प्रदेशातील वा कॉकेशस पर्वतातील असल्याचे सांगितले जाते. इजिप्तमध्ये हजारो वर्षांपूर्वी हा वेल वाढला आणि पुढे ऑलीरियन, ग्रीक तसेच रोमन लोकांनी तो विकसित केला. भारतात द्राक्ष शेतीचे प्रयोग केले गेले. नाशिकला जिल्ह्यात साधारणपणे १९८० च्या दशकात सुरु झालेली द्राक्ष शेती तीस ते पस्तीत वर्षात सुमारे साडेतीन लाख एकरांवर बहरली आहे.

प्रारंभिक काळातील बी आणि जाड पापुद्र्याचा द्राक्षमणी २००० सालानंतर सीडलेस झाला. संशोधनानंतर द्राक्षाच्या अनेक नवनवीन जाती विकसित झाल्या आहेत. महाराष्ट्रात सुरुवातीला भोकरी, फकडी आणि बंगलोर पर्पल या जाती लागवडी खाली होत्या. नंतरच्या काळात अनाबेराही, काळी साहेबी आणि चिमा साहेबी या जातीची लागवड झाली. सध्या थॉम्पसन, सीडलेस, किशमिश चौर्नी, फ्लेम सीडलेस, तास-ए-गणेश, सोनका या जातीची लागवड सर्वात जास्त केली जाते. नाशिक जिल्ह्यातील द्राक्षांना जगातील नेदरलँड, जर्मनी, युनायटेड किंगडम, रशिया, चीन, कॅनडा, डेन्मार्क, फिनलँड, दुबई, थायलंड या देशातून सर्वाधिक मागणी असते.

आजमितीला राज्याच्या एकूण द्राक्ष निर्यातीत नाशिकचा वाटा ९०% इतका आहे. परदेशातील द्राक्ष निर्यात जवळपास दीड हजार कंटेनरवर जावून पोहचली आहे. चिली आणि इस्त्रायलच्या बरोबरीने नाशिकची द्राक्षे ग्राहक खरेदी करतात. नाशिक जिल्ह्यातील द्राक्षाखालील क्षेत्र साडेतीन लाख उत्पादन घेतले जाते. २०१९ या वर्षातील एकूण निर्यात १,४६,११३ टन आहे.

द्राक्षापासून तयार होणारा आणि पौष्टिकपणामुळे ओळखला जाणारा नाशिकचा बेदाणा जगभरात नाव लौकिकास पात्र ठरला आहे. बेदाणाचे दोन प्रकार आहे. एक काळा व दुसरा पिवळ्या रंगाचा असतो.

काळामनुका 'बसवंत बेदाणा' या नावाने

ओळखला जात असलेले पिंपळगाव बसवंत येथील बेदाणा परकीय बाजारात दाखल झाल्याक्षणक्ष उचलला जातो. बेदाणा उत्पादनात भारताचा प्रथम क्रमांक आहे.

द्राक्षापासून मदय व विविध प्रकारची पेय बनविली जातात. नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर द्राक्षबागाना वादळ, बेमोसमी पाऊस, गारपीट इतर टेबलग्रेप सोबतच वाईनग्रेपचे उत्पादन करत शेतकरी जोखीम कमी करण्यासोबत शाश्वत उत्पन्न मिळविण्याचा पर्याय निवडत आहेत. मदय उदयोगाच्या वाढत्या विस्तरासोबतच वाइनग्रेप पिकवत द्राक्ष उत्पादकांनाही चांगले उत्पादन मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

वर्षागणिक बहरत असलेल्या द्राक्षशेती सोबतच नाशिक जिल्ह्यात मागील दहा वर्षात वाइन उद्योग क्षेत्रही झपाट्याने विस्तारले आहे. वाइन म्हणजे दारु नव्हे, ही संकल्पना सर्व मान्य होत असताना वाईनचा आस्वाद घ्यायचा तर नाशिकला चला, अशी भावना वाढल्यामुळे देश-विदेशी पर्यटकाची पावले नाशिकडे वळू लागली आहे.

भारताची 'वाईन कॅपिटल' म्हणून जगाच्या नकाशावर नाशिकचा उदय झाला आहे. द्राक्षाच्या चवीप्रमाणे वाईनची चव पर्यटकाच्या जिभेवर रुळू लागली आहे. जगातील इंग्लंड, स्पेन, पोलंड, फ्रान्स, जपान, अमेरिका, रशिया सह इतर चाळीस देशात वाईनची निर्यात केली जात आहे.

सुला विनियार्ड ही वाईन क्षेत्रातील भारताची पहिल्या क्रमांकाची वाईनरी आहे. सुला नवनवीन प्रकारच्या वाईन्सची निर्मिती करुन स्थानिक ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न करत आहे. सुला हे जगातील शाश्वात वाईन निर्माते म्हणून नावारुपाला येत आहेत.

भारतीय वाइन उद्योगातील ८०% वाटा हा अवघ्या ५० लाख लोकसंख्या असलेल्या नाशिक जिल्ह्यान उचलला आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, निफाड, लासलगाव, विंचूर, इगतपुरी या ठिकाणी वायनरी सुरु झाल्या आहेत. सुमारे ४० लहान मोठ्या वायनरीतून वर्षाकाठी दिड कोटी लिटर वाइनची निर्मिती केली जाते. येथील सुला, यार्क, सौमा, ग्रोव्हर, झम्या, व्हॅलोनी , शानडॉन वायनरीज बाजारपेठा गाजवत आहेत.

वाईन उद्योगातून स्थानिक शेतकऱ्यांना उत्पन्न मिळण्याबरोबरच कुशल मनुष्यबळासाठी सातत्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. केंद्र सरकारने वाईन उद्योग परकीय गुंतवणूकीसाठी खुले केल्याने परदेशी कंपन्या दाखल झाल्या आहेत. मागील आर्थिक वर्षात वाइन उद्योगात १८% वाढ नोंदविली गेली आहे. नाशिक जिल्ह्यातील वाइन निर्मिती क्षमता सहा कोटी लिटर असून वाइन निर्यात १.५० कोटी लिटर आहे.

नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष शेतीचा कणा बळकट करण्यात वायनरी उद्योगाचा सिंहाचा वाटा आहे. सुला वाईनचा सुला फेस्टीव्हल जगभर प्रसिद्धी पावत आहे. त्यामुळे लाखो पर्यटकाची पाऊले नाशिकच्या दिशेने वळली आहेत. त्यामुळे नाशिक व परिसरात पर्यटकाच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या भरारीमुळे हॉटेल - लॉज व ट्रान्सपोर्टसह इतर क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध होत आहेत. भविष्यकाळात द्राक्ष - बेदाणा व मदय यात लक्षणीय वाढ होऊन नाशिक जिल्ह्याचे नाव जागतिक स्तरावर वाइन कॅपिटल म्हणून घेतले गेल्यास नवल वाटायला नको !

*****



Scanned with CamScanner



# दुष्काळ आणि भारतीय शेती

– प्रतिक्षा नंदू संगिता जाधव

'जब मै जाता हूँ बाजार मे सब्जियाँ लेने,
तो किसानों के सुखे खेतो से जताता है
क्या खूब कर्जमाफी की है सरकार ने
जो आज तक सिर्फ कागज पर उतरी है।'

दुष्काळ आणि भारतीय शेती या विषयाचा विचार करायला घेतला तर डोळ्यांसमोर उभा राहतो तो भारताचा पाया असणारा व भारताला आर्थिक राजधानी देणारा महाराष्ट्र. आजही महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा यांसारख्या प्रदेशातील शेतकरी हा डोळ्यांसमोर उभा राहतो. अन् मनात विचार येतो शेपूट हलवून लहवून म्हैस दमले पण आत्महत्तेचा विचार शेतकऱ्याची पाठ सोडत नाही. याचच एक उदाहरण म्हणजे भारतातील २०१६ मधील सर्वेणात असे निदर्शनास आले की, या वर्षात एकूण ११,३७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे आणि याच मुख्य कारण म्हणजे भारतातील दुष्काळ. दुष्काळ नावाच्या कलंकाने भारतीय शेती नावाच्या कुटुंबाचा ऱ्हास करण लावला आहे. खरं तर शेतकऱ्याची अवस्था कोरडे आभाळावाणी कपाळ असणाऱ्या बायका बिन बापाची लेकरं असल्यावानी माळावर फिरणारी जनावर अशी झाली आहे. पण खरं तर हे सार गावाला नजर लागली म्हणून नाही झालं तर गावाकडे कुणाचीच नजर नाही गेली म्हणून झालं.

खरं तर फक्त दुष्काळच शेतकऱ्याच्या दुरअवस्थेला कारणीभूत ठरत नाही तर एकंदर भारतीय शासनव्यवस्था देखील या गोष्टीला कारणीभूत ठरते. खरं तर असं वाटतं हा शेतकरी शिकला नसता तर किती सुखी राहीला असता अन्यायाची जाणीवच नसती झाली. देवाचा कोप झाला अस समजून बसला असता अंधारात. सरकारच्या लाल दिव्याला हात जोडीत. गोचीडासारखे चिटकून बसलेय सातबाऱ्याला सावकार, शेतकऱ्यासाठी कोंडवाडे बांधायच ठरवून सरकार शांत झोपी गेलयं. देश महासत्ता होण्याची स्वप्न बघत खिचडीसाठी शाळेत गेलेल्या पोरानं चोरुन आणलेली खिचडी खाताना आभिमान वाटावा पोराचा की स्वतःच्या जगण्याची लाज. खरं तर कुणीही याव अन् नाव ठेवून जाव शेतकऱ्याच्या जगण्याला अशी शेतकऱ्याची अवस्था झाली आहे.

इतक सर्व असताना देखील आज शेतकरी दुष्काळाशी दोन हात करत स्वतःच जीवन जगत आहे. आणि तेही उत्कृष्ट पद्धतीने. आज भारतात दुष्काळ असणाऱ्या प्रदेशात देखील शेतकरी उत्तम प्रकारचे पीक घेत आहे. दुष्काळावर उपाययोजना शोधून शेतकरी आज शेती करत आहे. उदा. पाण्याच्या बचतीसाठी जलसिंचनाच्या सोयी, पाणी आडवा पाणी जिरवा यांसारख्या उपाययोजना राबवून, तसेच शेततळे तयार करुन पाण्याचा मुबलक प्रमाणात साठा करुन शेती साध्य करत आहे.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून त्याची पूर्ण जगात ओळख आहे. परंतु ह्या देशातील शेतकरी हाच



Scanned with CamScanner

अडचणींनी, वेदनांनी ग्रासला आहे. आज भारतातील शेतकरी हा अनेक समस्यांना सामोरा जात आहे. खरं तर वेळेस भारतीय शेतकरी व त्याचे कुटुंब सुखी होईल त्याच वेळेस भारत हा कृषीप्रधान म्हणण्यास योग्य होईल.

खरं तरं शेतकऱ्याच्या या हालअपेष्टांना/प्रश्नांना वाचा फोडली गेली पाहीजे, नाही तर एक दिवस महासत्तेच्या वाटेवर असणाऱ्या भारत देशाला एक दिवस एक किलो गव्हासाठी पूर्ण देश गहाण ठेवावा लागेल. आणि त्या वेळेस नक्कीच शेतकऱ्याच्या पिंडाला कावळा शिवलेला असेल !

*****

## शेतकरी

जमिनीला म्हणतात शेतकऱ्यांची आई
तरी आमच्या शेतकऱ्याचा विकास नाई
लोकांच्या पोटासाठी दिवसभर राबतो
स्वत: मात्र चटणी-भाकरीवर जगतो.
कष्ट करुन सुख याच्या नशिबात नाही
दोन नवीन कापड यांच्या अंगात नाही
शेतीत कष्ट करुन निसर्ग कोपते
दुष्काळाच्या भीतीने शेतकरी कापतो
मी शेतकरी झालो यात माझा काय गुन्हा
दुबार पेरणी करुन कष्ट करायला लावतो पुन्हा
शेतमालाल योग्य भाव मिळत नाही
सावकाराच्या त्रासातून याची सुटका नाही
परमेश्वरा तु जरी कोपला तरी मी हटणार नाही
येणाऱ्या संकटाचा सामना करेल पण
फास घेऊन मरणार नाही !!

संकलित - तिडके रोहित ज्ञानेश्वर

## होय मी शेतकरी होणार.....

माझ्या शेतकरी बापाला मी आधार देणार
होय मी शेतकरी होणार
माझ्या माय-बापाचे स्वप्न मी पूर्ण करणार
जशी आकाशी उडते धार तशी होणार मी तयार
माझ्या जिवनात नवीन निर्माण होईल सार
माझ्या शेतकरी बापाला मी आधार देणार
होय मी शेतकरी होणार
माझ्या कष्टाची मी होणार सागर
आयुष्यभर सर्वेदूर मी वाहणार
जिवनाला मी माझ्या आकार देणार
माझ्या शेतकरी बापाला मी आधार देणारं
होय मी शेतकरी होणार
प्रत्येक परिस्थितीला मी सामोरे जाणार
शेतकऱ्यांच्या अडचणी मी समजून घेणार
द्राक्ष, टमाटे यांना भाव मिळण्यासाठी
प्रयत्न मी करणार
होय मी शेतकरी होणार
आज ना उदया शेतकऱ्यांचे केलेले सर्वजण
समजतील उपकार
शेतकऱ्याला सर्वजण जेव्हा देतील आधार
तेव्हा त्याच प्रत्येकं स्वप्न होईल साकार
त्याच्या जिवनाला तेव्हाचं मिळेल आकार
माझ्या शेतकरी बापाला मी आधार देणार
होय मी शेतकरी होणार.

- कोठुळे चैतल्या जगदिश

*****



Scanned with CamScanner

# खरंच शेतकरी राजा आहे....?

– पगार पूजा अर्जुन



शेतात कष्ट करून स्वत: उपाशी राहून जगाला अन्न-धान्य पुरवतो तो शेतकरी.

केवढी सोपी व्याख्या आहे ना ?

बळी राजा, बळीराजा म्हरत म्हणत या राजांचा फक्त बळीच जातो, पण कधी या राजाला आपण राजासारखी वागणूक दिली आहे का ? नाही ना.... !!

'ज्या दिवशी भाकरी<br>
पिझ्झाप्रमाणे आर्डर कराव्या<br>
लागतील त्या दिवशी<br>
या देशाला शेतकऱ्यांची<br>
किंमत कळेल.'

शेतकरी म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येते ती गरीबी, दुष्काळ, कर्जबाजार, अनुदानासाठी सरकारवर अवलंबून असणारा, आत्महत्या करणारा. हो, पण ही परिस्थिती का व कशी निर्माण झाली ? याला कोण जबाबदार ? ह्याची कारणे व उपाय यांचा शोध घेण्याचा कुणी प्रयत्न केला आहे का ?

'हाक मारीता तयाला<br>
धावे कसा भरभरा<br>
जगाचा पोशिंदा हा<br>
त्याचा सन्मान करा.'

शेती हा व्यवसाय पावसावर मुख्यत: हवामानावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. भारतात साधारणपणे ६० ते ७०% शेती पावसावर अवलंबून आहे व ३० ते ४०% शेती ही बागायती आहे. त्यामुळे पाऊस कमी किंवा जास्त झाल्यास त्याचा परिणाम शेतीवर होतो तसेच पाऊस वेळेवर न आल्यास सुद्धा होतो. मग त्यातून नैराश्य येते व तो भलत्याच मार्गाला जातो. मी स्वत: एक शेतकऱ्याची मुलगी आहे. ही परिस्थिती मी स्वत: अनुभवली आहे.

या देशात सगळ्या प्रकारच्या फाईली गायब होतील, पण शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची फाईल मात्र गायब होत नाही.

'आम्हाला फक्त<br>
निसर्गाने साथ दिली पाहीजे<br>
सरकारच्या पॅकेजची गरज नाही आम्हाला<br>
कारण त्या सरकारला आम्हीच पोसतो.'

प्रॉपर्टी नव्हे जीव गहाण ठेवून केला जाणारा व्यवसाय म्हणजे शेती.

कधी मोकळ्या आकाशाखाली तुमची कमाई ठेवून बघा, रात्रभर झोप लागणार नाही....

विचार करा, शेतकऱ्याचं काय होत असेल.

*****



# वडनेरची द्राक्ष शेती

- पाचोरकर श्रध्दा बाळासाहेब

वडनेर परिसरात मोठ्या प्रमाणावर घेण्यात येणारे फळपीक म्हणजे द्राक्ष. उत्पादन गुणवत्ता व उत्पादक या दोन्ही बाबींमध्ये वडनेकर अव्वल आहेत. वडनेर भैरवच्या द्राक्षांना सर्वात्तम भाव मिळतो. म्हणूनच अगदी गरीब शेतकऱ्यांपासून ते मोठे बागायतदार यांच्या जिव्हाळ्याचे पिक म्हणजे द्राक्ष पीक आहेत. द्राक्ष उत्पादनाचा फक्त उत्पादकांसाठीच फायदा असे नसून या पीकामुळे शेतमजूर, रासायनिक खते, विक्रेते, किटकनाशके विक्रेते, पॅकिंग मटेरियल विक्रेते, द्राक्ष खरेदीदार व द्राक्ष हुंडी तसेच पॅकिंग करणारे मजूर इत्यादी घटकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होतो.

**द्राक्ष पीक याबद्दल आणखी काही माहिती :-**

**जमीन :-**

द्राक्ष बागेसाठी उत्तम अशी निचरा होणारी काळी कसदार तांबडी मध्यम मुरमाड, गाळाची अशा प्रकारची जमिन द्राक्ष पीक घेण्यासाठी चालते.

**हवामान :-**

उष्ण व कोरड्या हवामान द्राक्षवेलींची वाढ चांगली होते. सरासरी किमान तापमान १०अंश से. ते कमला ३५ ते ४०अंश से. द्राक्ष अशा तापमानात चांगले उत्पादन होऊ शकते.

**लागवड पद्धती :-**

पुर्वी साधारणपणे १० बाय १० फुटांवर लागवड केली जात असे आणि सध्या स्पर्धेच्या युगात झटपट उत्पन्न वाढीसाठी ५ फूट बाय ९ फूट किंवा ५ फूट बाय ८ फूट (वाय) पद्धती लागवडीसाठी वापरतात व एच पद्धतीसाठी ४ बाय ९ किंवा ४ बाय ८ या पद्धतीने द्राक्षांची लागवड केली जाते.

**सुधारित जाती :-**

परिसरामधील सोनाका, थॉमसन, माणिक चमन, गणेश, आरके, यसयसएन, सुपर सोनाका या जातींच्या हिरव्या द्राक्षाची लागवड केली जाते.

नानासाहेब पर्पल, जम्बो, ब्लॅक, काळी सोनाका, वाईन, इत्यादी रंगीत द्राक्ष लागवड करतात.

**पाणी :-**

द्राक्ष कमी पाण्यावरही अलीकडे टिकवतात. उत्पादन खर्च, उत्पन्न खर्च दिवसेंदिवस वाढतच चालला आहे व उत्पन्न घटत चालले आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे -

१) वाढती लागवडी खालील क्षेत्र (अधिक उत्पन्न - मागणी कमी)

२) वाढती मजुरी वरील उत्पादन खर्च

३) बदलते हवामान

४) सेंद्रिय खते, गाय खत यांची कमतरता

५) यांत्रिक शेतीमुळे घटणारी पशुक्षमता

६) निर्यातक्षम द्राक्ष निर्मिती व निर्यातीत येणाऱ्या अडचणी, इत्यादी.

७) रासायनिक खते, किटकनाशके यांच्या वाढत्या किंमती

द्राक्षाच्या निर्मिती पुढील समस्या -

किडी :-

द्राक्षावर येणाऱ्या किडी व रोगद्राक्षांवर यांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होतो. यांमध्ये डाऊनी, भुरी (मिल्ड्यू) मर फळकूज व द्राक्षावर येणाऱ्या मुख्य किडी, भुंगेरे, उडद्या, तुडतुडे (थ्रिप्स) खोड किडी यांचा प्रादुर्भाव होतो.

या रोग किडीचे नियंत्रण करणे ही शेतकऱ्यापुढे समस्या निर्माण झाली आहे व काही अडचणी व समस्या दुष्काळ व गारपीठ यासारख्याही समस्या द्राक्षापिकांवर येऊ शकतात व यांमध्ये व्यापारी रक्कम घेऊन पसार होण्याचे प्रमाण वाढत आहे. अशा अनेक अडचणींना तोंड देऊन द्राक्ष बागायतदार चांगल्या प्रकारचे पीक घेतात यासाठी भांडवल उपलब्धता परिसरातील विविध कार्यकारी पतसंस्था व बँका भांडवल उपलब्ध करून देतात.

अशी ही वडनेर परिसरातील द्राक्ष शेती....!

*****

## मी शेतकरी....

मी शेतकरी
माझ्या विहिरीत पण नाही दोन थेंब पाणी
कोरडी नदी पण गातेय दुष्काळाची गाणी,
ऊस जातो जळून कापसाला लागते कीड,
त्या पिकलेल्या पिकात रानडूकरांची भीड,
दिवसरात्र राबून का मिळत नाही मला फायदा
मी मरेपर्यंत झोपा काढतोय का तुमचा हा कायदा ?
अशी आहे माझा कर्जबारी आयुष्याची कथा
कुणीतरी ऐका माझी आत्महत्याग्रस्त कष्टाची व्यथा

- स्वाती वसंत पाचोरकर

*****

## बैल जुंपले

बैल जुंपले नांगरा
करावया मशागत
भर उन्हात हाकारीतो
सजा सरजाची रे पात॥
माझा बाप शेतकरी
भर उन्हात कष्टकरी
नाही ऊन पावसाची जाण
धरती त्याचा रे आहे प्राण॥
डौलदार पीक यावं म्हणूनच
जीव ओवाळून टाकी
मातीच जीव रे तुझा तरीही
का झेलतो कर्जाचा बोजा॥
रात्र दिस एक करुनही
पीक भरवशाचं नाही
दु:ख त्याच्याच नशिबी
सुखाची त्याला ओढ नाही॥
जगवतो उभ्या जगाला
त्याच्या परी देव नाही
माझा बाप शेतकरी
साऱ्या व्यापाराचा हितकरी॥
त्याची किमयाच न्यारी
जगाचे जीवन त्याच्या उरी
गर्व आहे आम्ही पोरं त्याची
गातो थोरवी जगाच्या पोशिंद्याची॥

- ढिकले साक्षी साहेबराव

*****



Scanned with CamScanner



# दुष्काळ आणि भारतीय शेतकरी

- टेकनर रुपाली राजेंद्र

भारत हा देश शेती व्यवसायावर अवलंबून आहे. भारताचा मुख्य व्यवसाय देखील शेतीच आहे. पण भारतात काही ठिकाणी खुप दुष्काळ आहे तर काही ठिकाणी खूप पाऊस आहे. पण दुष्काळात असणारा शेतकरी मात्र आसुसलेलाचं आहे.

दुष्काळ, दुष्काळ आणि फक्त दुष्काळच असेच भारताच्या काही राज्यात पहायला मिळते. तिथले शेतकरी मेघराज्याकडे आसुसलेल्या डोळ्यांनी बघतात पण मेघराजा काही यायलाच तयार नसतो. अशा परिस्थितीत त्यांना पिण्यासाठी पाणी नसते तेव्हा पशु-पक्षी व शेत-जमिनीसाठी कोठून येणार. गेली काही वर्ष त्यांना हिरवे शेतदेखील बघायला मिळालेले नाहीत. कोरड्या पडलेल्या जमिनी हे बघूनच त्यांचे डोळे भरून येतात. अशा परिस्थितीत घर चालवणे कठीण होते. मुलांना शिकवणेदेखील सोपे नसते आणि मुले हि शिकायला तयार नसतात. कारण त्यांनाही कळते कि आपल्या शिक्षणासाठी आपल्याकडे पैशेच नसतात. असे कित्येक प्रश्न शेतकऱ्याच्या डोळ्यासमोर असतात, म्हणूनच काहि शेतकरी आत्महत्या करतात तर काही पुढच्या वेळेस होईल काहीतरी अशी आशा धरु असतात. त्यांना दोन वेळचे जेवण सुद्धा कठीण होऊन बसते. इतके दुष्काळी शेतकऱ्याचे हाल असतात.

म्हणूनच शेतकरी डोक्याला हात लावून अंगणात बसून वरुन ऊनाच्या झळा या लागतात तरीही शेतकरी आकाशाकडे बघत म्हणतो, ''ये मेघराजा किती रे अंत: बघशील माझा'' ये रे ये रे मेघराज्या निदान या वर्षी तरी माझे शेत बहरु दे. असे म्हणतच, आशेच्या किरणावर तो जगतोय.

## माझा शेतकरी बाप

आग लागली होती गरिबीला
भूक लागली होती पोटाला
जाऊ नाही दिले शाळेला
शेतात लावले राबायला
अनवाणी पायांनी माळ तुडवला
गहू पेरला दुष्काळ पडला
सावकार उभा राहिला
पैसे मागायला
बाप रडु लागला विनवण्या करु लागला
अवधी द्या मला
देईल पैसे मी तुम्हाला
घरात दाणा नाही खायला
दु:खाचे सावट डोक्यावर लागले घोंगायला
बाप बिचारा कंटाळला
गरीब या परिस्थितीला
फंदा गळ्याला लावला
वाऱ्यावर आम्हाला सोडून गेला.

- पवार भाग्यश्री संजय
- सातभाई आरती अशोक



# कर्जबाजारी शेतकऱ्याचे मनोगत

- गांगुर्डे प्रतिभा प्रताप

कर्जबाजारी शेतकऱ्याचे मनोगत खरं तर विषय गंभीर आहे. कारण हल्लीची शेतकऱ्याची परिस्थिती आपण सर्व जाणुन आहोत. हल्ली शेतकऱ्यांना तीन नव्हे तर चार ऋतुंना सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा आणि अवकळा. अवकळा देण्याशिवाय शेतकऱ्याच्या आयुष्याला अथर्च उरला नाही. अवेळी पाऊस येण, गारपीट होण, या समस्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचा व त्याचसोबत त्याच्या स्वप्नांचा अपेक्षाभंग होतो. जणु काही त्याची स्वप्न या पावसासोबत त्या मातीत विलिन होवून जाते.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. बहिणाबाईंनी फार सुंदर ओळी सांगितल्या आहेत.

''अशी धरत्रीची माया
तिले नाही सीमा
दुनियाचे सर्व पोट
तिच्यामध्ये झाले जमा.''

खरं तर सर्वाचे पोट शेतीवर अवलंबुन असते. जर शेतात पीकले तरंच शेतकऱ्यांच्या घरात अन्नधान्याची भरभराट होईल आणि जर शेतकऱ्यांचे घर भरले तरच बाजार आणि अन्नधान्याच्या फळा-फुलांच्या बहरलेल्या बाजारामुळे अनेक जणांची घरे भरतील. खर तर आपला देश कृषीप्रधान देश आहे. पण हल्ली शेतकऱ्याची परिस्थिती फार विचित्र झाली आहे. शेतकरी जीवन जगणं एक प्रकारचा संकट आहे अशी परिस्थिती आज निर्माण झालेली दिसुन येते. शेतकरी हा कासवाच्या गतीने का होईना प्रगती करण्याचा प्रयत्न करतो. पण शेतकऱ्याच्या आयुष्यात अनेक ससे आडवे येतात. सांगायचेच झाल्यास शेतकरी शेतात पीक पीकवतो. त्या पीकाला वेळेवर पाणी मिळावे म्हणून आभाळाकडे बघत असतो. आज पाऊस येईल, उदया पाऊस येईल पण पावसाच्या अनियमितपणामुळे जमिनीत पेरलेले ते कोवळे अंकुर करपल्याशिवाय राहत नाही. आणि आलाच तो अवकाळी पाऊस, येथुनच सुरू होते शेतकऱ्याच्या आयुष्याची खरी कहाणी. पावसाच्या आशेवर तो पीकांची पेरणी करतो. पाऊस येत नाही म्हणून पीक करपून जातात. त्या बियासाठी त्याने केलेली पैशाची जमवाजमव पैसे जमा करत असताना त्याला एकच स्वप्न डोळ्यासमोर दिसते ते म्हणजे आज ना उद्या माझ्या शेतात पीक फुलून येईल. मी घेतलेले पैसे परत करीन. पण तसे होत नाही. पवसाचा अनियमीतपणा दिवसेन्दिवस वाढंतच चालला आहे. शेतात बहरलेले पीक हे अवकाळी पावसामुळे अचानक नाहीसे होते. तेव्हा शेतकऱ्याच्या डोळ्यांतील अनेक स्वप्न त्या पावसाबरोबर वाहून जातात. शेतकऱ्याची परिस्थिती दिवसेंनदिवस दयनीय होत चालली आहे. शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंनदिवस वाढतच चालला आहे. सावकार सराफी पेढ्यावाले कर्जाच्यावसुलीसाठी दारात येऊन उभे राहतात. पण आज या घडीला त्याच्या भावनांना कोणी समजुन घेईल का हो ?

शेतकरी हा दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे. शेतकरी शेतात पीक पीकवतो यामागे त्याच्या फार छोट्या-छोट्या अपेक्षा असतात कि हे पीक मी बाजारात घेऊन जाईल, मिळालेल्या पैशातून मुलाचं शिक्षण योग्य त्या ठिकाणी करेल. मुलीच्या लग्नासाठी पैसे साठवून ठेवीन या त्याच्या छोट्या-छोट्या इच्छाही तो पुर्ण करु शकत नाही तर काय अर्थ आहे त्या शेतकरी जीवनाला. यावर्षी टॉमेटोचे भाव वाढले पण या उमेदिन अवकाळी पावसामुळे त्या पीकाची नासाडी होते. बाजारभाव वाढले पण उत्पन्न कमी झाले. कांद्याचे भाव वाढले पण लगेच सामान्य गृहिणीच्या डोळ्यात पाणी आले. प्रसारमाध्यमाद्वारे फार सुंदर बातम्या येतात. येथे माझा शेतकरी बाप दररोज रडतोय याची का जाणीव कोणाला होत नाही. शेतकरी परिस्थितीशी झगडतो, संघर्ष करतो. काही का असेना मी माझ्या कुटुंबाला या परिस्थितीनुसार बाहेर काढेल पण तसे होत नाही. शेतकरी हा आशेवर जीवन जगत असतो. पीकांना भाव नाही, भाव आहे तर उत्पन्न नाही. त्यामुळे तो कर्जबाजारी होऊन बसतो आणि या कर्जाच्या वैफल्यातून तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. शेतकऱ्याच्या मनात अनेक भावनांचा कल्लोळ झालेला असतो. मी माझ्या कुटुंबियांचा योग्य पद्धतीने सांभाळ करु शकत नाही. मुलांच शिक्षण, मुलीच लग्न करु शकत नाही, तर माझ्या जगण्याला काय अर्थ आहे. म्हणून तो आपले जीवन क्षणांत संपवून टाकतो. भयंकर झालीये आजची शेतकऱ्याची परिस्थिती.

कोणीतरी म्हणून ठेवलयं शेतकरी कर्जात जन्म घेतो आणि कर्जातच मरतो. अगदी खरंय, कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केली की, मग शासन खडबडून जाग होत. लगेच घोषणाबाजी सुरु होते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना इतक्या-इतक्या लाखाची मदत. आहो ही मदत आधीच केली तर कशाला माझा शेतकरी बाप आत्महत्या करेल. विचार केला तरी अंगावर शहारे उमटतात. आज कितीतरी शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेल्या आहेत. राजकीय पुढारी म्हणतात, शेतकरी आत्महत्या ही फॅशन झालीये फॅशन. ओ एक दिवस शेतकऱ्याच्या घरात राहून पाहिलत ना मग समजेल. आहो, शोधलात ना अर्थ आहे, नाही तर सारे जीवन व्यर्थ आहे.

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे आणि ती तशीच रहावी असं वाटत असेल तर शेतकऱ्यांसाठी सरकारने वेगवेगळ्या योजना राबवल्या पाहिजे. कुठल्या मार्गाने शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी राहिल यासाठी प्रयत्नशील राहिलं पाहिजे. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे असे आपण आदराने म्हणतो, आणि यापुढेही म्हणु अशी आशा बाळगते.

''माझा शेतकरी राजा  
साऱ्या जगाचा पोशिंदा  
त्याच्या भाळी लिहिलेला  
लाल मातीचा टिळा.''

## चारोळी

**काल सरणातली राख म्हणाली**  
**वळून बघ जरा कसा असतो अंत....**  
**कालपर्यंत माझं-माझं करणारा बघ**  
**आज दिसतोय कसा शांत....**

**- स्वाती पाचोरकर**



Scanned with CamScanner

# शेतकऱ्याचे मनोगत....!

- सावकार वृषाली राजाराम



शेतकरी म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर येते ती गरिबी दुष्काळ, कर्जबाजारीपणा, अनुदानासाठी सरकारवर अवलंबुन असणारा, आत्महत्या करणारा ! हो, पण ही परिस्थिती का व कशी निर्माण झाली ? ह्याला कोण जबाबदार ? ह्याची कारण व उपाय ह्यांचा शोध घेण्याचा कुणी प्रयत्न केला आहे का ?

शेती हा व्यवसाय पावसावर मुख्यत: हवामानावर अवलंबुन असलेला व्यवसाय आहे. भारतात साधारणपणे ६० ते ७०% शेती पावसावर अवलंबुन आहे. ३० ते ४०% शेती ही बागायती आहे. त्यामुळे पाउस कमी किंवा जास्त झाल्यास त्याचा परिणाम शेतीवर होतो तसेच पाऊस वेळेवर न आल्यास सुद्धा होतो. अशा वेळी शेतकऱ्याची अपेक्षा सरकारकडुन अनुदान, कर्जमाफी मिळवण्याची असते व ती न मिळाल्यास तो कर्जबाजारी होतो. मग त्यातुन नैराश्य येते व तो भलत्याच मार्गाला जातो. मी आहे एक छोटा शेतकरी. महाराष्ट्रातील मराठवाड्यातील एका आडगावात माझी थोडी फार शेती आहे. फारशी सुपीक नाही; पण नापीकही नाही. या जमिनीवर माझं जीवापाड प्रेम आह; पण या प्रेमानं काय भागणार ? पीक अवलंबुन असत ते त्या लहरी राजावर म्हणजे आपल्या पावसावर ! आमच्या गावाच्या जवळपास मोठी नदी, लहानसहान नद्यांना पाणी असतं, पण ते ही पावसावरचं अवलंबून. उन्हाळ्यात त्यापण आटून जातात. त्यामुळे मृगाचे नक्षत्र आलं की, आम्हां शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागतात. कुठे दिसतोय का आमचा काळा विठोबा ! म्हणजे काळा ढग हो ! शेत नागरुन ठेवायची, काटकुटं काढायचं, ढेकळं फोडायची आणि पावसाची वाट बघत राहायचं. अंग उन्हात नुसतं भाजून निघायचं, पण पाण्याचा पत्ताच नाही. चार पाच कोसावरुन बाया पिण्यासाठी पाणी आणतात. मग कधीतरी अवचित मळभ येतं. अंग गदगदुन सोसाट्याच वारं सुटत. इतक्यात पावसाचे थेंब पटपट गळू लागतात. क्वचित कधीतरी पडतात आणि गारांनी अंगण भरुन जातं. सारा गाव, लहान मोठी म्हातारी कोतारी त्या पावसात न्हाऊन निघतात. पावसात फक्त शरीरच भिजवतात असं नाही; तर मनही निवतात. आता शेतीला लागायला हवं, भिजलेल्या जमिनीत बी-बियाण टाकायला हवं. पाऊस राजाने अशी कृपा केली की रोपं तरारुन येतात. पण सगळं काही अवलंबुन त्या पावसावर. तेवढ्यात येईल ते पीक, मिळतील ते दाने त्यावर सगळं वर्ष काढायचं, हेच आम्हा कोरडवाहू शेतकऱ्याच नशिब ! पोळा झाला की पाऊस सरला.

उरलेल्या आठ महिन्यांत दुसरी पीक घेता येत नाही. कमी पाण्यावरची नाचणी वरईसारखी पिकं घ्यावी लागतात. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्याच्या नशिबी कायमचं दारिद्र्य ! कायमची उपासमार ! काय करणार ? मग सरकारकडे उंबरठे झिजवावे लागतात. भरमसाठ व्याजाने पैसे घ्यावे लागतात. मग ते फेडता फेडता अर्धा जीव जातो. आमच्या गावापासुन बऱ्यापैकी



Scanned with CamScanner

अंतरावरून नेत्रावती नदी वाहत इकडच्या भागातील नद्यांमध्ये ती बऱ्यापैकी मोठी आहे. या नदीवर धरण बांधलं आणि कालवांच्या मदतीने तीच पाणी आमच्या गावात खेळवलं तर गावाचा किती फायदा होईल ! आम्ही पण दोन पिक काढू शकतो, बागायत करू शकू, आमचे मनोगत पुर्ण होणार.

शेती करतांना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक इत्यादीकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीतील होण ारे शासकीय बदल अशा संकटांचा सामना करावा लागतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो रुपये खर्च करुन शेतकरी आपला शेतमाल तयार करतो त्याची काळजी घेतो. पण त्याच्या कष्टाला दरवेळी फळ मिळतेच असे नाही. तसेच शेतकऱ्यांसमोर हमीभावाची समस्या आहे.

## शेतकऱ्यांची ओळख

राब राब राबणारा
म्हणजेच आपलां लाडका शेतकरी
कष्ट करून लाड पुरवणारा
म्हणजेच आपला लाडका शेतकरी
उन्हा-तान्हात झुंजणारा
म्हणजेच आपला लाडका शेतकरी
कुटुंबासाठी रात्र-दिन लढणारा
म्हणजेच आपला लाडका शेतकरी
स्वता: उपाशी राहून दुसऱ्याचे पोट भरणारा
म्हणजेच आपला लाडका शेतकरी
पीकांना भाव जरी नसला तरी आस न सोडणारा
म्हणजेच आपला लाडका शेतकरी

– स्वाती पाचोरकर

## शेतकरी बाप

बाप नेहमीच कष्टात असतो
परिस्थितीशी झगडत असतो.
मुलांना आनंद देण्यासाठी
जीवाचा रान करत असतो.
आईच गुणगान खुप झाले,
पण बिचाऱ्या बापाने काय केल
बिकट प्रसंग बापच सदा सोडवी
आपण कायम गातो आईचीच गोडवी.
आईकडे असतील अश्रुंचे पाट
तर बाप म्हणजे स्वप्नांचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही
देवकी यशोदेचे प्रेम मनात साठवा
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेव ही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरत
काटकसर करुन देतो मुलास पॉकेटमनी
स्वत: वापरी मात्र शर्ट-पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर नवी-साडी
तरी बाप आटपतो बीन साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले असतात आपल्या विश्वात मग्न
बापाला दिसे मुलाचे शिक्षण पोरीचे लग्न
आई म्हणजे माता, आई म्हणजे माऊली
मग तो का नाही दाता, तो का नाही ?
चुक केवळ एक त्याची किती ताई आई
त्याला नाही मन, त्याला नाही भावना
आईवर कित्येकांनी पुस्तके लिहिली
पण बापाच्याच दु:खाला शब्दरूप
देतांना त्यांची शाई का संपली ?
उत्तर कुणाजवळ नाही या प्रश्नाचं
कारण बापाचं जीवन केवळ कष्टाचं.....

– पाचोरकर सोनाली संतोष



# होय, मी शेतकरी होणार ...!

– निखाडे मनिषा सुभाष

मी शेतकरी होणार कोणी तहानलेलं, भुकेलं भेटलं की त्याची तहान भूक भागविणं आणि त्याच्या चेहऱ्यावर हसू आनिणं, मी शेतकरी होईल आणि जगातल्या सर्व भुकेल्यांना पोटभर अन्न देईल. त्यांना दोन घास सुखाचे देण्यासाठी मी दिवसभर शेतात घाम गाळीनं अनं त्यांची दोन वेळाची गरज भागवेनं. त्यांची गरज बनून त्यांना मायेनं सांभाळीन. त्यांना भूक काय आहे त्याची जरा ही चाहूल लागून देणारं नाही. त्यांच्यासोबत ठामं उभा राहीनं, त्यांच्या सुखात मी आनंदी होईनं. त्यांच्या दु:खात मी त्यांना मदन करेन आणि त्यांचे स्वप्नं माझ्या मनात हृदयात साठवून ते पूर्ण करेनं, होय मी शेतकरी होईन.....

मी शेतकरी होईनं आणि माझ्या शेतात दिवसरात्र राबेनं आणि माझ्या मायबापासाठी शेतात घाम गाळून त्यांच्या पुण्याईने पीक उभारीनं. त्यांच्या पुण्याईने माझ्या घरात सुख नांदत आले. घर अगदी भरले आहे. आणि आता मी त्यांचा ऋणी आहे. आणि आता मला त्यांचे ऋण फेडायचे आहे. म्हणून मला खूप कष्ट करायचे आहे आणि त्या हाताने माझ्यासाठी आणि या जगाच्या कल्याणासाठी खूप सहन केले आहे. त्या हातांनी फोडाच्या जखमा सहन केल्या. त्यांच्या पाण्याने शेतातले खडे सहन केले पण ते हात आणि पाय यांनी कधी ही तक्रार केली नाही. बिच्यारे कष्ट सहन करतचं राहीले. आता मला त्यांचे दु:ख कमी करायचे आहे. मला त्या जखमांचे मलम व्हायचे आहे. मला त्यांना सर्व कष्टांपासून मुक्त करायचे आहे. त्यांना दोन सुखाचे घास भरवायचे आहे. त्यांच्या डोळ्यांतले स्वप्नं व्हायचे आहे. त्यांची काठी होवून त्यांची स्वप्ने पुर्ण करायची आहे. म्हणून होय, मी शेतकरी होईन.

माझ्या माय धरती तिने आतापर्यंत किती सहन केले. पण आता नाही. मला तिचे दु:ख कमी करायचे आहे. आई–वडीलानंतर तिचं तर आहे. जिने लहानपणापासून मला नाती शिकवली. माणसाची ओळख करून दिली. मोलाचे संस्कार दिले आणि वेळ आली तेव्हा कान सुद्धा धरले आणि गोड शिदोरी देऊन मला शाळेत देखील पाठवले. मी लहान असताना तिच्या सहवासात खेळलो. तिने मला माया, प्रेम दिले. आता मला तिला तिची काठी होऊन तिला सांभाळायचे आहे. आणि तिची मरेपर्यंत सेवा करायची आहे. तिला कोणतेही दु:ख किंवा वेदना द्यायच्या नाहीत. तिला नेहमी अभिमान वाटेनं असे मी वागेनं. तिच्या कुशीत वाढलो आणि तिच्या कुशीतचं विलीन देखील व्हायचं आहे. माझी माय माझी धरणी तिला मी सगळे सुख द्यायचा प्रयत्न करेनं आणि तिची गुलामी करतं आयुष्य संपविणं. म्हणून मी शेतकरी होईन.....

माझ्या धरणी मातेला मी कधीही दु:खी करणार नाही. तिला मी जिव्हाळा देईनं आणि तिच्या सावलीत माझे आयुष्य जगेनं. तिला सांभाळताना मला खुप अभिमान वाटत आहे. मी शेतकरी आहे म्हणून मला भाग्य लाभले कि मी धरणी मातेची सेवा करीन. तिच्या सोबत राहीनं का तर मी शेतकरी होईन म्हणून.....

*****



Scanned with CamScanner



# शेतकऱ्याच्या आत्महत्या ..!

- निखाडे मनिषा सुभाष

शेतकरी या जगाचा पोशिंदा. त्याच्या भाळी लिहिल रातदिस कामधंदा. कष्ट साऱ्या त्याच्या हाती दुसऱ्याच्या हाती माप. माझा शेतकरी बाप उन्हातान्हात करी कष्ट माझा कष्टकरी बाप. त्याला उन्हाळ्यात उन्हाच्या झळा लागल्या पण तो, कष्ट सोसत राहिला. कष्ट करत राहिला. माझा शेतकरी तो पावसाची वाट बघतो. आभाळाशी बोलतो. ढगांना विचारतो पाणी देतोय ना ! पाणी दे रे मी वाट पाहत आहे. मला तुझ्या पाण्यांत न्हाऊन निघून दे. मला तुझ्या थेंबाचे मोती आपल्या जमिनीत रुजून त्याचे शेत उभारायचे आहे. मला माझ्या शेतात धान्य डुलताना पाहायचे आहे. मला माझ्या मुलां-बाळांच्या तोंडावरचं हसू पाहायचं आहे. मला देखील दोन सुखाचे घास माझ्या मालकीनी संग खायचे आहे. तिच्या गळ्यात माझ्या नावाने काळे मणी रुजवायचे आहे. तिच्या कपाळावरच्या कुंकवाची लाज धरुन मी तिला सुखी करायला हवे.

शेतकरी फक्त एवढचं तर मागतोय. पणं नाही, त्याची ही छोटी अपेक्षा देखील पुर्ण होऊ शकत नाही. कारणं तो जी गोष्ट मागत आहे, ती गोष्ट त्याला मिळत नाही. याचे दोषी आपण आहोत. आपल्या हव्यासामुळे तो आज दुःखी आहे. आपणचं झाडे तोडली. आणि त्याच्या तोंडातला घास ओढून घेतला. आज आपल्यामुळे भारतात झाडांची संख्या कमी होत आहे. अगदी भारतातचं नाही, तर अगदी जगातचं झाडांची संख्या हळूहळू नाहीशी होत चालली आहे. कालातंराने ती अगदी शून्य होईल. त्या वेळेस हे जग संपलेलं असेल.

आज आपण टी.व्ही.वर बघत आहे. भिषण दुष्काळ यांमुळे शेतकरी ग्रासून गेला आहे. त्याला काय करावे हेच सुचत नाही. तो बिचारा पावसाची वाट बघतो. पण त्याला काय माहिती आपल्याचं बांधवांनी हे संकट त्याच्यापुढे आणले आहे. आणि आता ते भोगावे लागणार. शेतकरी तो बिचारा काय करु शकतो शिवाय वाट बघण्या शिवाय. पण तो काय करणार त्याला तर आपलं कुटुंब पोसायचं आहे. तो तरी कोणाकडे बघणार त्याला आता फक्त पावसाचीच आस आहे. तो आपल्या भोळ्या-भाबड्या चेहरा करून तो तर एकचं रस्ता अवलंबतो आणि तो म्हणजे आत्महत्या आणि तो फक्त एकच विचार करतो. या गोष्टींशिवाय दुसरा उपाय आपल्याकडे नाही. आपल्याला मरण्याशिवाय गत्यांतंर नाही. म्हणुन तो बिचारा आपल्या लहान मुलांना सांगतो. जर मी नसलो तर हे घर तुम्ही सांभाळणार ना ? तुझ्या आईला बाबा-आजीला सांभाळणार ना ? त्यांना कधी ही माझी आठवणं येऊ देऊ नका आणि त्या मुलांना काय माहीत की आपले बाबा का असं बोलतं आहे.

शेतकरी आत्महत्या करतो आणि आपल्या मुला-बाळांना पोरकं करुन जातो आणि जी बायको

आपल्या कुंकू कपाळावर घेऊन मिरवते आता ती कुंकूवाबिना कशी दिसते ? काय सांगू तिने आपल्या धन्याला साताजन्मांच्या सतीची शपथ दिली. पण त्याने अर्ध्या रस्त्यावरचं तिचा हात सोडला आणि तिला सोडून गेला.

आपल्या भारतात अधिक प्रमाणात शेतकऱ्याच्या आत्महत्त्येचे प्रमाण वाढले आहे आणि हे वाढण्याचे मुख्य कारण पुरेसे पाणी नाही. पाणी नसल्याने या शेतकऱ्याला आभाळाकडे लक्ष देऊन उभे राहावे लागते. तो बिचारा शेतकरी किती सहन करणार. किती झेलणार. त्याला पण दु:ख होत. त्याला पण वेदना होतात. हे आपण समजावून घेतले पाहिजे. त्या शेतकऱ्याच्या वेदना समजून घेऊन त्याला वाटेल तितकी मदत केली पाहिजे. त्याला समजून घेतले पाहीजे.

भारतामध्ये वाढते शेतकरी आत्महत्याप्रकरणे सरकार मदत करते. पण त्या शेतकऱ्याचा जीव गेल्यानंतर मग त्याच्या कुटुंबाला पैशांची मदत करतात पण तो शेतकरी सरकारच्या विनवण्या करुन आपल्या पायातले चपलीचे तळ झिजवून शहराकडे आपल्या समस्येच्या निवारणासाठी जायचा पण त्याला काहीही मदत मिळायची नाही. तो रात्री घरी माघारी काही न आणताचं यायचां आणि या शेतकऱ्याला ऐवढे दु:ख तो कसा सहन करेनं. मग काय आत्महत्या दुसरा काय उपाय त्याशिवाय दुसरे काय करणार असा त्याला प्रश्न पडायचा.

देश वाचवा, शेतकरी जगवा, शेतकऱ्याला मदत करा. त्यांना आपली गरज आहे. त्या गरजुंचे हात बना आणि सढळ हातांनी त्यांना मदत करा.

*****

## नाम ओठी विठ्ठलाचे...

नाम ओठी विठ्ठलाचे
आणि हाती टाळ आहे
काय गाऊ गीत त्याचे
कोरडा हा माळ आहे

घाम गाळे बाप-आई
डुलणारे पीक येथे
पीक तेही नासवितो
तो असा नाठाळ आहे.

सोडवावे मी कसे
हे शब्दकोडे जीवनाचे
वावरी हा रुतलेला
कर्जरुपी फाळ आहे

मोगलाई, ठोकशाही
एक तोही काळ होता
आजची ही लोकशाही
का तरी आबाळ आहे


थांबवा ती भाषणे
नी घोष सारे संस्कृतीचे
आजही पोटात माझ्या
पेटलेला जाळ आहे

– तिडके शितल बाळासाहेब



Scanned with CamScanner

# काव्य स्पंदने



## ।। सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ।।

चोवीस तास पाणी तुमच्या घरात
एक साधी एक इंची धार ही नाही आमच्या दारात
पाण्यावाचून आमची पिकं मेले तरी किती ?
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥१॥
दिवसभर लाईट तुमची
कुत्र्यासारखी दशा आमची
पिकावाचून आमचे हृदय जाळले तरी किती ?
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥२॥
खेळणऱ्यालाही पुरस्कार
पाहणाऱ्याला ही पुरस्कार
पैश्या वाचून आमचे तरूण बेरोजगार राहणार तरी किती ?
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥३॥
जिव जौस्तर ओरडलं, जिथं तिथं पाया पडलो
त्यानंतरही अशी अर्धवट कर्जमाफी करुन
उपकार आमच्यावर केले तरी किती ?
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥४॥
देशाचा अन्नदाता मरतो बिना खाता
दारिद्र्याचा या फासावर तुम्ही मृतदेह टांगले तरी किती ?
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥५॥



स्वप्नासाठी आटापिटा हे रक्त होत खरं
पण सांगा आता या परिस्थितीला उत्तर राहीली नाही का गळ्यानही दोर
कुपोषण । कुपोषणाची व्याख्या करण्यातच माणूस चुकतो
खरा कुपोषित आयुष्याचे जगभर भिक मागतच फिरतो॥
सांगा मला वचन सरकार तुम्ही पाळले तरी किती ? ॥६॥

– जाधव पूजा बाळासाहेब



Scanned with CamScanner



## अवकाळी....

नकोस बरसु आता
तोंडा जवळचा घास भिजला।
हा घास पिकवायला
माझा बाप रात-दिन झिजला॥
नको तेव्हा येतोस तु।
हवा तेव्हा नसतोस तु।
कर्जाखाली पिचलेल्या या मानेवर
थया थया नाचतोस तु
बोडकीभुई हिरवा चुडा,
फाडत होती
विस्काटलेल्या काचा बघून
माय माझी रडत होती।
डोळ्या देखत भिजत होती धनधान्याची रास
निसर्गाने हिरावला तोंडा जवळचा घास
बाप माझा सांगत होता
भिजल्या डोळ्यांनी हास...

– आहेर उज्ज्वला रावसाहेब,

## दुष्काळ

आभाळाकडे लागले डोळे,
जमिन पडली कोरडी खाक,
शेतकऱ्याच्या काळजाला
दुष्काळामुळे लागली आग !
पाण्यावाचून कासावीस झाला
जीव अन् झाला येडा पीसा,
शेतकऱ्याला संसारासाठी
खिशाला नाही आना पैसा.
पाण्यासाठी आकाशात
पाखरे करतात भिरभीर,
कधी येईल पाऊस राजा सगळ्यांनाच हूरहूर
संपूण गेला पावसाळा तरी,
आटून गेली नभ जरी
तरी शेतकऱ्याच्या मनात मात्र येईल
माझा वरूण राजा, ही मात्र खात्री खरी
पाण्यासाठी डोक्याला हात
लावून बसला माझा शेतकरी बाप
भेगाळलेल्या जमिनीत कधी येईल
ओलावा ती मात्र कोरडी खाक
चूक तर नाही त्यात निसर्गाची
चूक तर खरी आपली
आपण तोडलीत वृक्ष भरपूर
म्हणून आज लागली हूरहूर पाण्याची !

– जाधव प्रतिक्षा नंदू/ संगिता



Scanned with CamScanner

# शेतकऱ्याचा आक्रोश...

का ? शेतकऱ्यांच्या त्या आत्महत्या
नाही खुपत मनाला
शेतकऱ्यांचा तो आक्रोश
का ऐकू येत नाही कुणाला ॥
उपयोग नाही झाला
करून पेरणी दुबारा
झाला अवकाळी पाऊस
अन् पडल्या गारा
बिघडून विस्कटून गेला
हिशोबाचा मेळ सारा
शेतकऱ्यांच्या डोळ्यातल्या
थांबल्या नाहीत धारा
घर प्रपंचासाठी त्याचं
सर्वस्व लागल होत पणाला
पण शेतकऱ्यांचा तो आक्रोश
ऐकू येत नाही कुणाला ॥
शेतकरी राजा बिचारा
झाला आहे मुका
आसवांचा ओघ आता
झाला आहे सुका
मदतीला धावतो कुणी
नेता-अभिनेता
सांडवतात इकडे-तिकडे
गोळा केलेल्या व्यथा
व्यथेच्या त्या कथा आता
नाही स्पर्शत रे कुणाला
शेतकऱ्यांचा तो आक्रोश
ऐकू येत नाही रे कुणाला ॥
बरी नव्हे रे शेतकरी दादा
सावकाराशी ती गट्टी
कशाला हवी पोकळ
प्रतिष्ठा ती खोटी
हुंड्याची ती प्रथा मला
भासली आज अघोरी
लटकलेल्या बापाच्या फाशीची
तिच तर रे दोरी
खचू नको रे दादा
आणि नको खर्च त्या दारूला
शेतकऱ्यांच्या आत्महत्येच नाही रे
घेण देण आता कुणाला
मंत्री-संत्री करती
गुऱ्हाळ ती चर्चेची
भळभळणाऱ्या जखमेवरती
मलमपट्टी ती वरवरची
माध्यमही चघळतात
फुटत घातल्या आहेत
साऱ्यांच्या डोळ्यांतल्या संवेदना
का झाल ते विवश मन
हतबल निसर्गाच्या कोपाला ?
शेतकऱ्यांचा तो आक्रोश
ऐकू येत नाही कुणाला ॥
शेतकरी दादा तुला कायमची मदत
नाही रे कुणी करणार
तुझं तुलाच सावरायला हवं
तुला कधी रे कळणार ?
उघडे डोळे ठेवून तुला आता
जागृत रहायला हवं
गरज पडली तर हक्कासाठी
कधी भांडायलाही हवं
बदल राजा स्वत:ला
आणि कर समर्थ त्या मनाला
शेतकऱ्यांच्या आत्महत्या
नाही खूपत रे कुणाला
नाही खूपत रे कुणाला॥

- नागरे गायत्री भाऊसाहेब



Scanned with CamScanner



# शेतकऱ्यांचे हाल

विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लटकून मेला.

भारत कृषीप्रधान की क्रिकेटप्रधान
हाच मोठा प्रश्न पडतो
शेतकरी जगला काय मेला काय
सांगा कुणाला फरक पडतो.

अरे एखादी मॅच तुम्ही
वावरात घेऊन पहा
शेतकऱ्याची जिंदगी
एक तरी दिवस जगून पहा.

खेळाडूंसारखे करोड नको
फक्त पिकमालाला भाव द्या
कृषीरत्न कृषीभूषण नको
फक्त शेतकऱ्याला मान द्या.

– पाचोरकर ऋतुजा विजय

*****

# जगाचा पोशिंदा

तळपता सुर्य डोक्यावर घेऊनी
जेवताना कांदा भाकर खाऊनी
तापलेल्या मातीत घामाने भिजवूनी
पिक निर्माण करतो तो शेतकरी
शरीरात असे काही तरी
जे शरीरात ऊर्जा निर्माण करी
सगळे त्याला अन्नधान्य म्हणती जरी
ऊर्जा तीच निर्माण करी शेतकरी
शेतीसाठी हा कर्ज काढी
कर्जासाठी जाई सावकाराच्या दारी
निसर्ग कधी कोपे भारी
धन्याच्या सर्व नासाडी करी
शासनही अशा वेळी मदत न करी
मग शेतकरी आत्महत्या करी॥

– तिडके साक्षी केशव

*****

## उभ्या जगाचा पोशिंदा

काळ्या मातीतून कोंब फुटला
पीक डौलदार झाले त्याला डौलदार पीक म्हणतात.
काळ्या मातीतून पीक मोठे झालं,
त्याला डौलदार पीक म्हणतात.
आज दोन वेळेचं पोट भरू शकत नाही,
त्या माझ्या बापाला उभ्या जगाचा पोशिंदा म्हणतात.
झाड मोठं झालं का त्याच्या फुटणाऱ्या
पानाला फांद्या म्हणतात.
माझ्या बापाला आर्थिक वाट बंदीच्या
कारणाला नोट बंदी म्हणतात.
न आक्रोश करता मिळणाऱ्या बक्षीसाला
सातवे वेतन म्हणतात.
संप, आत्महत्या, आक्रोश करून मिळणाऱ्या
गाजर स्वरूपी बक्षीसाला कर्जमाफी म्हणतात.
काही गोष्टी सांगितल्यावर कळतात तर
कळत नाही त्याला आपलीच कमतरता म्हणतात.
ज्यांना जीएसटीचा अर्थ कळाला त्यांना तोटा
ज्यांना कळला नाही ते आमच्यासारखे
Good night Sweet dream Take Care
म्हणतात.
भारतीय तिर्थक्षेत्रांना वाराणसी, पंढरपुर, काशी
म्हणतात. ज्या बापात आम्ही विठ्ठल पाहिला,
तोच बाप मरतो त्याला फाशी म्हणतात.
माणूस माणसाला जागणे त्याला माणूसकी
म्हणतात.
आमचा बाप आमच्या कन्यादानापर्यंत टिकत नाही
त्याला आमचे दुर्दैव म्हणतात.
हक्क मागण्यासाठी फुटणाऱ्या वाचेला गर्जना
म्हणतात. मागुन मागुन थकला तरी त्याच्या पर्यंत
न पोहोचणाऱ्या गोष्टीला योजना म्हणतात.
आपल्या माणसाकडून काही मिळत त्याला अपेक्षा
म्हणतात.
उभ्या जगाचा पोशिंदयाला लोक साले हि म्हणतात.
देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला भारतीय
म्हणतात.
खऱ्या आयुष्यात आत्महत्या करणाऱ्या माझ्या
बापाला जाहिरातीत लाभार्थी म्हणतात.
एक मुलगी चिडुन म्हणते आईला का गं आई
याला असे म्हणतात, त्याला तसे म्हणतात,
आत्महत्या सरकारी नोकर नाही तर माझा
बाप करतो त्याला काय म्हणतात.
आई मात्र भावनिक होऊन म्हणाली,
सरकारी नोकराला सरकार पोहोचत
सरकारला तुझा बाप पोहोचतो त्याला
तुझ्या बापाची चुक म्हणतात.
लहान होती मी बाप मिळतो का बाप
असा आक्रोश करू लागली त्याला
पित्याची भूक म्हणतात.
अगं पोरी तुला बाप मिळेल,
मला नवरा मिळेल, घराला कर्ता पुरूष मिळेल,
जगाला पोशिंदा मिळणार नाही.
याला आजच्या वास्तवातील परिस्थिी म्हणतात.
इतकं सगळे असुनही सुखादु:खात डरकाळी
फोडणाऱ्या प्राण्याला ठाण्या वाघ म्हणतात.
वाघाच्या जबड्यात हात घालुन दात
मोजणाऱ्या शिवाजी, संभाजीच्या
महाराष्ट्रात राहणाऱ्या माझ्या बापाला
उभ्या जगाचा पोशिंदा म्हणतात.
उभ्या जगाचा पोशिंदा म्हणतात.

– दांडेकर राधिका राजेंद्र

*****



Scanned with CamScanner

## माझा शेतकरी

राब राब राबतो फार घाम तो गाळतो,
आशेच्या किरणाने तो आपले अश्रु पोसतो,
दु:ख असूनही मनामध्ये,
घरात मात्र सुख तो ठेवतो,
तरीही मात्र म्हणतात,
कि शेतकरी का आत्महत्या करतो ?
चेहऱ्यावर आनंद तर तो खूप दाखवतो,
पण स्वत:च्या मनात मात्र खचतच राहतो,
आपल्या मुलांना शिकवायचय,
शिक्षणाला लागणाऱ्या पैशाइतके,
त्याचे उत्पन्न सुद्धा नसते,
तरीही मात्र म्हणतात,
कि शेतकरी का आत्महत्या करतो ?
अरे ! जसा सुर्य उगवतो,
तसा तो शेतात राब राबतो,
सूर्य मावळण्याची वेळ होते,
तरी त्याला घराची आस लागत नसते,
एवढे करुनही त्याच्या हातात काही मिळतं नसते,
तरीही मात्र म्हणतात,
कि शेतकरी का आत्महत्या करतो ?
मुलीचे लग्न करायचे,
पण त्यासाठी पैसा लागतो,
म्हणून शेत-पिकासाठी तो,
मेघराज्याची वाट पाहतो,
पण मेघराजा काही येत नसतो,
त्यांच्या स्वप्नांचा पार चुराडा होतो,
तरीही मात्र म्हणतात,
कि शेतकरी का आत्महत्या करतो ?

– टेकनर रुपाली राजेंद्र

*****

## शेतकरी आत्महत्या

प्रयत्न केला असतास परत
झाला असतास पास
जीव देण्याआधी आठवले
नाहीत का रे मित्र खास
आता त्या काठड्यावर
होतोय फक्त तुझाच भास
सगळे आहेत रे जवळ
पण तुच नाहीस आसपास
कसा जाईल तुझ्या आई वडिलाच्या
घश्या खाली घास
जेव्हा आठवेल त्यांना तुझाच चेहरा
आणि तु लावून घेतलेला गळफास
कोणत्या गुन्हाची देतोयस
आम्हा सर्वांना ही शिक्षा
नीट विचार करायला हवा होतास
कोण करेल आता तुझ्या ताईची रक्षा
तुझ्या जाण्याच मित्रा
कारण असेल कांही
पण त्रास देण्याची पद्धत
काही बरोबर नाही
उठ जरा, बघ नीट
कशी रडते तुझी आई
आणि असं करण्या आधी
तुला तिचा विचारच आला नाही.

– पाचोरकर सोनाली संतोष

*****



Scanned with CamScanner



## आई....!

आई या दोन शब्दांत
संपुर्ण अखंड विश्वास
संस्कार मला तुझे
सामर्थ्य देती
भवसागर तरुण जाया
आई तुझ्या मायेने घर बनले मंदिर
थकलेल्या, दमलेल्या मनाला
तुझे गोड शब्द देई धीर
केवळ तुझ्याच आशीर्वादान
अद्‌भूत शक्तीचा श्वास
वाढविते आमचे सामर्थ्य
लागते आम्हाला संस्काराची आस
आणि हलका वाटे कठीण
कामाचा त्रास
ईश्वर तुला देवो चांगले आरोग्य
आणि सुखाचे दान
देवा सतत आनंदात असू दे
आमचे आनंद धाम.....

– पाचोरकर सोनाली संतोष

*****

## लोक काय म्हणतील....?

तू हसलीत तर ते जळतील
तू रडलीस तर ते हसतील
काही नवं केलं तर पाप म्हणतील
जुन्यात अडकून राहीलीस तर श्राप म्हणतील
गमावलं तर दरिद्री म्हणतील
कमावलं तर माज म्हणतील
पुढे निघालीस तर मागे ओढतील
मागे राहिलीस तर तुडवतील
तू हात दिला तर साथ म्हणतील
तू तुझाच विचार केला तर स्वार्थ म्हणतील
कौतुक केलं तर वाहवा म्हणतील
उणीव दाखवली तर जा म्हणतील
काही केलं तर.... काय केलं ? म्हणतील
नाही केलं तर.... काय केलं ? म्हणतील
म्हणुनच....
तू जग तुला हवतसं
जगाच काय !!
ते काहीही म्हणतील....

– थोरमीसे स्वाती अशोक

## जीवन संघर्ष ....

असं जीवन जगावे की जीवनाचा सगळ्यांना हेवा वाटावा. एखाद्या अरण्यात वाट चुकावी, विश्रांती घेण्यासाठी झाडाखाली बसावे. आपल्या पायाजवळ विचूं दिसावा, आणि त्याला मारण्यासाठी दगड उचलावा, त्या दगडाखाली साप निघावा. त्याने आपला पाठलाग करावा.

जंगलातून जीवन मुठीत घेऊन पळतानां वेलींना आच्छादलेल्या विहिरीत आपण पडावे. पाण्यात भली मोठी मगर असावी. तिने वेध घेण्यापूर्वीच एका छोट्या फांदीचा आधार घ्यावा. वर येण्याची जीवघेणी धडपड करत असतांना काठावरती पाण्याच्या शोधात असणारा वाघ दिसावा. त्याच्या एका डरकाळीने आपल्या फांदीचा तोल सुटावा. पायाखाली असलेल्या मधमाशीच्या पोळ्याला छेदून आपला पाय जावा आणि विहिरीच्या त्या शेवटच्या फांदीला आपण घट्ट पकडावे. डिवचलेल्या त्या पोळ्यातील शेकडो माशांनी आपला चावा घ्यावा, आणि अशा परिस्थितीत मधाच्या पोळ्यातील पडणारा मध तोंडाने झेलण्याचा प्रयत्न करावा. यालाच जीवनाची खरीखुरी ताकद म्हणतात.

– थोरमिसे स्वाती अशोक

*****

## चारोळी

सह्याद्रीच्या कुशीतून एक
हिरा चमकला, भगवा टिळा
चंदनाच्या, शिवनेरीवर
प्रगटला, हातात घेऊन तलवार
शत्रुवर गरजला,
महाराष्ट्रात असा एक राजा
होऊन गेला.
महाराष्ट्रात असा एक राजा होऊन गेला.

– दांडेकर राधिका राजेंद्र

*****

## चारोळ्या

मैत्री म्हणजे.....
एक प्रेमळ हृदय जे
कधी तिरस्कार करत नाही,
एक गालावरील खळी जी
कधी रडू देत नाही.
एक भास जो
कधी दुखवत नाही,
आणि
एक गोड नातं जे
कधी संपतचं नाही.

– थोरमीसे स्वाती अशोक

*****



Scanned with CamScanner

## शेतकरी

जन्मतो तो पृथ्वीवर अन्नदाता म्हणुनी
त्या अन्नाच्या कणासाठी मात्र तोच झटतो
घेऊन डोक्यावर कर्ज त्याला कष्ट घेण्याचे सांगते
ऊन, वारा, पाऊस, पाणी याचे त्याला भान नसते.
पिकाच्या प्रत्येक कणाला त्याला छातीस लावावे लागते
एवढे करुनही त्याच्या नशिबी काय येते ?
येते ती फक्त आत्महत्या
का तो शेतकरी आजही पारतंत्र्यात अडकलाय ?
का तो शेतकरी अन्नदाता बनलाय ?
का त्याच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतलाय ?
का देवा तु असा भांडतोस,
परिश्रम जो करतो त्याला
मजबूर तु करतोस ?
हाच तुझा न्याय असेल तर
तो शेतकरी तरी काय करेल ?
मग तुझ्या या चिमुरड्यांच पोट कोण भरेल.

– सातभाई भारती

*****

## Until We Meet Again

Those special memories of you
Will always bring a smile
If only I could have you back
For just a little while
Than we could sit & talk again
Just like we used to do
you always-ment so very much
and always will do too.
The fact that your no longer here
will always cause me pain
but your for ever in my heart
Until we meet again....

**- Sathbhai Bharti**

*****



## शेतकरी....

नाम होठी विठ्ठलाचे, आणि हाती टाळ आहे
काय गाऊ गीत त्याचे, कोरडा हा माळ आहे.
घाम गाळे बाप आई, डोलणारे पीक येते
पीक तेही नासवितो, तो असा नाठाळ आहे.
सोडवावे मी करते हे, शब्दकोडे जीवनाचे
वावरी हा रुतलेला, कर्जरुपी फाळ आहे.
मोगलाई ठोकशाही, एक तोही काळ होता
आजची ही लोकशाही, का तरी आबाळ आहे.
थांबवा ती भाषणे नी, घोष सारे संस्कृतीचे
आजही पोटात माझ्या, पेटलेला जाळ आहे.

– तिडके शितल बाळासाहेब

*****

## A Farmer's Prayer

Bless me with friends who come when I call
Land that's fertile so my crops will grow tall
Reliable equipment that doesn't breakdown
Weather that's perfect sunup to sun-down
A bountiful harvese I will not regret
For I am a farmer on this you can betl
A men.

**- Swati Pachorkar**

*****

## A Farmer's Fantasy

With just a handfull of barren land,
And to ttering dreams based on the sand
Yet the desire continued to bloom
To produce the green out of the doom.
No trill now, can satidte his needs
A tinge of grass is for all he pleads.
Extracting life out of nature's legacy
So small is that famer's fantasy....

**- Swati Pachorkar**

*****

## A Farmer

Once in a while in life you,
need a doctor, a lawyer, a
policeman or maybe a
preacher, But every day,
three times a day,
you need a farmer.

**- Swati Vasant Pachorkar**

*****

## Farming is Not An Industry

Farming is not an industry
How did we go so wrong ?
Why did we race with such aplomb
to sing the wrong song ?
What made us ambrace a model
that doesn't fit
And then become slaves to it ?
Farming is a relationship
Animals, plants, the land,
Working together with humans
perhaps had in hand
or mayba abusing
and all that fuss.
Isn't it up to us ?

**- Swati Pachorkar**

*****



Scanned with CamScanner

## शेतकऱ्याचा न्याय....

शेतकरी म्हणून माझ्यावर, सदाच होतो अन्याय
मिळेल का माझ्या, कष्टाला न्याय ?
शेतकऱ्याच्या घरी जन्मलो,
ह्यात माझा काय गुन्हा ?
माझ्यावरच संकट, येतं पुन्हा, पुन्हा
संकटावर मात करण्यास, सांगा काही उपाय ?
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
गहाण ठेवली शेती आता नाही सुटत
सारं रान विकलं तरी, कर्ज नाही फिटत....
कर्जापायी सावकारानं, विकायला काढलं
की पायी मास्तरान, पोर घरी धाडलं.....
पोराच्या शिक्षणाच्या सांगा करु काय ?
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
कधी वल्ला दुष्काळ, कधी कोरडा सुकाळ....
दुष्काळा तोंड द्यायची, जडली आता सवय....
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
माय-बाप बिचारे, शेतातच राबले
जलमभर राबून, मातीतच खपले....
तीच गत माझी, ठाव मला हाय तरी पण
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?

– स्वाती वसंत पाचोरकर

*****



## माझी शेतकरी जमात

माझी शेतकरी जमात....
कधी न पाहिली सुखाची वाट
पडला मोठा गावात दुष्काळ
नाही कुणाला आमची तळमळ
फक्त मांडला शब्दांचा खेळ
कधी नाही केला दु:खाचा डोंगर
माझी शेतकरी जमात....
नाही मिळते पोटाला भाकर
घेऊन चिमटा काढतो रात्र बरं
झोपायला जमीन पांगरायला आभाळ
नाही कुणाला आमची कळकळ
माझी शेतकरी जमात....

– कोतवाल ईशा अविनाश

*****



# शेतकरी

तळपता सुर्य डोक्यावर घेऊनी
जेवताना कांदा भाकर खाऊनी
तापलेल्या मातीला घामाने भिजवूनी
पिक निर्माण करतो तो शेतकरी
शरीरात असे काहीतरी
जे शरीरात ऊर्जा निर्माण करी
सगळे त्याला अन्नधान्य म्हणती जरी
ऊर्जा तिच निर्माण करी शेतकरी
शेतीसाठी हा कर्ज काढी
कर्जासाठी जाई सावकाराच्या दारी
निर्सगही कधी कधी कोपे भारी
धान्याची सर्व नासाडी करी
शासनही आशावेळी मदत न करी
मग शेतकरी आत्महत्या करी
कधीतरी मध्येच सरकारला जाग येई
मग एखादया पिकाला हमीभाव देई
आश्वासन असे जे कधी पूर्ण न होई
आशामुळेच रोज शेतकऱ्यांचा जीव जाई !!

*****

# व्यथा बळीराजाची

काळी माझी आई
काय गावी तीची ओवी
भारी तीची थोरवी
अन्न उभ्या जगाला पुरवी
काळ्या आईच्या कुशीत
घेतो शेतकरी पीक
कष्ट करुन शेतकरी
घेतो आभाळी भरारी
साऱ्या जगाचा तो पोशिंदा
परी नशिबी त्याच्याच निंदा
त्याच्याविना नाही पोटपाणी
परी सोसावी लागते त्याला मानहानी
कोण वाली कोण वाली
या बळीराजाला कोण वाली
नावापुरताच नुसता राजा
पुऱ्या जन्माची त्याला सजा
येतात जेव्हा सरकारी निवडणुका
तेव्हाच पडतो आश्वसनाचा पाऊस
बळीराजा पाहतो मदतीची वाट
पण कोण भागवेल शेतकऱ्याची हाऊस
नेते तर म्हणतात, मी पुन्हा येईल
पण त्याता काय उपयोग
शेतकऱ्याची परस्थिती मात्र
तशीच तर राहील.
शेवटी नशिबी येते तर काय
कर्जाचा डोंगर अन् दु:खाचे सावट
मग या अन्नदात्याला एकच
मार्ग सुचतो तो म्हणजे
आत्महत्या, आत्महत्या, आत्महत्या ॥

– पवार कावेरी निवृत्ती

*****

## एक प्रश्न

दारुशिवाय माणुस जगू शकतो, तरीही
दारु बनविणारा करोडपती
तंबाखुशिवाय माणुस जगू शकतो, तरीही
तंबाखू बनविणारा करोडपती
मोबाईल शिवाय देखील माणुस जगू शकतो, तरीही
मोबाईल बनविणारा करोडपती
पण, अन्नाशिवाय माणुस जगूच शकत नाही
तरी ही ते अन्न बनविणारा शेतकऱ्याच्या दारी मात्र
अठराविश्व दारिद्र्य का ?

– पवार कावेरी निवृत्ती

*****

## सुविचार

कृतज्ञता आणि कृतघ्नता हे दोन खुप छोटेसे शब्द
तुमच्या विचारक्षमतेची
तुमच्या व्यक्तिमहत्त्वाची
तुमच्या जीवनशैलीची
आणि पर्यायाने तुमच्या
आयुष्याची दिशा ठरवितात.

*****

## शेतकऱ्यांची यथोगाथा


माझ्या शेतकरी बापाची हि आहे यथोगाथा
तुच या जगाचा आहेस दाता
शेती बहरली खूप
त्याच्या आनंदाला नाही कुठलं ही माप
तु या जगाचा आहेस पिता
माझ्या शेतकरी बापाची ही आहे यशोगाथा
तुच या जगाचा आहेस दाता॥
काम करता करता दुपार ही उलटते
भुक अमाप ही लागते पोट भाकरी मागते
शेतकरी राज्याच्या पायावर ठेवावा माथा
माझ्या शेतकरी बापाची हि आहे यथोगाथा
तुच या जगाचा आहेस दाता ॥
जगाच्या सुखासाठी तुझ्या रक्तांचे तु करतोय पाणी
तुझे कौतुक ही गाऊन गेली संतांची वाणी
ते नाही राहीलं कुणाच्याही ध्यानी
माझ्या शेतकरी बापाची हि आहे यथोगाथा
तुच या जगाचा आहेस दाता ॥
तुझ्या ऐकतांना कथा
अश्रु डोळ्यांतून वाहता
तुझ्या कर्माची माझ्या मनी जळते व्यथा
माझ्या शेतकरी बापाची हि आहे यथोगाथा
तुच या जगाचा आहेस दाता ॥

– कोतुळे चैतल्या जगदिश

*****



Scanned with CamScanner



# दुष्काळ

दरवर्षी पडतो हा दुष्काळ
कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ
तेव्हा माझ्या या शेतकरी बापाची कशी पिकणार साळ ?
आज ही राखतो तो शेतावरील माळ॥
शेती म्हणता म्हणता दिसू लागली काळी माती
कश्या पेटणार घरात आनंदाच्या वाती
माझ्या शेतकरी बाधवांच्या काय पडणार हाती ?
तरी आजही जपतोस सगळीचं नाती ॥
दुष्काळ दुष्काळ ही कसा आला काळ
या शेतकरी बांधवांची कथा पाहून प्रत्येकाचंच मन होत घायाळ
पण का नाही प्रतिसाद देत हे आभाळ ? आता देवा तुच कर याचां सांभाळ॥
शेतकरी राज्यांच्या स्वप्नांची दुष्काळ करतो माती
तरी इतकी संकट पेलत करतो तो शेती
कधी फुलतील त्यांच्या कष्टांचे मोती ?
शेतकरी राजा किती करतो मशागत
जेव्हा पडते दुष्काळाची झाप
तेव्हा वाढतो त्यांचा व्याप
त्याला मोजण्यासाठी इथं आहे का कुठलं माप ?
त्यांची हरपली झोप मग प्रकटतो संताप॥

– कोठुळे चैतल्या जगदिश

*****



Scanned with CamScanner

# ❊ मराठी विभाग ❊

**प्रा. व्ही. एस. जाधव**
(एम.ए.नेट.)
मराठी विभाग प्रमुख -
अध्यापन अनुभव - १४ वर्षे
चर्चासत्र सहभाग - राष्ट्रीय - ३,
राज्यस्तरीय - ९
- सांस्कृतिक कला मंडळ प्रमुख
- युवा स्पंदन प्रमुख
- केंद्र कार्यवाह, बहि:शाल शिक्षण मंडळ

**प्रा. एस. एन. राठोड**
(एम.ए.,नेट.)
अध्यापन अनुभव - ६ वर्षे
राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन.

## अहवाल २०१९-२०

मराठा विद्या समाजाचे कला आणि वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव, तालुका चांदवड, जि. नाशिक येथे मराठी विषय महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेत ४५ विद्यार्थी मराठी हा विषय विशेष स्तरावर घेऊन पदवीचे शिक्षण घेत आहेत.

वाणिज्य शाखेत 'प्रथम वर्ष वाणिज्य' या वर्गासाठी व्यवहारिक व उपयोजित मराठी या अनिवार्य विषयाद्वारे विद्यार्थी मराठी भाषेचे अध्ययन करत आहे.

मराठी विभागातर्गत मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. शंकर बोऱ्हाडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतातून साहित्याची जडण घडण मांडली. साहित्य समाजाचा आरसा असतो आणि त्यातूनच समाजाची जडणघडण होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणार व्यासपीठ म्हणजे वाङ्मय मंडळ असते असे प्रतिपादन त्यांनी केले.

वाङ्मय मंडळागर्तत वर्षभर विद्यार्थ्यांच्या साहित्य गुणांची जोपासना करण्यासाठी भित्तीपत्रके, निबंध स्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येते. विविध महाविद्यालय जिल्हा, राज्य स्तरावरील निबंध - वक्तृत्व स्पर्धेमध्ये मराठी विभागातील विद्यार्थी सहभाग नोंदवतात.

जिल्हास्तरीय ॲड. विठ्ठल हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथे मराठा विद्या प्रसारक वक्तृत्वस्पर्धासाठी महाविद्यालयाच्या मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व आपले वक्तृत्व सादर करून विषयाच्या बाजूने आपले मत मांडले

कविवर्य कुसुमाग्रज तथा तात्यासाहबे शिरवाडकर यांचा जन्मदिवस दि. २७ फेब्रुवारी 'मराठी दिन' व 'मराठी राजाभाषा दिन' महाविद्यालयात साजरा करण्यात येतो. त्यावेळी मराठी विभागातील विद्यार्थी वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्यातत्याचे वाचन करतात. मराठी विभागाच्या कु. सलादे सोनाली हिस केशव मेश्राम पुरस्कार प्राप्त.

महाविद्यालयाचे प्राचार्य ए. एल. भगत यांचे विभागाला सतत मार्गदर्शन लाभते. मराठी विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असतो.

----❊❊❊----



Scanned with CamScanner

# The Department of English

Prof. K. L. Shinde
M.A.B.Ed., Set

Research - 12 research papers are published.

2 Research papers published in International Journals. Participated and presented papers in 10 seminars.

1) Our department organised The Soft Skill Development programme. Some lectures have been organising for effective communication skill.

2) Remedial course have been organising for slow learners or poor students in English.

3) In specail guidance lecture scheme some lectures were arranged on The Personality Development and Interview skills.

4) Optional English subject has been starting for F.Y.B.A. This subject has started for the purpose to develope English Competence among rural students. The knowledge of English language and communication skill is the need of present hour.

----***----



Scanned with CamScanner

# * अर्थशास्त्र विभाग *

**प्रा. डॉ. डी. डी. गव्हाणे**
(विभागप्रमुख व सहा. प्राध्यापक)
M.A., Net, SET, Ph.D.
राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन, १३ शोधनिबंध. विविध नियतकालिकांत प्रकाशित.

**प्रा. एम. एम. भोसले**
(सहा. प्राध्यापक)
M.A., B.Ed.
राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अर्थशास्त्र हा विषय विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी अर्थशास्त्राचा विशेषस्तरावर अभ्यास करीत आहे. वाणिज्य विभागासाठी अर्थशास्त्र हा विषय अनिवार्य असल्याने सर्वच विद्यार्थी अर्थशास्त्राचे अध्ययन करतात.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून प्रथमच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. 'ब्रेक्झीटचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावरील चर्चासत्र ३ डिसेंबर २०१८ रोजी झाले. यात ३२ संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले, तर ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शोधनिबंधाचे संकलन करुन एक पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'इंटरनेट बँकिंग व कॅशलेश व्यवहार' या विषयावर ९ डिसेंबर २०१८ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ११ जुलै २०१८ रोजी ''जागतिक लोकसंख्या दिन'' या निमित्ताने लोकसंख्येविषयक माहिती व प्रवृत्ती यांवर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. पठारे यांनी या संदर्भात मार्गदर्शन केले.

----***----



Scanned with CamScanner

# * भूगोल विभाग *

**प्रा. ए. एल. भगत**

एम.ए./एम.एस्सी, नेट.

- सेवेचा अनुभव ६ वर्षे, सहा. प्राध्यापक एम.व्ही.पी. समाज नाशिक.

- ५ वर्षे प्रभारी प्राचार्य, वडनेर भैरव महाविद्यालय.

- विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग. एक राज्यस्तरीय रिसर्च पेपर प्रकाशित.

- जी. आय. एस. व आर. एस. मध्ये २१ दिवसाचा कोर्स वर्क व ८ दिवसाचा ॲडव्हान्स सर्व्हिंग कोर्स वर्क पूर्ण.

- "Climatic variabitity and It's impact in Agriculture in Nasik and Jalgaon District of Maharashtra" या विषयावर पी.एचडी. सुरु आहे.

महाविद्यालयात भूगोल हा विषय एफ. वाय./एस.वाय/टी.वाय बी.ए. या वर्गांना सामान्य स्तरावर शिकविला जातो. एफ.वाय. बी.ए.साठी भुरुपशास्त्राची मुलतत्त्वे, एस.वाय.बी.ए. साठी. 'वातावरण व सागरशास्त्र, तर टी.वाय.बी.ए.साठी 'भारताचा प्रादेशिक भूगोल' हे विषय शिकवले जातात. शिकवितांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन वापर केला जातो. भूगोल विभागांतर्गत 'भूगोल दिन, पर्यावरण दिन, ओझोन दिन' जागतिक लोकसंख्या दिन या सारखे कार्यक्रम घेतले जातात. भूगोल विषयामध्ये विद्यार्थ्यांची मार्क परंपरा देखील चांगली आहे. भविष्यात हा विषय स्पेशल स्तरावर शिकवण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते व विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असते.

----***----

# * राज्यशास्त्र विभाग *

**प्रा. भिमराज पी. गायकवाड**
सहा. प्राध्यापक
एम.ए., सेट.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- अभ्यासक्रम बदलासंदर्भातील कार्यशाळेतील सहभाग.
- जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन.
- महाविद्यालयीन स्तरावर 'मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन' या कार्यक्रमाचे आयोजन.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव येथे सन २००९ पासून राज्यशास्त्र हा विषय सामान्य व विशेष स्तरावर शिकवला जातो. तसेच या विभागा अंतर्गत वेगवेगळे सामाजिक जागृतीचे कार्यक्रम व उपक्रमाचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०१९ – २० अंतर्गत महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाअंतर्गत अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात मतदान जागृती व नव मतदार नोंदणी कार्यक्रम, संविधान दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नव मतदार नोंदणी व मतदार जागृती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख व्याख्याते आ. डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. ए. एल. भगतसर उपस्थित होते. यावेळी वडनेर गावातून मतदार जागृतीची फेरी काढण्यात आली. तसेच १०० नव मतदारांची नोंदणी करण्यात आली. संविधान दिनी पिंपळगांव महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ज्ञानोबा ढगे यांनी लोकशाहीचा मान बिंदू आमचे संविधान या विषयावर व्याख्यान दिले.

तसेच राज्यशास्त्र विभागातील प्रा. भिमराज गायकवाड यांचा म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय खेडगांव यातील राष्ट्रीय चर्चासत्रात **हिंदी महासागराच्या दृष्टीने भारताचे महत्त्व व चीनची भूमिका.** या विषयावर शोध निबंध प्रकाशित झाला. आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेत आय.सी.टी. भूमिका हा शोध निबंध महिला महाविद्यालय, नाशिकरोड येथील राष्ट्रीय चर्चासत्रात प्रकाशित झाला. तसेच राज्यशास्त्र विभागातील कु. निकिता लक्ष्मण गांगुर्डे या विद्यार्थीनीचा म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, खेडगांव येथील राष्ट्रीय चर्चासत्रात **भारत आणि चीन संबंध** या विषयावर शोध निबंध प्रकाशित झाला.

----***----



Scanned with CamScanner

# * वाणिज्य विभाग *

**प्रा. एन. डी. वडघुले**

एम. कॉम, नेट, सेट

सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग प्रमुख

विद्यार्थी विकास अधिकारी (एसडीओ)

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध सादर.

सहभाग – ३ राष्ट्रीय, शोधनिंबध सादर – ४ राज्यस्तरीय तसेच सेवेचा अनुभव – ६ वर्ष

उत्तर महाराष्ट्रातील शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांच्या प्रशासकीय कार्याचा चिकित्सक अभ्यास. या विषयावर पीएच.डी. सुरु.

**प्रा. प्रमोद पी. निकम**

एम.कॉम., बी.एड., नेट, सेट

सहाय्यक प्राध्यापक

– युवा स्पंदन उपक्रम सदस्य.

**वाणिज्य विभागाने वाणिज्य मंडळाअंतर्गत आयोजित केलेले काही उल्लेखनीय उपक्रम.**

– दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी नाशिक येथील सी.ए. श्री. राकेश कुमार परदेशी (करिअर कौन्सलिंग) ग्रुप, नाशिक यांचे सी.ए. एक प्रतिष्ठेचे करिअर या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.

**प्रा. डी. एच. भगुरे**

एम.कॉम, एम. फील, नेट, सेट, जी.डी.सी.ॲण्ड ए.

सहाय्यक प्राध्यापक व सेवेचा अनुभव – ९ वर्ष

१) राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग तसेच शोधनिबंध वाचन (सहभाग – १५ राज्यस्तरीय, ८ राष्ट्रीय – १२) २) शिवजयंती तसेच विविध उत्सवप्रसंगी विविध गावात सामाजिक विषयांवर व्याख्याने. महाविद्यालयात 'वाणिज्य मंडळ' अंतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन. ३) औद्योगिक सहलींचे आयोजन. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कार्यक्रम अधिकारी. ४) उत्तर महाराष्ट्रातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचारी व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. सुरु.

## OTHER

**Industrial Visit :-**

1) Commerce Association

We have an active sell named as commerce association which organizes various usefull programs relating to commercial education. Marketing research & economical development of society.



Scanned with CamScanner

# * मानसशास्त्र विभाग *

**प्रा. पाटील एम. ए.**
(एम.ए.बी.एड.)
मानसशास्त्र विभाग प्रमुख

मानसशास्त्र विभागामार्फत विद्यार्थी समुपदेशन व मागदर्शन केले जाते. वेळोवेळी अनेक प्रख्यात समुप्रदेशकांमार्फत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते.

'मानसशास्त्र' विषय सामान्यस्तरावर शिकविला जात असून महाविद्यालयीन कला शाखेतील अनेक विद्यार्थी हा विषय घेवून पदवी शिक्षण घेत आहे.



Scanned with CamScanner

# * जिमखाना विभाग *

**प्रा. काकड नामदेव रमेश**
शारीरिक शिक्षण संचालक
बी.ए., एम.पी.एडी, सेट.

जिमखाना विभागाचा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या विविध क्रीडा उपक्रमांमध्ये आमच्या खेळाडूंनी अत्यंत उत्साहाने भाग घेऊन महाविद्यालयाचे नाव उज्वल केले.

या शैक्षणिक वर्षी महाविद्यालयातील आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल, आर्चरी बेस बॉल, क्रिकेट, पोहणे, धावणे, मैदानी स्पर्धा, शुटींग, बुध्दीबळ, कुस्ती व बॅड मिंटन. या खेळ प्रकारांमध्ये ७३ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यापैकी खालील खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली. या क्रीडा प्रकारातून खालील ६ खेळाडूंची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

१) शिंदे ऋतिक आबाजी (मैदानी स्पर्धा), २) कु. म्हसकर नम्रता गोविंद (फुटबॉल)र, ३) बेंडके ऋषिकेश सुभाष (वेट लिफ्टींग), ४) कु. शिंदे सोनाली अशोक (कुस्ती), ५) कु. जाधव स्वाती रावसाहेब (कबड्डी), ६) टेकनर राहुल अशोक (मॅरेथॉन)

त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन गटातून एकूण ५२ विद्यार्थ्यांनी शालेय व विभागीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग नोंदविला. त्यामध्ये एकूण ३ विद्यार्थी विभागीय स्तरावर पात्र ठरले. म.वि.प्र. मॅरेथॉन स्पर्धेत २०१९-२० या वर्षी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येकी ६ व १० असे एकूण १६ खेळाडू सहभागी झाले होते. त्यात वरीष्ठ महाविद्यालयातील टेकनर राहुल अशोक या विद्यार्थ्याने (१२ कि.मी. महाविद्यालय गट) तृतीय क्रमांकाने विजयी झाला. या कामी संस्थेचे संचालक श्री. उत्तम बाबा भालेराव, शालेय व्यवस्थापन समिती, महाविद्यालयीन विकास समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांचे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत, श्री. गवळी जी. आर (कनिष्ठ महाविद्यालय शा.शि.शिक्षक) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

----***----



Scanned with CamScanner

# * ग्रंथालय विभाग *

**प्रा. संदीप लोखंडे**

ग्रंथपाल

एम.कॉम, एमलीप, इन्फरमेशन ॲण्ड सायन्स, नेट ॲण्ड सेट, पीजीडी लॅन.

**श्री. गंगाधर रमेश आहेर**

ग्रंथालय सहाय्यक

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद वाक्याप्रमाणे ग्रामीण भागात शिक्षणाचे पवित्र कार्य करतांना म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव स्थापना २००९ साली झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात ग्रंथालय, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विविध पुस्तकांद्वारे माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य करत आहे.

## ग्रंथालय संग्रह :-

महाविद्यालयीन ग्रंथ संग्रहालयाचा ग्रंथ संग्रह हा उत्तमरित्या विविध ज्ञानशाखांनी विकसित केलेला आहे. ग्रंथालयात मोठ्या प्रमाणावर विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर आधारित ग्रंथांबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे संर्दभ ग्रंथ तसेच जीवन विषयक विविध शास्त्रीय ग्रंथांचा सहभाग आहे.

## संदर्भ ग्रंथ :-

७,५००, क्रमीक ग्रंथ - २५००, नियतकालिके - १०, सीडी व डिव्हीडी - १०५,
नकाशे - १०, वर्तमान पत्रे - ७.

## ग्रंथालय सभासद :-

महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी वर्ग, सभासद संख्या ३५० तसेच महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्थानिक व्यवस्थापन समिती. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी हे ग्रंथालयाचे सभासद आहेत.

## ग्रंथालय सेवा :-

१) ग्रंथालयातून ग्रंथ देवघेव सेवा, २) संदर्भ सेवा

३) निवडक माहिती प्रसारण सेवा, ४) झेरॉक्स सेवा

५) इंटरनेट सेवा, ६) वर्तमानपत्र कात्रण सेवा इ. सेवा पुरविल्या जातात.

----***----



Scanned with CamScanner

# * परिक्षा विभाग *

**प्रा. डॉ. डी. डी. गव्हाणे**

(महाविद्यालयीन परिक्षा अधिकारी)

महाविद्यालयात कॉपीमुक्त परिक्षा घेतल्या जातात. सी.सी.टी.व्ही.च्या अंतर्गत सर्व परिक्षा व परिक्षा विभाग आहे.

मार्च/एप्रिल २०१९ मध्ये झालेल्या पुणे विद्यापीठ परिक्षांचा निकाल पुढीलप्रमाणे

| वर्ग | निकाल | | गुणानुक्रमे विद्यार्थी |
|---|---|---|---|
| बीए (प्रथम वर्ष) | ७८.३१ | १) | पवार अश्विनी अनिल – ७६.८३% |
| | | २) | घडवजे ज्योती मधुकर – ६६.६७% |
| | | ३) | व्हरगळ माधुरी भाऊसाहेब – ६४.५०% |
| बीए (द्वितीय वर्ष) | ८९.१३ | १) | तिडके शुभांगी मोहन – ७४.३३% |
| | | २) | निखाडे अंजली माणिक – ७२.८३% |
| | | ३) | थोरमिसे स्वाती अशोक – ७२.३३% |
| बीए (तृतीय वर्ष) | ६६.६७ | १) | सलादे सोनाली शिवाजी – ८२.४२% |
| | | २) | भालेराव मयुरी भाऊसाहेब – ७६.७५% |
| | | ३) | पवार संजिवनी निवृत्ती – ६९.७५% |
| बीकॉम (प्रथम वर्ष) | ८२.४६ | १) | कान्हे पूनम नरेंद्र – ८५.१४ |
| | | २) | निकम वृषाली रविंद्र – ७७.२९% |
| | | ३) | जाधव पूजा अंकुश – ७३.००% |
| बीकॉम (द्वितीय वर्ष) | ९४.५९ | १) | साळुंके गायत्री बाजीराव – ८०.६६% |
| | | २) | सोनवणे जयश्री भिमा – ७४.१६% |
| | | ३) | निखाडे प्राजक्ता दत्तात्रय – ७३.३३% |

**NET / SET** परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थी

वायकंडे समाधान नारायण – अर्थशास्त्र **SET - 2018**

निफाडे कामिनी उत्तम – मराठी – **NET -2019**

----***----



Scanned with CamScanner

# उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभाग अहवाल

मराठा विद्या प्रसारक संचलित जनता ज्युनिअर कॉलेज, वडनेर भैरव येथे संस्थेने सन १९९२-१९९३ या वर्षापासून मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप हा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केला होता. सदर अभ्यासक्रमासाठी इ. १० वी पास विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. आजपर्यंत या विभागाचा निकाल हा अतिशय उल्लेखनीय लागलेला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी उच्च विद्याविभुषित प्राध्यापक वर्ग विद्यार्थी मार्गदर्शनासाठी लाभलेला आहे.

मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप या अभ्यासक्रमाचे नाव शै.वर्ष २०१६-२०१७ पासून मार्केटिंग ॲण्ड रिटेल मॅनजमेंट असे शासन स्तरावरुन करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमातील उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी आज स्वत:च्या पायावर उभे राहून विविध क्षेत्रात यशस्वी झालेले आहेत. व्यवसाय निर्मिती व उद्योजक विकास हाच या अभ्यासक्रमाचा मूळ हेतू आहे. देशातील वाढती बेरोजगारी कमी करणयचे प्रयत्न या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शासन स्तरावरुन केले जात आहे.

सदर अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील प्रवेशित विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे आहे.

इ. ११ वी मार्कटिंग ॲण्ड रिटेल मॅनेजमेंट - विद्यार्थी संख्या - ४०

इ. १२ वी मार्कटिंग ॲण्ड रिटेल मॅनेजमेंट - विद्यार्थी संख्या - ३२

तसेच २०१८-२०१९ मधील निकाल पुढील प्रमाणे आहे.

इ. ११ वी मार्कटिंग ॲण्ड रिटेल मॅनेजमेंट - १००%

इ. १२ वी मार्कटिंग ॲण्ड रिटेल मॅनेजमेंट - ८१.४८%

वरील अभ्यासक्रमात पुर्णवेळ शिक्षक श्री. पाटील डी. एस व पुर्णवेळ शिक्षक नी. गांगुर्डे एस. वाय. हे विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या मार्गदर्शन करीत असतात. तसेच या विभागाचे विभाग प्रमुख म्हणून श्री. गांगुर्डे एस. वाय. काम यशस्वीरित्या पार पाडीत आहेत.



Scanned with CamScanner

# जनता ज्युनिअर कॉलेज अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये जनता ज्युनिअर कॉलेजमध्ये इ. १२ वी मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेतून १९८ विद्यार्थी व इ. ११ वी मध्ये १७२ विद्यार्थी प्रविष्ठ होते. १२ वी मध्ये कु. प्रतिक्षा कैलास धनाईत ही विद्यार्थिनी ८१.६९% गुण मिळवून प्रथम आली.

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा या गुणवत्ता वाढीसाठीही विविध उपक्रम राबविले.

युवा स्पंदन, मैदानी खेळ, निबंध-वक्तृत्व स्पर्धा, विद्यार्थी पालक मेळावा घेतला. पर्यावरण जनजागृतीसाठी व्याख्यान, कृती कार्यक्रम राबविले. गावफेरी; पोलीस कार्यालयाला भेट, शैक्षणिक शिष्यवृत्ती असे अनेक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सामाजिक जाणिवा निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले.

**प्रा. एस. आर. जाधव**

विभाग प्रमुख, ज्युनिअर कॉलेज

Scanned with CamScanner

# धन्यवाद !



Scanned with CamScanner

भैरव २०१९-२०

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## ✻ शाखा विस्तार ✻

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ६२ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | आय. टी. आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ५५ | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २४ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | शेतकी शाळा | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ | ललित कला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०३ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ५४ | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी.फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०५ | पारिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०२ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालय | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापक संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |

Scanned with CamScanner

सकाळ

# वडनेरभैरव महाविद्यालयात युवा महोत्सवाला सुरवात

सकाळ वृत्तसेवा

वडनेरभैरव, ता. १० : येथील मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवक महोत्सवाला सुरवात झाली, अशी माहिती प्राचार्य ए. एल. भगत यांनी दिली.



वडनेरभैरव : येथील महाविद्यालयात युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करताना राहुल पुळे, प्राचार्य अमोल भगत, प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी.

Nashik, Malegaon 11/01/2019 Page No. 2





# ‘ट्रॅडिशनल डे’त तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग, रॅलीने वेधले लक्ष

# वडनेरभैरव महाविद्यालयात दिसली संस्कृतीतील विविधतेतील एकता

प्रतिनिधी । वडनेरभैरव



# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मविप्र संस्था कटिबद्ध : नीलिमा पवार

## वडनेर भैरव महाविद्यालयाच्या सुसज्ज इमारतीचे उद्‌घाटन

**सुविधा मिळणार**





## अन्याय सहन करू नका



# आंतरमहाविद्यालयीन मुलींची कबड्डी स्पर्धा





वडनेर भैरव : आपद्ग्रस्तांसाठी निधी जमा करताना वडनेर भैरवचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे, प्राचार्य अमोल भगत

Scanned with CamScanner